
# माणूस

१ आक्टोबर ७३

एक रुपया

## चित्र वार्ता पुस्तक

# बॉबी



# माणूस चित्र वार्ता पुस्तक


संपादक
श्री. ग. माजगावकर

सहसंपादक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे


| दिनांक | किंमत | अंक |
|---|---|---|
| १ ऑक्टोबर १९७३ | एक रुपया | सहावा |

मुखपृष्ठ : ऋषी कपूर

चित्रकार : अनंत सालकर


# चित्रकथा सोलापूर संपाची


**सु. ल. सोमण**




**छाया**
माळगे फोटो स्टुडिओ, सोलापूर
पद्मा, सोलापूर
भागवत फोटो स्टुडिओ, दौंड



२ ऑक्टोबर १९६६ ! मध्य रेल्वे व दक्षिण रेल्वे ह्यांचे दोन दोन तुकडे तोडून दक्षिण मध्य रेल्वेचा जन्म झाला. त्यापूर्वीच म्हणजे १९६४ मध्ये द. म. रेल्वेचा आराखडा तयार होत असतानाच, जुन्या मध्य रेल्वेचा सोलापूर विभाग द. मध्य रेल्वेत जाऊ नये म्हणून रेल्वे कर्मचारी, व्यापारी वर्ग ह्यांनी प्रयत्न सुरू केले. परंतु ह्या विरोधांना न जुमानता सोलापूर विभाग द. मध्य रेल्वेत घातला गेला. त्याचे दुष्परिणाम जसजसे जाणवू लागले, तसतसा सोलापूर विभागातल्या कामगारांचा विरोध अधिकाधिक संघटित होऊ लागला. ७१-७२ मध्ये, कामगारांच्या वतीने

झगडणाऱ्या तीन भिन्न कामगार संघटना एकत्रित आल्या. संयुक्त कृती समितीच्या नेतृत्वाखाली आंदोलन तीव्रतर बनत गेले. दासप्पा, हनुमंतय्या, टी. ए. पै आणि आता मिश्रा रेल्वे मंत्री येत होते-जात होते, पण कर्मचाऱ्यांना आश्वासनांखेरीज काहीच मिळत नव्हतं ! अर्ज, विनंत्या, शिष्टमंडळं कुठल्याच प्रयत्नांना यश येत नव्हतं. तक्रारी वाढतच होत्या. सिकंदराबादचा जाच वाढतच होता. कामगारांच्या संयमानं सीमा गाठली होती. ' हमे रेल्वे बंद करनी होगी ' ह्या घोषणेतला जोर वाढतच होता ! आणि ह्याच दडपणातनं, असंतोषाला तोंड फोडण्यासाठी संयुक्त कृती समितीनं प्रत्यक्ष कृतीचा आदेश रेल्वे कर्मचाऱ्यांना दिला...



**चक्री उपोषणाला सुरुवात....**

प्रत्यक्ष कृतीच्या आदेशानुसार १५ ऑगस्ट ७३ रोजी चक्री उपोषणांनी आंदोलनाला सुरुवात झाली. हजारोंच्या संख्येने लोक उपोषणाला बसले. काँग्रेस आमदारांनीही सोलापूर-दौंड येथे उपोषणात भाग घेऊन आंदोलनाला पाठिंबा दिला. रस्त्यारस्त्यात मोर्चे-निदर्शने सुरू झाली.






### अशा सभा

या लढ्याला जनतेचा, व्यापाऱ्यांचा, विद्यार्थ्यांचा भरघोस पाठिंबा मिळाला. सभा नाही असा एकही दिवस सोलापूरात मावळत नव्हता.




### आंदोलनाचा पुढचा टप्पा


दौंड, कुर्डुवाडी, सोलापूर, वाडी या ठिकाणी चार चार तास गाड्या अडवण्यात आल्या. कर्मचाऱ्यांबरोबरच त्यांच्या स्त्रियांनी, मुला-बाळांनीही याला उत्स्फूर्त साथ दिली.



### आंदोलनाच्या उग्रतर पर्वाला सुरुवात

तरीही रेल्वे बोर्डाला जाग आली नाही. कृती समितीने १ सप्टेंबरपासून ‘ काम बंद ’चा आदेश दिला. पण तत्पूर्वीच २९ ऑगस्टलाच दौंडला इंजिन ड्रायव्हर्सनी ‘ फायर ड्रॉप ’ केला. कर्मचाऱ्यांनी काम बंद करून ज्या गाडीच्या नियमितपणाबद्दल अधिकारी काटेकोर असत ती ‘ सिकंदराबाद एक्सप्रेस ’ दौंडच्या औटर सिग्नलजवळ अडवली. ती तिथे तब्बल आठ दिवस पडून होती.









## सारं कसं शांत शांत !

सोलापूरला सुरू झालेल्या संपाची
लागण सर्वत्र झाली.
गजबजलेली स्टेशन्स निस्तब्ध झाली.
एरवी अहोरात्र खडखडणारी यंत्रेही
थंडगार पडली.

## पण पोलीस बंदोबस्त मात्र चोख होता


शांततापूर्ण चाललेल्या आंदोलनामुळे
एरवी बंदोबस्ताच्यावेळी हैराण होणारे
पोलिस इथे मात्र खुषीत होते.



## आणि आंदोलनाची धार वाढू लागली.

संपाला सुपरवायझरी वर्गाचा पूर्ण
पाठिंबा मिळाला.

मृणाल गोरे





रामभाऊ म्हाळगी


## तुम्ही एकाकी नाहीत....


सोलापूरकरांच्या अभूतपूर्व लढ्याच्या बातम्या सर्वत्र पसरल्या. मान्यवर नेत्यांनी मिळेल त्या वाहनांचा उपयोग करून सोलापूर-दौंडकडे धाव घेतली. जॉर्ज फर्नांडिस, मृणालताई गोरे, रामभाऊ म्हाळगी, नानासाहेब गोरे, मधु दंडवते, बाळ ठाकरे...सर्वांच्या सभांना अलोट गर्दी उसळली. आणि संपवाल्यांचे सामर्थ्य आणखीच वाढले.

जॉर्ज फर्नांडिस




नानासाहेब गोरे





## प्रादेशिक सेनेला पाचारण

संपाचा अधिकाधिक विस्तार होत गेला. पुणे ते रायचूर, दौंड, बारामती, लातूर, बार्शी, कुर्डुवाडी, पंढरपूर, मिरज ही वाहतूक पूर्णपणे थंडावली. दक्षिणेतून मुंबईला पोहोचणं कठीण झालं. रॉकेल, पेट्रोल, धान्य, कपडा साऱ्याचीच आवक-जावक थंडावली. शेवटी रेल्वेबोर्डानी प्रादेशिक सेनेला पाचारण केलं.






## जेणो काम तेणो थाय बिजा करे तो....


पण अनुभवी कर्मचारी आणि उसनवारीने संप फोडण्यासाठी आणलेले शिपाईगडी यांच्यात फरक असणारच. हडपसरजवळच्या अपघातानं हे सिद्ध केलं. दोन जवान यात कामी आले.



पण आंदोलन काळात कर्मचाऱ्यांचं मनोधैर्य वाखाणण्यासारखं होतं. पगार झाले नव्हते. रोजंदारीवर काम करणाऱ्यांच्या पोटाला चिमटे बसू लागले होते. दोन वेळ चूल पेटणं कठीण झालं. पण कर्मचारी निराश झाले नाहीत. नेत्यांनीही परिस्थिती उत्कृष्ट हाताळली. रेशन उधारीवर वाटलं गेलं. काहींना मीठ भाकरीच पण दोन वेळ मिळू लागली. जनतेकडून मदतीचा झराही अखंड वाहता होता.



या घुमश्चक्रीतच गणपतीबाप्पा मोरया आले. पण आरास, मिरवणुकी, कार्यक्रम कशालाच खंड पडला नाही. उलट अशा करमणुकीनेही त्यांचं मनोधैर्य उंचावलं.




गणपतीबाप्पा मोरया ।
सेंट्रल रेल्वे घेऊन या
जिना यहाँ, मरना यहाँ ।
सेंट्रलबिना जाना कहाँ

याच सोलापूरकरांच्या घोषणा ठरल्या.




आणि ठिणगी पडली

या अभूतपूर्व शांततेनं चाललेल्या संपाला शेवटी गालबोट लागलंच. सोलापुरात 'कायदे-भंग' चळवळ हातात घेतल्यावर चौथ्या दिवशी कम्युनिस्टांचं वर्चस्व असलेली तुकडी पोलिसांचं कडं







तोडून रेल्वे स्टेशनकडे निघाली. नगरसेवक भीम रोण्यांचा धक्का फौजदाराला लागला. निमित्त मिळाल. गडबड उडाली आणि पोलीस, एस. आर. पींनी बेछूट लाठीमार सुरू केला. कित्येक भयानक जखमी झाले. आंदोलनाशी आजिबात संबंध नसलेलेही त्यात अडकले. स्त्रिया, मुलंही सुटली नाहीत. याची तीव्र प्रतिक्रिया सर्वत्र उमटली. निषेधाचे सूर उमटले.



## आणि अशातच एक दिवस उजाडला

ज्या दिवशी २६ दिवस चाललेलं हे आंदोलन समाप्त झालं. कामगारांचा प्रचंड पाठिंबा, भरघोस सभा नि मोर्चे, लाठीहल्ल्याचा तीव्र निषेध वगैरे दडपणांचा शेवटी फायदा झाला. रेल्वे मंत्रालयानं कर्मचाऱ्यांच्या शिष्टमंडळाला दिल्लीला पाचारण केलं. वाटाघाटी बहुतांशी यशस्वी झाल्या. २५ सप्टेंबरपासून कामगार कामावर जायला लागून या लढ्यातल्या महत्वपूर्ण पर्वाची सांगता झाली.

# आंदोलन....प्रवाशांचं, विद्यार्थ्यांचं, व्यापाऱ्यांचं, सामान्य जनतेचं....

मागणी छोटी असो की मोठी, आंदोलनाशिवाय ती धसास लागतच नाही. कायदा हातात घेऊन रस्त्यावर आल्याशिवाय शासन जागेच होत नाही. अलिकडच्या काळात हे नियम अगदी ठरून गेले आहेत. आणि म्हणूनच कायदा हातात घेऊ नका. सनदशीर मार्गांनी आपल्या मागण्या पदरात पाडून घ्या. वगैरे आवाहनं पोकळ वाटतात. निरर्थक वाटतात. म्हणूनच अशा आवाहनांना कुणीही भीक घालत नाही. थोडयाशा सनदी प्रयत्नांनी शासन हललं नाही (हलत नाहीच म्हणा ते तसं!) तर जनता आदोलनाकडे वळते, असनदशीर मार्गांनी दडपण वाढवते. अशा बहुसंख्य दडपणापुढे शासनही नमतं. रेल्वेच्या लोको कर्मचाऱ्यांचा सप, सिकंदराबादचा संप, राजस्थानातल्या कर्मचाऱ्याचा सप, अलिकडचा मुंबईचा डॉक्टराचा सप– एक ना दोन असख्य उदाहरण देता येतील. किंबहुना ह्या साऱ्या प्रकरणामुळे सामान्य जनतेच्या मनात एक गोष्ट निश्चित बिंबली आहे. मागण्या पदरात पाडून घ्यायच्या असतील तर आंदोलनाशिवाय तरणोपाय नाही!

दक्षिण मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत नेमक हेच घडलं आहे. ह्या विभागातन मी चार दिवस हिंडलो. अनेकांशी बोललो. साधे हमाल, खलाशी ह्यापासून तहत वरिष्ठ रेल्वे अधिकारी, पुढारी, महापौर, आमदार– सर्वांशी बोलून एकच विचार प्रकर्षांनी माझ्या मनात वारंवार आला. हे आंदोलनच मूळात अनावश्यक होतं अस मला अनेकदा वाटल. प्रश्न अगदी सोपा होता, उत्तर अगदी साध सरळ होतं. भौगोलिक दृष्टया, आर्थिक दृष्टया, व्यावहारिक दृष्टया आणि शासकीय दृष्टयाही सोलापूर विभाग द. मध्य रेल्वेच्या चौकटीत फिट्ट कसा तो बसतच नव्हता. किंवहुना दक्षिण मध्य रेल्वेची निर्मितीच ह्या कुठल्याही दृष्टीनं सुसगत नव्हती. आणि हे सारं, ह्या रेल्वेच्या निर्मितीपूर्वी तज्ञांनीच वारंवार सागितलं होतं. खुद्द रेल्वे बोर्डाच्या उच्चाधिकार तांत्रिक सल्लागार समितिनच द. *मध्य रेल्वेची निर्मिती अनावश्यक, अनाठायी* असल्याचं १९६४–६५ मध्ये सांगितलं होतं. पण तज्ञांचे निष्कर्ष, त्यांच्या सूचना आणि शासनानं घ्यायचे निर्णय ह्यांचा अर्थाअर्थी काही सबध असावा लागतो हेच मुळी आपल्याकडे पटत नाही असं दिसतं. तेव्हा तज्ञांच्या मताना बगल देऊन द. मध्य रेल्वे अस्तित्वात आली. सोलापूर विभाग विकलांग अवस्थेत ह्या रेल्वेत अक्षरश: कोंबण्यात आला.

ह्या नंतरच्या काळात, तज्ञांनी व्यक्तविलेले अंदाज खरे ठरू लागले. दक्षिण मध्य रेल्वेवर रोजच्या कटकटी वाढू लागल्या. कामगाराची तक्रारवजा निवेदनं जवळजवळ रोज सोलापूर विभागातनं जाऊ लागली. रेल्वे मार्गे जाणारा माल झपाटयानं कमी होऊ लागला. १९७१–७२ ह्या आर्थिक वर्षासाठी द. मध्य रेल्वेचं जे बजेट होतं त्यानुसार अपेक्षित फायदा तर झाला नाहीच, पण साडेतीन कोटी रुपयांचं नुकसानच रेल्वेला झालं. ह्याउलट मध्यरेल्वेवर अपेक्षेपेक्षा आठ कोटी रु. अधिक फायदा रेल्वेला ह्याच काळात झाला. १९६७ (म्हणजे जेव्हा द. मध्य रेल्वे अस्तित्वात आली तेव्हा) हे जर प्रमाण वर्ष मानलं, तर तुलनेनी, सोलापूर विभागात कार्यक्षमता जवळ जवळ साठ टक्क्यानी घटली आहे असा निष्कर्ष शासनानंच पुरवलेल्या आकडेवारीवरून निघतो. ही सर्व आकडेवारी शासनाजवळ उपलब्ध असताना सोलापूर विभागातल्या लोकांना सापत्न *भावानी वागवल जात असल्याच्या* तक्रारी दाखलयांसह जवळजवळ रोज येत असताना, ह्या एकूण प्रश्नाच उत्तर साधं सरळ होतं. १९६६ साली झालेली चूक दुरुस्त करणं आणि अकार्यक्षमतेतून, आर्थिक तोटयातून होणारी राष्ट्रीय हानी टाळणं ह्याच तो साधा, सोपा, सरळ मार्ग! पण राष्ट्रीयदृष्टया महत्त्वाचा असा हा मार्ग पत्करायचा धीर शासनाला झाला नाही! न्यायाच्या बाजूनं निःपक्षपातीपणे झुकणं शासनाला रुचलं नाही! हा खंबीरपणा शासनानं दाखवला असता, वेळीच कर्मचाऱ्याची गाऱ्हाणी ऐकून घेतली असती तर हा साधा प्रश्न इतका *गंभीर बनलाच नसता.* २६ दिवसांचा न भूतो संप होऊन रेल्वेचं (म्हणजेच राष्ट्राचं!) कोटयावधि रुपयांचं नुकसानही मग झालं नसतं. पश्चिम-दक्षिण प्रवास करणाऱ्या लाखो प्रवाशांचे शिव्या-शापही मग रेल्वेला ऐकून घ्यावे लागले नसते!!

पण दुर्दैवाने राष्ट्रीय महत्त्वाच्या ह्या प्रश्नाआड प्रांतिकता आड आली. दक्षिण मध्य रेल्वेच्या निर्मितीच्यावेळी देखील विरोध असतानाही निर्णय घेण्यात आला तो प्रांतीय दबावाखालीच! वास्तविक पंडित नेहरूंनी दक्षिण मध्य रेल्वेची सूचना फेटाळून लावली होती. पुढे स्व. लाल बहादूर शास्त्रीच्या काळातही योजनेवरून अखेरचा हात फिरूनही ती शेल्फातच पडून होती. स्व. शास्त्रीच्या मृत्युनंतर कॉंग्रेसमधल्या दुफळीपर्यंत दिल्लीला नुसता सावळा गोंधळच होता. त्या काळात ह्या रेल्वेचं घोडं पुढे दामटण्यात त्या वेळचे आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री ब्रह्मानंद रेड्डी व श्री. संजीव रेड्डी यशस्वी झाले. त्यावेळचे रेल्वेमंत्री होते श्री. स. का. पाटील. असं म्हणतात की त्यावेळी पंतप्रधानपदावर ज्या अनेकाचे डोळे होते त्यात श्री. स. का. पाटीलही सामील होते. त्यावेळी रेल्वेच्या पुनर्रचनेचं निमित्त करून पाटलांनी ठिकठिकाणच्या कॉंग्रेस कमिटयाना खूष करायचा म्हणे प्रयत्न केला. अहमदाबादला रेल्वेच्या मुख्य कचेऱ्या हलवून त्यांनी गुजरात कॉंग्रेसला खूष केल. लखनौला विभागीय रेल्वेची स्थापना करून गुप्तांच्या पदरी माप घातलं आणि पुढे खाली जाऊन, सजीव रेड्डी, ब्रह्मानंद रेड्डी, ह्या मित्रांच्या जुन्या मागणीनुसार आंध्रच्या प्रांतीय रेल्वेचं उदक सोडलं. तीच ही दक्षिण मध्य रेल्वे! ह्यापूर्वी जुन्या निझाम स्टेट-रेल्वेचं मध्य रेल्वेत व दक्षिण रेल्वेत सामिलीकरण होऊन त्या स्टेट रेल्वेचं हैद्राबादेतलं मुख्य कार्यालय हलवल गेलं. स्टेटच्या राजधानीचा दर्जाही हैद्राबादला उरला नाही. हैद्राबादचं कमी झालेलं महत्त्व तिथल्या लोकांना जाणवत होतं. आणि म्हणूनच, हैद्राबाद, आंध्रसाठी वेगळया रेल्वेची, मानाच्या पानाची हैद्राबादकरांनी मागणी पुढे रेटली होती. ही संपूर्ण प्रातिक *मागणी श्री. स. का. पाटलांनी,* तज्ञांचा

निर्भीड टीकाकार व रसिक प्रेक्षक यांच्या वाखाणणीस पात्र ठरलेले चित्र




निर्माता – दिग्दर्शक – संकलक **राज कपूर** • संगीत **लक्ष्मीकांत – प्यारेलाल** • कथा **के. ए. अब्बास**

भूमिका : **ऋषी कपूर**, **डिम्पल कापडिया**, **प्राण**, **प्रेमनाथ**, **सोनिया सहानी**, **दुर्गा खोटे**, **पीलू वाडिया**, **शशीकिरण**, **पींचू कपूर**, **जगदीशराज**

खास भूमिकेत : **अरुणा इराणी**, **फरिदा जलाल**, **प्रेम चोप्रा**

**मेट्रो** २।, ५।।। व ९। • **लोटस** ११।, २।।, ५।।।, ९ • **गणेश** ११।, २।।, ६, ९। • **ब्रॉडवे** २।।, ६, ९।

**बादल रुपम गेईटी**
रोज ४ खेळ • २।।, ६, ९ • (बांद्रा)

**मिलन** (सांताक्रूझ), **हंजर** (जोगेश्वरी), **न्यू इरा-सवेरा** (मालाड), **जया** (बोरिवली), **सहकार** (चेंबूर), **गणेश** (ठाणा), **प्रभात-सपना** (उल्हासनगर), **अम्बर** (अंधेरी), **टोपीवाला** (गोरेगांव), **सोना** (कांदीवली), **कल्पना–भारत** (कुर्ला), **श्रेयस** (घाटकोपर) **जोकर** (कल्याण), **हसीन** (भिवंडी).

(जयसिंह प्रकाशन)

सल्ला झिडकारून स्वीकारली. असं म्हणतात की, आंध्र रेल्वे, हैद्राबाद (किंवा सिकदराबाद) रेल्वे, चार मिनार रेल्वे अशा नावांचीच मागणी प्रथमतः आंध्र नेत्यांनी केली होती. मूळतः मध्य रेल्वेचा सिकंदराबाद विभाग व द. रेल्वेचे गुटकल, हुबळी, विजयवाडा विभाग अशा विभागांना एकत्रित आणून दक्षिण मध्य रेल्वे निर्माण करावी असा प्रयत्न होता. पण दक्षिण रेल्वेने गुंटकल विभाग द्यायला ठाम नकार दिल्यावर सोलापूर विभाग तिकडे जोडला गेला. ह्या सोलापूर विभागातही केंद्रिय मंत्री अण्णासाहेब शिंदे ह्यांच्या विरोधामुळे दौंड-मनमाड व दौंड-पुणे विभाग मध्य रेल्वेतच ठेवला गेला. पुढे वाढत्या गैरसोयी पाहून दौंड-पुणे विभाग पुन्हा सोलापूर विभागात (द. म. रेल्वे) घातला गेला.

जी प्रांतियता निर्मितीच्या वेळी कारणीभूत ठरली त्याच प्रांतियतेमुळं आज साधा सरळ निर्णय घेणं शासनाला जड जात आहे मला मिळालेल्या माहितीनुसार, आंध्र प्रदेशात जो तेलंगणाचा उग्र प्रश्न सध्या अस्तित्वात आहे त्याचा गुंता सोडवल्याखेरीज द. मध्य रेल्वेच्या प्रश्नाला (म्हणजेच वास्तवात आंध्र रेल्वेच्या प्रश्नाला) हात घालून आंध्रवासियांचा आणखी रोष ओढवून घ्यायचा धोका शासनाला पत्करायचा नव्हता. ह्या एकाच कारणाने शासनानी निर्णय घेण्याचं टाळल आणि त्यातून पुढचं २६ दिवसांचं अनावश्यक रामायण घडल !

आंदोलन जेव्हा संप-पर्वात शिरणार असं जाणवू लागलं तेव्हाही शासनाला ह्या २६ दिवसांचा संप टाळता आला असता. शासनानी जी तीन सदस्य समिती नेमली तिची कार्यकक्षा स्पष्ट केली नव्हती. सोलापूर विभाग मध्य रेल्वेत समाविष्ट व्हावा ह्यासाठी हे आंदोलन होतं पण ह्या सबंधात समितिनं चौकशी करावी असा साधा उल्लेखही कुठे नव्हता. आणि त्याही वर कडी म्हणजे समितीनं आपला अहवाल दक्षिण मध्य रेल्वेला सादर करायचा होता, रेल्वे मत्रालय किंवा लोकसभेला नव्हे ! म्हणजे ज्याच्याविरुद्ध तक्रार त्याच्याच हाती न्यायदानाचं काम असला हा प्रकार होता. आणि एवढं असूनही, अहवालातल्या शिफारसी बंधनकारक कुणावरच नव्हृत्या. अशी समिती सोलापूरकरांनी स्विकारली असती तर, बेळगावकरांप्रमाणेच शिखंडी अवस्थेत ते लटकत राहिले असते हे उघड होतं. साहजिकच संयुक्त कृती समितीने ही योजना फेटाळून लावली. कार्यकक्षा निश्चित असावी, अहवाल सादर करायला वेळेची मर्यादा असावी, अहवाल रेल्वेमत्रालयाला सादर केला जावा आणि तो बधनकारक असावा ह्या त्यावेळी कर्मचाऱ्यांच्या मागण्या होत्या. पण त्याही मान्य करायला शासनाने खळखळ केली. शेवटी दडपण वाढल्यावर ह्या मागण्या केंद्रीय रेल्वे उपमंत्री श्री. कुरेशी ह्यानी मान्य केल्या, पण त्याही तब्बल सह्वीस दिवसाच्या अभूतपूर्व संपानतर !

आज हा संप मिटला आहे. केंद्र सरकार व सोलापूर रेल्वे विभागाचे कर्मचारी—दोघानीही आपापल्या भूमिका काहिशा लवचिक केल्या म्हणूनच ही तडजोड निघू शकली. महाराष्ट्र शासन (विशेषतः मुख्यमंत्री श्री. नाईक) व सोलापूर विभागातले आमदार (त्यांतही सौ. उषादेवी जगदाळे, दौंड ह्यांचा खास उल्लेख करावा लागेल !) आणि विरोधी पक्षीय ह्या साऱ्यांच्या भक्कम पाठिंब्यामुळे सपाला हे यश मिळालं हे नाकारण्यात हशील नाही. पण असं असलं तरी लढ्याच स्वरूप शेवटपर्यंत अपक्षीयच राहिलं नि आजही ते तसंच आहे ! किंबहुना स्थानिक नेतृत्वांनी प्रस्थापित नेतृत्वाच्या पाठिंब्याचं स्वागत जरी केल तरी त्या नेतृत्वाला संयुक्त कृती समितीच्या कार्यक्रमात, निर्णयात ढवळाढवळ मात्र अजिबात करू दिली नाही ! ते लढले ते स्वतःच्या सामर्थ्यावर, इतरांच्या पाठिंब्यानिशी ! मुंबईतल्या अलिकडच्या डॉक्टरांच्या लढ्यांतही नेमकं हेच घडलं. आणि लोको कर्मचाऱ्यांच्या यशस्वी लढ्याच्या वेळीही प्रस्थापित नेतृत्व असच दूर ठेवलं जाऊन सबधीत कामगाराची भरीव, मजबूत एकी सांधली गेली ! कामगार चळवळीत हा नवीन बदल घडून येत असल्याची ही चिन्हं आहेत का ? संघटनांतर्गत बेकीवर मात करून, एकत्रित येऊन, प्रस्थापित नेतृत्वाला दूर ठेवून कामगार एक नवा इतिहास घडवू पाहात आहेत काय ? अस असेल तर हा बदल स्वागतार्हच आहे !

सोलापूर रेल्वे विभाग आता मध्य रेल्वेत येऊ घातला आहे. तो लौकरच मध्य रेल्वेत येईल अशी आशा आहे. त्यानतर इथल्या कर्मचाऱ्यांची असख्य गाऱ्हाणी (बदल्या, बढत्या, नवीन भरती, पक्षपाती वागणूक वगैरे) दूर होतील; व्यापाऱ्यांच्या, प्रवाशांच्या, विद्यार्थ्यांच्या अडचणी दूर होतील, अशी आशा धरायला हरकत नाही. मात्र निव्वळ सोलापूर विभाग मध्य रेल्वेत सामील करून सर्व प्रश्न मिटतील ही कल्पना चूक आहे. सोलापूर विभाग मध्य रेल्वेत आल्यावर उरलेली दक्षिण मध्य रेल्वे अगदीच लहान राहाणार आहे व आर्थिक दृष्ट्या अधिकच दुर्बळ होणार आहे. ह्या मागणी पाठोपाठ सागली—कोल्हापूर, मनमाड—काञीगुडा (मराठवाडा) ह्या विभागातल्या कर्मचाऱ्यांनीही सोलापूर विभागातल्या कर्मचाऱ्याप्रमाणेच तक्रारी माडून मध्य रेल्वेत सामील करण्यात यावे अशी मागणी केली आहे. दक्षिण मध्य रेल्वे रद्द करणे व पूर्वीची पद्धतीच पुन्हा अवलबणे हा ह्या सगळ्या प्रश्नावरचा एकमेव राष्ट्रीय तोडगा आहे. पण आंध्रच्या भावना दुखावणारा हा राष्ट्रीय निर्णय शासन घेईल हे सभवत नाही !

शेवटी आणखी एका मुद्याचा उहापोह इथे रास्त ठरावा. सोलापूर विभाग कर्मचाऱ्यांच्या आदोलन काळात ही मागणी भाषिक आहे, प्रातिक आहे असे आरोप केले जात होते. वास्तवात मुळात ह्या रेल्वेची निर्मिती आणि नंतरच्या आंदोलनाला विरोधच प्रातिक दृष्टिकोनातून होत होता. तेव्हा प्रांतिक दृष्टिकोनातून प्रश्न हाताळणाऱ्यांनी आंदोलनावर प्रातिकतेचा आरोप करावा हा मोठाच विनोद होता ! त्यातही गंमत ही की, ज्या भागात आंदोलन सुरू होतं त्यात रायचूर व गुलबर्गा ह्या दोन म्हैसूर राज्यातल्या जिल्ह्यांचाही समावेश होता. खुद्द सोलापूर शहर 'कॉस्मापॉलिटन' आहे. तेलगू भाषिकाची ह्या शहरातली सख्या किमान लाखावर तरी सहज आहे. तितकेच कानडी भाषिकही आहेत. ह्या साऱ्यानी मराठी बांधवाच्या खाद्याला खादा लावून ही मागणी उचलून धरली होती. आंदोलनाचे विरोधक जरी सोयिस्करपणे ह्या वस्तुस्थितीकडे कानाडोळा करीत असले, तरी हे सत्य लपणार नाही हे उघड आहे ! —प्रतिनिधी

# अमदानी



**आजवरचा संकेत**
**असा अवचित मोडला..**
**स्वामित्व मिळालं,**
**पण मानबिंदूच हरवला!**

फाटकापाशी तो लसलसत बसला होता.–
कान मलूल. नजर किलकिली. दूर खिळलेली. मधूनच थरथरणा मागचा पाय.

बाहेर अस्ताव्यस्त कातळ. त्यावर इथंतिथं तुरेदार गवत. नुकता कोसळून गेलेला पाऊस न् हळदी उन्हाची स्वच्छ तिरीप फाकलेली. ओली, हिरवी, चमचमती पाती. मध्येच झडपून जाणारी मोकाट कावटी – मस्त, उग्र वास. मस्तकी भिनणारा.

हनुवटी टेकवून, हुंगत–हुसहुसत तो पडलेला. ओल्या–भोर नाकपुड्या फुलवीत. आतल्या आत कुरमुरत.

हुंगता–हुंगता मग अचानक लव ताठरली. कानांच्या कुळकुळीत पाकळ्या एकदम टकटकीत झाल्या, मुडपल्या न् पुन्हा टवटवल्या. नजर सताड उघडली, मिटली न् पूर्ण फाकली. इतस्ततः भिरभिरली न् समोर खिळली – निर्णायकशी.

घशातल्या घशात गुरगुराट घुमला.

तो पुनः पुन्हा हुंगू लागला. वसवसत.

# शरद काळे

गुरगुरणं भलतंच वाढलं. शेपटीचा वळणदार रफार फुलारला. नजर सजग-तप्त झाली-भडकली.

जवडा विचकला. लसूण सुळे प्रकटले. भाळावरली काळीभोर लव दुभगविणारी वीजरेषा थरारली–अधिक ठाशीव झाली.

अस्वस्थता–भलतीच अस्वस्थता.

तो उठला. उभा राहिला. तशी मागचा पाय अभावित टेकला. असह्य-असह्य सणक निघाली.

पाय उचलून धरावा लागला !

✤

फाटकापल्याड थोड्या अंतरावर कातळ एका खोलगटीत उतरलेलं. तिथं एक खडकाळ उचवटा – त्या पलीकडं मग नुसतं, मोकळं, उघडं माळरान – गावकुसापर्यंत.

त्या तिथनं ती दुडकत येत होती. आसमंतात ताजा वास भरीत. अदम्य ओढीन.

तिच्यामागनं दोघे-तिघे एकमेकांवर फिस्कारत आडवे-तिडवे पळत होते त्याच्यामागन दुरवरून आणखी पाच-सहांचं टोळकं दौडताना दिसलं.

तो पुढे झाला. जोरात ठणाणू लागला.

त्यासरशी पुनश्च सणक – मागला पाय चुकून टेकला गेला होता.

आठवणीनं त्यानं तो आखडून घेतला न् निखार-नजर पुनश्च समोर रोखली. सावधशी.

त्याला सरसावायचं होतं. उसळायचं होतं. उधळायचं होत.

पण तो फक्त खेकसू शकत होता !

आता ती पळत पुढं येत होती.

तेवढ्यात खडकाळ उचवटा आड आला.

चिक्कार फुगे फुटल्यागत झोवरं भुंकणं.

उंचवट्याआड कदाचित एखाद्या इसमानं तिच्याशी लगट–

त्वेषानं तो भुंकला न् फाटक ओलांडून खुडमुडत निघाला.

तोवर पलीकडून उंचवट्याच्या माथ्यावर ती आली देखील.

तिथं खुरपत ती उभी राहिली. काळ्या खडकावर भलतीच उठाव दिसणारी. गुबगुबीत. पांढरीशुभ्र.

वाऱ्यान थरथरणारं तिचं शेपूट इथून जाणवणारं. रानवासातून वेगळा ओळखू येणारा तिचा वास. बेचैन करणारा.

मग मागलं टोळकही उंचवट्यावर येऊन ठेपलं.

तशी ती पुन्हा उधळली–नेमकी त्याच्याच दिशेनं ओढ घेतल्यासारखी. बेगुमानपणे. त्या बाकीच्यांना न जुमानता.

तो थबकला. घशातल्या घशात अभिमानानं गुरगुरला. मनोमनी फुलून आला.

आता मात्र इतका वेळ आखडून धरलेला पाय जाणीवपूर्वक त्यानं खाली टेकवला. कळ भिनलीच. कण्हावंसं वाटलं. पण मुष्किलीनं त्यानं ते आवरलं.

उतार ओलांडून ती वर आली–एकटी. टोळक्यातले एकदोघेच अजून तिच्या मागावर होते. बाकीचे दबकून मागेच घोटाळले असावेत.

त्याला जरा हायसं वाटलं.

नाही म्हटल तरी पाय असा जायबंदी झाला असताना, त्या सगळ्यांना एका वेळी चीत करणं अवघड होतं.

एरवी तो डरला नसता.

✤

तसा हा त्याचाच–फक्त त्याचाच टापू.

त्याचाच हक्क. दर मोसमातलं ठरलेलं. जमातीतल्यांनी मानलेलं.

इथंच नव्हे; खुद्द दूरच्या गावदरीतही त्याचा दरारा.

त्याचं धिप्पाडपण.

त्याची दणकट झडप.

चपळ पवित्रे.

भेदरविणारं फिस्कारणं.

भले भले त्याच्यापुढं मुकाट शेपूट घालीत. लुंगेसुंगे तर वाटेलाही जात नसत.

यावेळीही अशीच सहजासहजी जरब बसविणं अशक्य नव्हतं.

पण एवढं पायाच त्यांना कळता नये होतं.

थोडासाही सुगावा लागता, तर त्यांनी त्याच्यावर मात केली असती. अग्रहक्काचा, नायकत्वाचा मान नाहक हिरावला गेला असता.

त्यात या मोसमात ही सुंदरी मादी तर त्यानंच हेरलेली–उतारापल्याड एका सशाचा पाठलाग करताना…

ससा एका झुडुपात शिरला न् एकदम चीत्कारला.

आणि दुसरीकडनं अवचित वेगळंच गुरगुरणं उमटलं.

त्यामागोमाग अकल्पितपणे ती दिसली होती. उलटी त्यावरच भुंकत होती.

नाजुक, मोकळं भुंकणं. शुभ्र कानांच्या तांवूस, उभार पाकळ्या. थरथरतं लहरेदार शेपूट. अगांगी रसरशीत ताजेपणा.


अन् या सगळ्यापेक्षाही मनसोक्त घ्यावाघ्यावासा वाटणारा तिचा उन्मादक वास.

त्याला ती फार आवडली होती.

सशाचा नाद सोडून तो मग लाडिकपणे तिच्याजवळ गेला होता.

हुंगाहुंग. दबती गुरगुर.

पृष्ठ ५५ वर


घेराव
कालचा
॥लोणी चोर॥
॥दही चोर॥
॥चित्त चोर॥
॥दूध चोर॥
॥काळा चोर॥
॥गोकुळचोर॥
॥चित्त चोर॥
॥लोणी चोर॥
॥हृदय चोर॥
॥वस्त्र चोर॥



घेराव आजचा
द्या. द्या.
साखर द्या.
द्या.
गहू द्या.
द्या. रेशन वाढवून द्या.
द्या. द्या.
द्या.
द्या.
गोडेतेल द्या.
धान्यात गदळ कमी द्या.
रवा द्या. अन् तुमच्या बोक्याला कमी द्या.
द्या.
घेराव पासून बचाव
श्याम जोशी

# डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या कथा

## बाबूराव बागूल

# कोंडी



'या आंबेडकर, काय म्हणतोय तुमचा यश...' साहेबामागे आदवीने उभ्या असलेल्या रमाबाई नवऱ्याचे हे घवघवीत स्वागत पाहून खूष झाल्या. हासल्या आणि भिंतीशी उभ्या राहिल्या. हातातील पुस्तकाच्या ओझ्याने जड झालेली पिशवी त्यांनी दुसऱ्या हातात घेतली. विद्या ती; खाली ठेवता येत नव्हती. आणि त्यात साहेबाची विद्या. खाली ठेवून कसे चालेल...?

'यश आजार घेवूनच आलाय्...ताप आहे. बाकीचं मागल्याप्रमाणे सर्व चालू आहेच...ही म्हणाली तुम्ही चला. डॉक्टरसाहेबांना इंग्रजीत बोला, म्हणून आलो.' भिमरावांनी छातीशी धरलेला यशवंत डॉक्टरच्या टेबलावर ठेवला.

'म्हणजे रमाबाई मला गोरा डॉक्टर समजतात की काय?... मी अस्सल पुणेरी माणूस, ब्राह्मण...'काय यशवंता...' डॉक्टर खाली वाकले. टेबलावर पांघरूणात शांत पडलेल्या यशवंताचे डोळे, गळा, छाती तपासू लागले. तपासता तपासता ते भिमरावांना म्हणाले, इंग्रजी बोलले म्हणजे काम भागते असा सार्वत्रिक समज आहे. राज्यकर्त्यांची ती भाषा...लोक नेहमी राज्यकर्त्यांच्या भाषेचे अनुकरण करतात...विष्णूबुवा ब्रह्मचारी खरे...काय रमाबाई...पाण्यांत फार काम करता...गरोदरपणी विश्रांती घेतली नाही...आंबेडकर,...' डॉक्टर हासले आणि हळूच इंग्रजीत म्हणाले, लहानपणी लग्न करण्याची प्रथा मोडली पाहिजे. तुम्ही अजून बी. ए. नाहीत तोच बाप...त्यामुळे मुलांच्या वाढीला अडचणी येतात...खालच्या वर्गाचे राहू द्या पण आपल्या पांढरपेशातून ही चाल मोडली पाहिजे...'

'हो.' आपल्याला डॉक्टर ब्राह्मण समजून गेलेत याचे रमाबाईंना खूप कौतुक वाटले. इतरवेळी त्या एकटया अथवा लक्ष्मीबाईबरोबर आल्या म्हणजे त्यांच्या मनातील जातीची जाणीव त्यांच्या ठायी एक लहानसे दुःख देवून ठेवीत असे. दवाखान्यात असेपर्यंत एक न्यूनगंड उत्पन्न होवून दाराबाहेर पडेपर्यंत मनात कार्य करीत असे. आज तो नव्हताच. कारण साहेब बरोबर होते. आणि डॉक्टर त्यांना ब्राह्मण

समजले याचा त्यांना आनंद झाला.

'आंबेडकर, सुधारणा दिसतेय्....अशक्त आहे. ताप उतरला की टॉनिक सुरू करायला पाहिजे...' डॉक्टर भराभर केसपेपर भरू लागले.

'काय म्हणतात तुमचे प्रो. मुल्लर. आम्ही जेव्हा कॉलेजात होतो– माझी इच्छा प्रोफेसर होण्याची होती. वडिलाना वाटत होते, डॉक्टर व्हावे...ते वकिल आहेत. जोरात प्रॅक्टीस आहे. भरपूर...'

'तुमची ?'

'वडिलायेवढी नाही...हे औषध घ्या...अन् अभ्यास करा— तुमची काय इच्छा आहे ?'

'माझी ?' काय उत्तर द्यावे हे कळत नव्हते. अन् तिकडे रमाबाईचे प्राण कानात आले होते. साहेब काय उत्तर देतात ? साहेबांनी नोकरीला लागतो असेच उत्तर द्यावे. डॉक्टराचे वकिल वडील, डॉक्टर जसे पैसे कमवतात तसे साहेबांनी नोकरी धरून पैसे कमवावेत खोऱ्याने. आणि डॉक्टर जसे समाधानी संतुष्ट दिसतात तसे दिसावे, असे रमाबाईंना वाटत होते.

'वडील पेन्शन घेतात. त्यावर शिक्षण चाललय...वाटते प्रोफेसर व्हावे...बॅरीस्टर व्हावे ..' साहेब जे बोलले ते रमाबाईंना कळले नव्हते. पण ते कोठल्यातरी मोठ्या नोकरीला लागू बघता आहेत असे वाटून त्या आनंदल्या. एक मूल झाले. येवढे शिक्षण झाले तरी दुसऱ्यावर अवलबून राहणे बरे नव्हे. एखादेवेळी आनंदरावांनी आपमान केला तर...

'ठीक...पण पैसा मिळतो वकिलीत. 'आच्छा.' डॉक्टरांनी बेलवर हात दाबला. आवाज झाला. तसे यशवताने रडण्यासाठी तोंड उघडले. भिमरावानी पांघरूणासह त्याला उचलून छातीशी घेतले. दुसऱ्या हाताने केसपेपर उचलून ते फिरले. रमाबाईंना आज फार समाधान वाटत होते. आज साहेब बरोबर होते, डॉक्टर चागले वागले होते, मनात जातीची जाणीव नव्हती, म्हणून भीती नव्हती, आणि साहेबानी काही तरी मोठी नोकरी पत्करण्याचे ठरविले होते. येवढे असल्यावर आनंद का होणार नाही ? त्या चटकन रूम बाहेर आल्या. दाराबाहेर जावून उभ्या राहिल्या.

साहेब जवळ येताच त्या म्हणाल्या—

'काय म्हणत होते दाक्तरसाहेब ?'

'तू ऐकत होतीस ना...? म्हणाले, बायकोला शिकवा,'

'मला कुठं समजलं हे ?'

'तुझं लक्ष नव्हतं.'

'मी विचार करीत होते...'

'कसला ?'

'तुमचा. आपल्या संसाराचा. आणि एक सांगू ?...' रमाबाई साहेबाकडे पाहून हासल्या. आणि खाली मान घालून चालू लागल्या. साहेब बघत होते. त्यांना या सुंदर हासण्याचे कारण कळत नव्हते. एक तर दवाखान्यात येण्याची त्यांची इच्छा नव्हती, कॉलेजात जायची घाई झाली होती, परीक्षा अगदी दोन महिन्यावर आली होती. लायब्ररीत बसून अभ्यास करायचा होता. साहेब भरकन् पुढे झाले. तश्या स्वत:शीच विचार करीत असलेल्या रमाबाई चपापल्या. साहेब हातून सुटले. त्यांच्या डोक्यात पुस्तक घुसले. आता ते येताना जसे रस घेवून ऐकत होते, बोलत होते तसे बोलणार नाहीत. त्यांना तर सांगितले पाहिजे. म्हणजे पुस्तकाऐवजी नोकरीचा, संसाराचा विचार डोक्यात बसेल. असे ठरवून रमाबाईने पाय उचलून साहेबाना गाठले. त्या जवळ येताच भिमरावानी घाईगर्दीने विचारले,

'बाटली ?'

'ती क़ाय कोटाच्या खिशात ?'

'माझ्या ?'

'मग...' रमाबाई गालातल्या गालात हासल्या. आत्याप्रमाणेच त्यांना नवऱ्याचे कौतुक वाटले होते. ते अगदी नादायला आल्यापासूनच वाटत होते. आज तर फार. साहेब औषध देणाऱ्या खिडकीजवळ गेले. केसपेपर बाटली पुढे करून ते उभे राहिले. तसा आतून कंपाऊडरचा आवाज आला — 'औषध पुढल्या खिडकीत घ्या साहेब...' भिमराव पुढल्या खिडकीकडे जाऊ लागले. जाताना त्यानी सहेतुक रमाबाईकडे पाहिले. त्या पाहण्याचा अर्थ रमाबाईंना कळला आणि आनंद झाला. त्या मनातल्या मनात म्हणाल्या — साहेब असंच पाहिजे...आणि त्या खूष झाल्या. साहेब यवढ्या मनमोकळेपणाने मुलाबाळात, घरससारात कधी लक्ष घालीत नव्हते. नेहमी पुस्तकात. त्यांना मुलासाठी कष्ट घेताना पाहून रमाबाईंना सुख वाटत होते. कारण असे प्रसंग क्वचित येत होते. येण्याचे दिवस असून देखील.

'ए... भिकू...' मागून एक हलका आवाज आला. त्या आवाजातील दाब पाहून रमाबाईंच्या मनाला चटकन भ्रमाचा स्पर्श झाला.

'इकडं ये लेका... तो ब्राह्मण दिसतोयना... तो. पोर घेऊन दवा घ्यायला उभा आहे तो...

'हा...'

'तो कोण आहे ?' आता रमाबाईंना पूर्णपणे भय वाटले. त्या घाबरल्या. अवघे सनातनी हिंदू साहेबाच्या विरोधात आहेत. त्याच्या वाईटावर टपलेले आहेत. प्राण घ्यायला देखील ते कमी करणार नाहीत. कारण साहेब शिकता आहेत. म्हणजे ब्राह्मणांच्या घरात शिरता आहेत. धर्माच्या विरोधी जाता आहेत. प्रत्येक वर्षाला पास होत पुढे जाता आहेत. मोठमोठी पुस्तक वाचता आहेत. हे ब्राह्मणांना, धर्माला कसे खपेल ? ते काटा काढल्याशिवाय राहणार नाहीत ? त्या दिवशी तो मराठ्याचा मवाली दारू पिवून काय बडबडत होता... त्याला कोणी सांगितल्याशिवाय ? किती शिवीगाळ करीत होता. महारं असे, महार तसे...

त्या सावध झाल्या. मागे वळून न बघता त्या साहेबाच्या सरक्षणासाठी हातातील पुस्तकाची थैली आवळून जराश्या पुढे झाल्या. कानात प्राण आणून हालचालीचा शब्दाचा सांसुद घेवू लागल्या.

'हां. तोच. तो पुढे आला तो. तो आपला जातवाला आहे.'

'नाय. आपल्या जातवाला आन असा– कवा पण नाही.'

'त्याचा मेव्हणा माझ्या चाळीत राहतो. ती त्याची बायको आहे... लय शिकलाय. घापाच गाड्या इतका. अजून शिकतोय. बडोद्याचे संभाजीराव म्हाराजच त्याच्या मागं हायेत...अन् देवधरम भी...'

असं. मग भेटलं पायजे. दर्शन घेतल पायजे...'

'नको. नको. इथ नको. लोक त्याला वळखतील. हिडीस फिडीस

करतील. तो पुणेवाला दाक्तर बापट त्याला आपला जातवाला समजून चांगला वागतो. बोलतो. नयत—आपल्याशी...'

'समाजल. चाल पुढं. अजून वयानं लय कवळा हाय नाही...'

'देवानं पाठवलंय... त्याची बहिण सांगत व्हतीना... सन्याशाच्या आशिर्वादानं... शुभ नखित्रावर त्याचा जलम झाला हाये...'

'मग देवदानव्यांतला असंल... माझी भी बायको आजारी असती. अन् पोरं जगत नाहीत, घरात नेहमी वखवख असती. पुरतच नही. दरशान घेतलं पयजे. गुण वाटंल...'

'येडा झायेस...'

'तू. तूला माहित नही. देव अवतार घेऊन येतो. आपल्याला कळत भी नाही... चल. बघ. दरशान घेतल्यावर कसा चमत्कार होतोय बघ...

ह्या संवाद ऐकून, त्यातील श्रद्धा भक्ती पाहून रमाबाई निवांत झाल्या. आपण साहेबाला देव म्हणून भजतो याचे त्यांना समाधान झाले. ते दोघे पुढे गेले. पुढे गेल्यावर दोघानीही रमाबाईजवळ येऊन उभ्या राहिलेल्या साहेबाकडे मागे वळून पाहिल्याचे रमाबाईंनी पाहिले होते. त्या आनंदात होत्या. आणि कॉलेजला जायला उशीर झाला आहे असे पाहून भिमराव वैतागले होते. ते वैतागून म्हणाले,

'घर या तुझ्या रडघाला. अन् हे त्याचे औषध. दिवसातून तीन वेळा द्यायचे. किती वेळ झालाय... परीक्षा जवळ आलीय... मला लवकर गेलं पाहिजे...'

'ते दोघं चाललेत ना... ते तुमच्याबद्दल बोलत होते.'

'काय ?'

'त्यांनी तुम्हाला ओळखलं. तुमच्याशी बोलावं म्हणून पुढं गेलेत.'

'म्हणजे...?'

आपला जातवाला आहे हे... अन् देवदानव्यातले आहात हे.'

'असं. वार्डबॉय दिसतात.'

'हां. इकडून जावू या...' रमाबाई म्हणाल्या. त्यांना साहेबाशी बोलायचं होतं. महत्वाचं सांगायचं होतं.'

'नको. चल त्यांना फसवल्यासारखं होईल.' हातात साहेबाची पुस्तकं घेवून जातवाल्या समोर जाणं बरं नाही म्हणून रमाबाई म्हणाल्या—

'यशवंत ?'

'असू दे.'

'अन् ही बुकं'

'ती तुझ्या जवळ राहू दे... त्यांना सांगल...' साहेब हसले. रमाबाई काही बोलल्या नाहीत. मागे झाल्या. साहेबामागोमाग जावू लागल्या. ते दोघे बाहेर आले. आवाराच्या जवळ मघाशी बोलणारे वार्डबॉय उभे होते. भिमराव, रमाबाईला बघताच ते दोघे पुढे आले. दोघांनी हात जोडले. आणि एक तर पटकन खाली वाकला. पायाला दोन्ही हात लावून कपाळाला हात लावून म्हणाला,

'महाराज, मी जातीच लेकरू आहे. अन् लय दुखीकष्टी आहे... मला आशिरवाद द्या...'

रमाबाई मागे होत्या. त्यांनी पटकन तोंड फिरविले. आलेले हासू दाबले. भिमराव गोंधळून त्याच्याकडे बघत राहिले.

'मही पोरं जगत नही. बायको सदा आजारी असती. अन् कितीभी धडपड केली तर दोन पैसे मिळत नहीत. पगार पुरत नही...' भिमराव बघत होते. काय बोलावे आणि कसे बोलावे हेच त्यांना कळत नव्हते. अंगावर साधूची भगवी कपडे नव्हती. उलट सोबत पत्नी आणि मुलगा असूनही हा माणूस हे काय सांगतोय, आशिर्वाद का मागतोय हे भिमरावांना कळत नव्हते...

'तुम्ही धापाच गाड्या विद्या शिकलत... पुण्यवान आहात, तवा तुमचा आशिरवाद कामाला येईल... मह गरीबाचं भलं होईल...' आता भिमराव यांना तो आशिरवाद का मागतोय हे कळले. म्हणून त्यांनी त्याला विचारले,

तुला दहा पाच गाड्या विद्येची गोष्ट कुणी सांगितली ?

'सुष्का ने... यावे...'

'माझ्या आशिर्वादाने तुला समाधान वाटेल ?'

'हां. साहेब.'

'मग दिला.. आता जा.'

'माह्या बायकोला आणू दरशानाला ?'

'त्यांना पण दिला... मला कॉलेजात जायच आहे... जाऊ ?' आणि ते पुढे झाले. तसे ते दोघे बाजूला झाले. साहेबाच्या पाठोपाठ रमाबाईही पुढे आल्या. काही न बोलता काही पाऊले चालून आल्यावर त्या हळूवार आवाजाने म्हणाल्या,

'पटापटा आशिर्वाद दिलेत...'

'मग भाडत बसू. त्याला माझे म्हणणे पटलेच नसते. मी त्याला त्रास व्हावा, देवाने, दैवाने त्या दिलेले दुःखदैन्य आहे ते तसेच राहावे, किंवा मला तसे काही फेरबदल करण्याचे सामर्थ्य नाही असा त्याने गैरसमज करून घेतला असता. तो दुःखी झाला असता. त्याला समाधान होतेय ना... होवू दे... म्हणून दिला आशिर्वाद.'

'मला पण द्या...'

'दिला...'

'मी मनात काय मागितलं माहित आहे ?'

'मला माहित आहे.'

'सागा बरं.'

'मी पास व्हाव. अन् तुला मुलगे व्हावेत... आणि'

'काय ?'

'तू सांग.'

'ऐकाल... तुम्ही पास व्हावं. नोकरीला लागावं. मोठ्या पगाराच्या. फार मोठ्या. एवढ्या शिकशानावर ती मिळणारच. मामंजी देणार आहेत... मग आपण मोठा बगला बाधणार. नोकर चाकर, गाडी घोडे... सगेसोयरे... सर्व घरात भरपूर असणार. अगदी शेतासारखे .. आनंदी आनद.'

'तुला खूप कळतय...'

'तुमच्या सावलीखाली राहून येवढं कळणारच...'

'अग पण...'

'माझ्या शिक्षणाला सर संभाजीराव महाराज मदत करता आहेत. त्यांची इच्छा काय आहे... ते म्हटले, उच्च शिक्षण घेण्यासाठी परदेशात जा... तर काय करायचं ? जाव लागेल ?...

'आणि मला दुसऱ्याच्या मेहरबानीवर ससार करावा लागेल.'

'दादा काय दुसरा झाला ?'

'ते चांगले आहेत. लक्ष्मीबाई चांगल्या आहेत. आत्या मामंजी चांगले आहेत...'

'म्हणजे मी वाईट आहे?...

'असं पाप माझ्या मनात कसं येईल. आपणाला एक झालं, दुसरं मूल होणार...'

'दुसरं...?' रमाबाई हासल्या. तसे भिमराव भडकून म्हणाले,

'हासतेस काय...?'

'हो.'

'हो काय?' रमाबाईने खाली मान घातली. पण त्या खूप आनदीत दिसत होत्या.

'मी काय विचारतोय?'

'तेच. एक महिना झाला...'

'हे सांगायला मला घेवून आलीस...'

'तुम्हाला फुरसद कुठं असती...? तुम्ही आपल्याच नादात. अन् मामंजी म्हणतात, त्यांना अभ्यासाची आठवण करीत जा...साहेब ही परीक्षा पास झाले की, आपलं नशीब उघडलं. ते म्हणतात, मी साहेबाला मोठ्या हुद्याची, मोठ्या पगाराची नोकरी लावून देणार. मग बघ रमा, वर्षा दोन वर्षात बगला येणार, गाडी घोडे येणार... गोकूळासारख आपल घर भरणार...सोगेसोयरे, गरीब बिचारे, शाळा शिकणारी मुले, साधू-संन्याशी आपल्या घरात सर्वांच्या भोजनाची सोय होणार...'

'छान स्वप्न आहे. तुझं की बाबाचं...'

'त्याचं, माझं, आत्याचं, बाईच, सर्वांचच.

मला तर फार फार फार सपनं पडतात...' रमाबाई त्यांच्या स्वप्नात शिरू लागल्या होत्या. त्याच्या चेहेऱ्यावर स्वप्नांच्या कला पसरू लागल्या. डोळे मधूर झाले. स्वप्न सांगण्यासाठी त्या अधीर होऊन गेल्या. त्यामुळे त्या सुंदर दिसत होत्या. भिमरावाना त्याचा प्रसन्न सुंदर झालेला चेहेरा पाहून स्वप्न ऐकण्याचा मोह होत होता. पण आता हे ऐकून उपयोग काय? त्यांच्या स्वप्नाप्रमाणे घडले नाही तर त्याना केवढे दु:ख होईल. रमाचे कळू शकते. पण बाबाही अशी स्वप्ने कसे बघतात. आणि घरात कशी सांगतात. ती स्वप्ने या देशात खरी कशी काय होतील? हा काय युरोप आहे? हा तर हिंदुस्तान. इथे मला त्याच्या स्वप्नाप्रमाणे पैसा मिळेल? ती नोकरी मिळेल? मिळाली तर करू दिली जाईल? आणि साहेब विचारात होते. आणि रमाबाई स्वप्नात होत्या. इतक्यात स्वप्नातील साहेबाप्रमाणेच भिमरावानी हाक मारली—

'रामू...' आणि ती प्रेमाने ओथंबलेली हाक ऐकून रमाबाई आनंदाने मोहरून आल्या.

'काय ...' त्यांनी विचारले. त्यांचे डोळे, चेहरा त्याच्या अंत:करणातील साहेबाविषयीच्या प्रेमभक्तीने, आनंदाने उजळून उठला होता.

'घर याला. लाडाला. खुशाल झोपलाय...' पत्नीला पहिले वाक्य कठोर वाटले आहे असे वाटून त्यांनी पुढील शब्द जोडले. आणि ते जोडताना त्याचे अत:करणात करुणेचे, दुख:चे थेंब टपटपत होते.

'का झोपणार नाही. बापासारखा. बापाला मामंजीने अगावर घेतल्याशिवाय झोप लागत नव्हती. तसं...'

'म्हणजे...माझ्या बालपणाच्या सर्व गोष्टी तुला माहीत झालेल्या दिसतात.'

'तर. दुपारी...तुम्ही कधी लवकर घरी आले नाही म्हणजे आत्या सांगतात. काल परवा आत्यानं ती झाडावर अंधार होईपर्यंत दडून बसल्याची, रडारड सुरू झाल्यावर वरून धपकन उडी टाकल्याची गोष्ट एवढी चांगली सांगितली, तर मला पहिल्यादा रडूच आलं अन् नंतर हसू आल. उडी टाकल्यावर...'

भिमरावाच्या चेहऱ्यावर स्मितरेषा उमटली, तशा रमाबाई पटकन म्हणाल्या, आत्यानं त्या खेकडी, मासे भाजून खाण्याच्या गोष्टी पण सागितल्या...

'असं. आज मनातलं आहे तेवढं सांगायच ठरवून आलीस वाटतं.'

'तुम्ही बोलता कुठ?'

'आता धर. कॉलेजला गेलं पाहिजे. एकटी बरोबर जाशील ना, की येऊ बरोबर?'

'चला, खाऊन श्री जा.'

'नको. इथूनच निघतो...धर.'

'कसा घेऊ?'

'म्हणजे?'

'माझे दोन्ही हात गुंतलेत.'

'थैली खाली ठेव.'

'थैली खाली ठेवू?'

'ठेव ना...'

'कशी ठेवता येईल. तुमची विद्या आहे थैलीत अन् परीक्षा जवळ आलीय. विद्यादेवीला काय वाटेल...'

'काही वाटणार नाही. अनाडी आहेस.' साहेब वैतागले. तशा रमाबाई हसत म्हणाल्या,

'मला शिकवा.'

'शिकवीन...परीक्षा झाल्यावर. धर. थैली खाली ठेव. थैली माझ्या हातात. उशीर फार झालाय.'

'विद्या खाली कशी ठेवायची? परीक्षा अजून झाली पण नाही. हातात घ्या. ही बाटली पण...'

'दे, जाऊ दे...' रमाबाईने काळजीपूर्वक हातात थैली दिली. नंतर बाटली दिली आणि दोन्ही हात मोकळे होताच मोठ्या लाड-कौतुकाने यशवंताला उचलून घेतले. हृदयाशी धरले.

'मी हात लावताच डोळे उघडलेस...बघतोय कसा न्याहाळून. साहेब चालले बघ...'

'जातो.' भिमरावने घाईने हातातील औषधाची बाटली रमा-बाईच्या हातात दिली आणि ते पाय उचलणार तोच पाठीमागून हाक आली,

'भिवा'

तसे दोघानीही मागे वळून पाहिले. चार बायकांच्यापुढे काळविटा-सारखा एक पुरुष होता. नजरानजर होताच त्याने वर हात केला होता. त्याचे हसणे भिमरावांना ओळखीचे वाटले. ते आठवू लागले,

'अग, कॅप्टन लक्ष्या दिसतोय...' लक्ष्मण आपल्या चारी बायकांना पाय उचलायचे सांगून झपाझप पावले टाकीत येऊ लागला. त्याचे मोठमोठे कुरळे केस, भरपूर उंची, दणकट शरीर

प्रकृती, काळा रंग, राकट चेहरा, ओठावर मिशांचा पुंजका आणि त्याचे उद्धट चालणे पाहून रमाबाई घाबरून गेल्या. विचारात पडल्या.

'साहेब, मवाली दिसतोय...'

'माझा बालपणाचा दोस्त आहे तो...लक्ष्या...मागं एवढ्या बायका कशा ? त्याच्या घरातील कोणी दिसत नाही...'

'आपल्याकडल्याही दिसत नाहीत...काय भानगड आहे ?'

'कळेल आता. तो भडभड्या आहे. त्याच्या मनात काही राहात नाही. फार गोड स्वभावाचा आहे.'

'दिसायला असा.'

'सुभेदार दाभोळकर माहीत आहेत...त्यांचा मुलगा. बाबांच्या चांगल्या ओळखीचा. महाडला आम्ही एकत्र खेळलो. मुंबईला पण डबक चाळीत...'

'तुमच्या वयाचा आहे.'

'असेल दोन तीन वर्षानं मोठा. पण उंच होता, दणकट होता. हॉकीचा कॅप्टन. क्रिकेट खेळे...मारामाऱ्या तर तो अन् मी असल्या-वर चांगल्या रंगत. आम्ही भारी भरत असू...अरे...ए कॅप्टन, किती दिवसांनी भेटतोयस लक्ष्मण. कॅप्टन...'

'कॅप्टन लक्ष्या...' तो माणूस सरळ आला आणि दोन्ही हाताची कव पसरून त्याने साहेबाला मिठी मारली.

'कुठं होतास इतके दिवस ?'

'कधी तुरुंगात, कधी फरारी, कधी मुंबईस...हा माझा कळप. माझ्या बायका. मुमताझ आली नाही. ती धरून पाच. पाच जिल्ह्याच्या, दोन धर्माच्या, तीन जातीच्या.'

'पाच ? थोर आहेस ?'

'अजून असतील...'

'करतोस काय ?'

'दादागिरी. पट चालवतोय. असंच. या दोघी कामाला आहेत. एक गिरणीत, एक गोदीत. गंगे पाया पड...साहेबाच्या, वहिनी-साहेबाच्या–अरे, तू लय शिकलायस म्हणत्यात...एकदा सुडक्या भेटला व्हता...सांगत व्हता.'

'अजून बी. ए. सुद्धा नाही.'

'म्हंजी ? अग, लवकर एक एक पुढं व्हा. पाया पडा. का पट्टा काढू ?' त्या चौघीही पटकन पुढे झाल्या. एक खाली वाकली तसे भिमराव म्हणाले, 'नको–नको...'

'पडू दे. त्यांचं नशीब उघडलं म्हणून तू दिसलास. नाहीतर त्यांचं डोकं माझ्या सारख्याच्या पायावर...कधी सुऱ्यावर. आटपा लवकर.'

'नको रे.'

'असू दे.' चारी बायका त्या दोघा पती-पत्नीच्या पाया पडून मुकाटचाने बाजूला घोळक्याने उभ्या राहिल्या.

'त्या झाडाखाली जाऊन उभ्या रहा. वयनीसाहेब तुम्ही जाल ? आत्ता पाठवून देतो सायबाला...'

'जाईल ती. तू जा...' रमाबाईचे जाण्याचे मन होत नव्हते. मवाली माणसाचे काय ? पशू प्रमाणे केव्हा उलटेल याचा नेम नाही. तरी त्या पुढे झाल्या. कारण त्याने त्याच्या चारी बायकांना पाया पडाया लावले होते आणि त्यांना प्रेमाने मिठी मारली होती. रमाबाई दूर गेल्यावर, बाबासाहेब कॅप्टन लक्ष्मणच्या हातात हात धरून म्हणाले,


## बँक ऑफ महाराष्ट्राची संचित ठेव योजना

आपले पैसे सुरक्षित राहून वाढत राहावेत अशा हेतूने 'संचित ठेव' योजनेची निर्मिती झाली आहे.

या योजनेत आपणास आपल्या संचित ठवीवर दर सहा महिन्यांनी व्याज देण्याऐवजी व्याजाचा हिशेब होऊन मूळ रकमेत भर घातली जाते. त्यामुळे ठेव फुगत जाते व वाढत्या ठेवीवर अधिकाधिक व्याज जमा होत जाते.

१००।– रुपये १८ महिने ठेवल्यास ११०।– रुपये मिळतात व ६९ महिने ठेवल्यास १५०।– रुपये मिळतात.

आपण रु. १००।– अथवा त्याच्या पटीत रक्कम आमच्या 'संचित ठेवी' योजनेमध्ये गुंतवा.

अधिक तपशील आमचा शाखाधिकारी देईलच.

**बँक ऑफ महाराष्ट्र**

**हेड ऑफिस : ११७७, बुधवार पेठ, पुणे २.**

[Impress]

'बोल...'

'काय बोलू ?...हे असं आहे. होतो कुठे, आलो कुठे?'

'सुभेदार कुठे आहेत ?'

'मुलखाला आहेत. सारखी शिवीगाळ करीत होते.मला. दुसऱ्यांना. म्हणून दिले पाठवून. माझी बायको आहे. करते. पण तिलाही शिवी-गाळ करतात. वेड्यासारखे वागतात...

'का ?'

'करणी केलीय. मला तर चेडे घातलेत. पोटात. काळजात सारखी हुरहूर असते. बेचैनी असते, चीड येते, संताप येतो. त्याच्या भरात मारामाऱ्या करतो, वाटेल तसा वागतो, पितो, मारतो, बायकांना जवळ करतो. ह्या पाच जणी, दुसऱ्या बी असतात. पण मन शांत नाही. कुठं रमतच नाही. पाचजणी पाच जातीच्या आहेत. मुमताज तर हैद्राबादची मुसलमान पोरगी आहे. देखणी आहे, पण चैन नाही...'

'अस...'

'हातून खून पण झाले. सुपाऱ्या घेऊन केले, तेव्हा पासून तर अधिक हुरहूर लागलीय. अधिकं ओढ लागलीय. बायकाची...'

भीमराव ऐकत होते. विचार करीत होते. त्याला जे शब्द सुचले त्याच्या द्वारे त्याने सांगितले पण त्याला जी अस्वस्थता वाटतेय, बेचैनी वाटतेय, तसेच आपणाला वाटतेय. असे का व्हावे ? महाराच्या ठायी ही बेचैनी सार्वत्रिक आहे की काय ? दारू, बाई, कठोर भक्ती, देव देव, आध्यात्मिक ओढ, ईर्षा, स्पर्धा, झगडे ही सर्व मंडळी या बेचैनीची बाळे आहेत. पण ही बेचैनी का आहे ? कोणाची आहे ? अस्पृश्यतेतून ती आली आहे ? अवमानाने, अवहेलनेने दिली आहे ? आभावातून ती जन्म घेतेय...

लक्ष्मण निरिक्षर. पण त्याचा बाप चांगला नॉर्मल. परीक्षा पास. सुभेदार. अँग्लो अफगाण युद्धात लढलेला. अनेक पदके, पदव्या मिळालेला. लक्ष्मणला सैन्यात जागा मिळाली असती तर तो असा झाला असता. खेळात, मारामारीत तो प्रवीण, पहिला. लक्ष्मणची जागा सैन्यात, रणमैदानावर, मरण्यासाठी, मारण्यासाठी. तो शूर वीराचा बच्चा आहे. ते रक्त त्याच्या अंगात आहे. त्याला तिथे वाव आहे. पण त्याला सैन्यात जागा नाही. कारण तो हिंदू धर्मात जन्मला आहे म्हणून महार आहे. महार आहे म्हणून तो सैन्यात नाही. आणि आतल्या प्रवृत्तीप्रमाणे जगता येत नाही म्हणून तो असा आहे. अंगातली युद्धप्रवृत्ती मिळेल तिथे व्यक्त करतो आहे ?...असेच होणार आहे ? झाले आहे ? प्रत्येक तारुण्य, उत्साह, चैतन्य, सद्गुण बुद्धिमत्ता अशीच सडून, कुजत मारली गेली आहे ? आणि तशीच पुढे मारली जाणार आहे ? का ? का ? काय गुन्हा आहे ? इथे जन्म घेतला म्हणून...

विचार करता करता भीमरावांच्या अंतःकरणात खळबळ होऊ लागली आणि चीड सतापाच्या आणि दुःखाच्या भावनांची आत गर्दी होउ लागली. तशी बेचैनी वाढू लागली. उद्वेग येऊ लागला, पण करायचे काय ? याला मार्ग काय ? आपण काय करणार ? मार्ग दिसत नव्हता. उपाय सापडत नव्हता. फक्त आत, खोल दरीत पडलेल्या माणसाला जसे असहाय वाटते तसे त्यांना असहायसे, पोरके पोरकेसे वाटू लागले. आणि अंतःकरणात आसवासारखे काहीतरी जमून येऊ लागले. त्याला सोडून जावे असे वाटू लागले.

'लक्ष्मण...' ते निरोप घेऊ बघत होते. पण निरोप न घेता त्यांनी त्याला विचारले,

'नोकरीला कुठे आहेस ?'

'नोकरी ? पुष्कळ केल्या, सोडल्या. साल्या अपमान करायच्या. शेवटची बरी वाटली. रेल्वेने वॉचमनमध्ये ठेवले. खादी युनिफॉर्म कट, वर टोपी, हातात बदुक...पितळी बक्कल...बरे वाटले. असाच नोकरीवर असताना गेटवर डुटी आली. इतक्या दिवसात माझ्या कडकपणाची रेल्वेत माहिती झालेली होती. मवाली, रेल्वेचोर मला टरकून असत. त्यामुळे बरेच लोक माझ्यावर नाराज असत. मला पाण्यात बघत. त्यामुळं मी कोण, माझी जात काय हे सर्वांना माहित झालं होतं. तर गेटवर मी डुटीवर होतो येईल त्याची झडती घेत होतो. इतक्यात एक कलार दुरून वरडला, 'तू माझ्या अंगाला हात लावू नको... मी विचारलं, माझी डुटी हाये. अन झडती घेतल्या बिगर मी जाऊ देणार नाही. तसा तो म्हणाला, मी कलार आहे. ब्राह्मण आहे. मला बाटवू नको..हे ऐकताच माझं डोकं फिरलं. जागा सोडून मागं गेलो अन् दिली खाडकन कानशिलात ठेवून. तो बोबलला. तशी दुसरी दिली. तसा खाली कोसळला, ओरडला मला म्हारानं मारले... तशी लाथ घातली...खलास...'

'मेला ?'

'मेला नाही. नोकरी गेली. तेव्हापासून डोकं जास्तच फिरलं, कोणाला बी मारतो. रुबाब दाखवला की ठोकतो. कोणी मग्रूर बोचून बोलला की जीव जाई परेंत मारतो. असाच एक यांग्लो इंडियन पोलिस इन्सपेक्टरला मारला. जीव जाई परेंत. ती गोरी... देखणी दिसतेय ना...जाडीशी नि तवा भाजीपाला विकी. तिच्या जवळ जाऊन तो माजूरी बोलला, 'निजायला देती का...मी एकलं अन् त्याच्यावर, मारला लय. शेंदरात मारुती दिसतो तसा त्याला लालभडक केला. मला कैद केलं. खूप मारलं, केस झाली, सजा झाली ती तुरुगात येऊन भेटू लागली. सुटायच्या दिवशी नटून थटून तुरुगाच्या दारावर. तिथून माझ्या संग सरळ घरी बायको म्हणून. चागली आहे. खूप सेवा करती, जीव टाकती, पण माझं मन लागत नाही....कशातच.'

'बरोबर आहे.' भीमराव विचारमग्नपणे म्हणाले.

'काय म्हंतोस ?'

'तू माझ्याप्रमाणंच चूक केलीस.'

'कोणती ?'

'इथं जन्म घेण्याची.'

'म्हजी ?'

'तू महार म्हणून तू असा. तू असा याला कारण तू इथे जन्माला आलास.'

'म्हजी ? समजून साग.'

'तू लढवय्याचा मुलगा आहेस. तुझा बाप शूर. त्याला जे हवे होते ते त्याला मिळत नव्हते म्हणून तो शिव्या देत होता. तू शूर, तरुण, तुला रणभूमी पाहिजे. ती मिळाली तर तू असा अस्वस्थ नसता. लढाई हा तुझा स्वभावधर्म आहे. ती खरी लढाई मिळत नाही म्हणून तू मारामाऱ्या करतोस. खून करतोस. खूप बायका

करतोस...तुला लढाई पाहिजे. गती पाहिजे...मारूतीसारखा तू रक्ताने लालभडक व्हायला पाहिजे...

'हा. मला मार पडला. म्हंजे मला मजा येतो...'

'तेच. तेच म्हणतोय मी. पण तू पडला महार. म्हणून तुझी, तुझ्या धर्माची कुजवणूक होते आहे. तुला संधीच नाही. मलाही मिळेल का नाही याची शंका आहे...बायको, भावजयी, भाऊ, बाबा, आत्या स्वप्नं बघतात...श्रीमंतीची. सुखाची. वैभवाची...पण हे मला कसं मिळेल...माझी जात काय ? ती कशी विसरता ? कोण माझ्या जातीचा मोठा झालाय ? का झाला नाही...'

...त्याला काही येत नव्हतं म्हणून ? तो जनावर होता म्हणून ? त्याला मोठं होऊ दिलं नाही म्हणून...अन मला होवू देतील... बायकोला कळत नाही. पण बाबाला काय समजत नाही ? तेवढा त्यांचा ब्रिटीशावर-इथल्या राज्यकर्त्यावर विश्‍वास आहे ?...'

भीमरावाच्या वेदनेने, व्यथेने, तीव्र झालेल्या आवाजाने लक्ष्मण अस्वस्थ होऊन गेला. अधिक अस्वस्थ होवू नये, आणि इथेच डोके फिरू नये म्हणून तो म्हणाला,


'मला जाऊ दे...आतले चेले उठलेत...डोकं फिरायला लागलंय.'

'जातोस. मलाही उशीर झालाय. अच्छा भेटू असेच...' भीमराव पुढे झाले. लक्ष्मण उभा होता. बघत होता. त्याला वाटत होते, हा खूप शिकलेला, सज्जन मित्र देखील आपल्या प्रमाणेच दुःखी आहे... जळतो आहे. तो तोंड फिरवून त्याच्या बायकांच्याकडे गेला. तो पुढे आणि त्यामागे चालू लागल्या. 'पाय उचला...' तो ओरडला.

भीमराव चालले होते. विचार करीत होते. बाबा ही चूक का करतात ? रमाला, आत्याला भाऊ-भावजयीपुढे हे मोहजाळ का निर्माण करतात ?...त्यांना माहीत नाही, मी महार आहे ? अस्पृश्य आहे ? अस्पृश्याला या देशात एवढा तरी वाव आहे ? कुठेय ? एवढे वाचले. पण कुठे आढळले नाही...मी करीन. असे त्यांना वाटते. मला मिळेल अते त्यांना पटलेय...केवळ ज्योतिषाच्या जोरावर...? पण निराश तरी का व्हावे...चला. परीक्षा जवळ आलीय. भवितव्याच्या उदरी काय असेल ते असो. सर म्हणतात तसे, आपण आपले कर्तव्य कर्म करावे. केले पाहिजे...एवढ्यांचे आशाळभूत डोळे आपल्यावर लागलेले आहेत.

भीमराव भराभर पाय उचलू लागले. कॉलेजात जायचे होते. आपली जवाबदारी पार पाडलीच पाहिजे.

# समुद्र



साहेबाचे स्नान चालले होते तेव्हा रमाबाई पटकन पलीकडील खोलीत झोपलेल्या यशवंतला पाहून आल्या. सोबत अंग पुसायला धोतरही घेऊन आल्या. साहेबांचे स्नान मुकाट्याने चालले होते. गाणे नव्हते, की काही गुणगुणणे नव्हते. बोलणेही नव्हते, मुकाट्याने अंग पुसून साहेब धोतर कमरेला गुंडाळून बाहेर आले. त्यांनी आपल्या काळ्याभोर कुरळ्या केसावरून हळूवारपणे गुलाबी तळवा फिरवला तेव्हा रमाबाईंना आनंद झाला.

ते धोतराची लुंगी लाऊन पलीकडल्या खोलीत कपडे करायला गेले. तशा आंघोळ होईपर्यंत बाहेर थांबलेल्या बाई आत आल्या. रमाबाई ताटपाट मांडीत होत्या.

साहेब कपडे करून आले. ते गंभीर चेहऱ्याने...नाहीतर नेहमी गाणे गुणगुणत ते पाटावर येऊन बसत. आता गाणे आठवत नाही याचा अर्थ साहेब कसला तरी गंभीर विचार करीत आहेत हे रमाबाईंनी ओळखले. साहेब कसला विचार करीत आहेत ?... परीक्षेचा निकाल उद्यावर आला आहे त्यांचा ? नोकरीचा ? थांबून रमाबाई बाहेर गेल्या. यशवंताला पाहून आल्या. यशवंत झोपलेलाच होता. त्या परत आल्या. सारे जेवतच होते.

साहेबांचे जेवण झाले. ते उठून बाहेर गेले. ते दाराबाहेर पडल्याचे पाहून लक्ष्मीबाई म्हणाल्या,

'भांडलास काय ?' हा प्रश्‍न ऐकून रमाबाई हसल्या आणि त्यांनी जावेला उलट प्रश्‍न केला, 'मी'?

'मग साहेब रुसलेत'

'उद्या त्यांचा रिझल्ट आहे ना...'

'म्हणूनच...जा. पळ. रुमाल, पैसे देवून ये. नाहीतर जातील आपल्याच नादात. मग मामंजी विघडतील...

हे ऐकताच रमाबाई पटकन उठल्या. वळचणीवर वाळत असलेला रुमाल ओढला. पटकन घडी केली. बरणीतून पैसे घेतले. आणि पाय

उचलून बाहेर धाव घेतली. जावेची गडबड बघून लक्ष्मीबाईंना हसू येत होते.

दुसऱ्या खोलीत साहेब झोळी जवळ उभे होते. झोळीत झोपलेल्या यशवताकडे बघत केसावरून हळूवारपणे फणी फिरवीत होते. त्यांचे मुलाजवळ उभे राहणे पाहून रमाबाईंना खूप सुख वाटले. त्या आत गेल्या. त्यांच्या पायातील जोडव्याचा आवाज ऐकून साहेब मागे वळले. आणि रमाबाईकडे बघत त्यांनी विचारले,

'बाबांनी सकाळी माझ्यासाठी काय उपदेश सागितला–'

'लवकर घरी या.'

'हा हुकूम कोणाचा ? बाबाचा की तुमचा ?'

'राती सपन वाईट पडलं'

'तुला माझ्या बद्दल ?' रमाबाईंनी मानेने होकार दिला. तसे साहेब म्हणाले,

'सारखा विचार करीत राहिल्यावर स्वप्न पडणार नाही काय ? दुसरा काही विचार करावा. शिकवतो म्हटलं, तर शिकेनास...'

'परवा परिक्षाच कळणार आहे...काळजी वाटते...'

त्या काळजी का करतात याचे स्पष्टीकरण व्हावे म्हणून त्या म्हणाल्या.

'निकाल कोणाचा लागणार आहे, माझा की तुझा ?'

हे ऐकून रमाबाईंना हसू आले असते. पण पडलेल्या वाईट स्वप्नाच्या आठवाने आणि साहेबानी उच्चारलेल्या निकाल कोणाचा लागणार आहे या वाक्याने त्या व्यथित झाल्या. साहेबांकडे त्यानी रागाने पाहिले. त्यांना राग का आला आहे हे भीमरावानी ओळखले तसे ते हसत म्हणाले,

'माझ्या परिक्षेबद्दल बोलशील तर मी पास होणार. अगदी शपथेवर सांगतो. पण तू नापास. बी. ए. पर्यंत शिकलेल्या मास्तरा जवळही तू शिकू शकली नाहीस' रमाबाई प्रसन्न असत्या तर त्यांनी त्यांचे शिकवणे कसे आरडून ओरडून, बोंबाबोंब करून असते ते सागितले असते. चुकले तर केवढ्या मोठ्याने हसतात. साऱ्या गावभर ऐकू जाईल असे. असे शिकवणे असते ? चाळीतील लोक काय बोलतील ? हे सारे सांगितले असते. बायकोला शिकवताना, मुलांना शिकवतात असे शिकवायचे नसते हे पटवून दिले असते. रमाबाई काही बोलल्या नाहीत, तेव्हा साहेबच बोलले,

'मी पास होणार. नोकरीला लागणार. तुमच्या हाती पगार देणार, येताना भाजी, बोंबील घेऊन येणार.'

मोठा पगार झाल्यावर साहेब अन भाजी बोंबील घेऊन येणार... साहेब लोक काय स्वत: बोंबील आणतात...रमाबाईच्या चेहऱ्यावर बारीकशी स्मितरेषा उमटून क्षणभरात लुप्त झाली. चेहरा करूण गभीर झाला आणि त्यानी हळहळ व्यक्त करीत विचारले.

'तुम्हाला पास होऊ देतील ?

'का ? शका का आली ? ? आतापर्यंत झालो नाही ? म्हणजे होऊ दिले नाही का ?

'ही मोठी परीक्षा आहे.'

'म्हणून काय झाले ?'

'आपली जात...'

'चांगली आहे. शूर विरांची आहे.'

'म्हणून म्हते...राती सपान पण असंच पडलं...'

'कस ?'


'तुम्ही कलीक्टर...'

'रामू...साहेबाचे डोळे स्नेहमधूर होऊन गेले होते. त्या डोळ्यातील उत्कट स्नेह, प्रेम पाहून रमाबाईंना धन्य धन्य वाटले. त्यांच्या मनात आले, एवढ्या मोठ्या पुरुषाचे आपल्यावर किती प्रेम आहे. आपले भाग्य किती थोर. नशीब थोर म्हणून एवढा सुंदर, एवढा गुणी, एवढा बुद्धीमान पती आपल्याला लाभला नाहीतर माझ्यापेक्षा सुदर मुलीची काय परवड असते. कोणाचा नवरा दारू पितो, कोणी नोकरीधदा करतच नाही. कोण संशयी होऊन मारपीट करतो. जीव घेतो...कोणी टाकून देतो. आणि त्या मेल्यांची लायकी तरी काय ? साहेबाच्या जोड्या एवढीही नाही. एवढे मोठे साहेब गुणाने, रूपाने स्वभावाने जसे देव लोकातले. आणि आपण...आपण गरीब सामान्य, आईबाप गरीब. बाप हमालीच्या पाट्या वाहता वाहता मेला. आई आधीच मेलेली. भाऊ गरीब. आपण अनाथ चुलत्या, मामाच्या मेहरबानीने जगलो. आणि एका थोर घराण्यात येऊन पडलो. मामंजी, आत्या किती प्रेमळ. जाऊबाई कशी बहिणीसारखी दीर तर संताप्रमाणे शांत...

आणि साहेब, रमाबाईंचे अंत:करण प्रेमाने उचंबळून आले. त्यांना वाटले एवढी उत्कट हाक मारणाऱ्या साहेबाच्या पायावर कोसळून पडावे. मरून जावे. या मरण्याएवढे सुख, वैभव दुसरे नाही. त्यानी समर्पित होऊन डोळे उचलून वर पाहिले. तसे साहेब पुढे सरकले होते. त्यांचा चेहरा मधूर झाला होता, ते त्याच्या अंगाला उमदेपणाने स्पर्श करतील म्हणून लाजून रमाबाई मागे सरकल्या. त्यांना साहेबांनी मारलेली हाक डोंगराएवढ्या सुख आनंदाची वाटली होती. पण ती साहेबानी मोठ्यांनी मारली होती. कोणी ऐकले की काय म्हणून त्यांनी मागे वळून पाहिले. साहेब आपल्याच तंद्रीत होते. ते रमाबाईकडे बघत म्हणाले,


'तू फार मोठ मोठी स्वप्ने बघतेस रामू...माझे शिक्षण एवढे झालेले नाही. आणि मला मेहरबानीवर काहीही नको आहे. मी मोठा होईन माझ्या ताकदीवर. कोणी असे म्हटले नाही पाहिजे, योग्यता नसताही मी या हुद्यावर गेलोय. मोठ्या पदावर चढलोय. बाबा, माझ्यासाठी वणवण करताहेत. मला पसंत नाही. नोकरीची भिक्षा कशाला मागायची ? आणि या लोकांजवळ... ज्यांना कदर नाही–संपत्ती आणि सत्तेशिवाय ज्यांना काही कळत नाही त्यांचे जवळ... ते कोण आपल्याला देणारे ? परके. हे नीच बदमाश जातीभेद करून बसले नसते तर हा सोन्याचा देश त्याच्या हातात पडता... हा अशोकाचा देश...तो या हिंदू लोकांनी धुळीला मिळवून टाकला. केवळ पोट आणि अहंकार पोसण्यासाठी...साहेबांचा आवाज तीव्र झाला होता. तरी त्यात एक व्यथा जाणवत होती. ती ऐकून रमाबाई गोंधळून गेल्या. साहेबानी एवढे दु:खीत का व्हावे, एवढे का सतापावे, हे त्यांना कळेना. इतिहासातील त्यांना काही माहित नव्हते. म्हणून नेमके काय बोलावे हे त्यांना कळेना. बोलण्याची–चागले बोलण्याची त्यांना आत्यतिक गरज वाटत होती, साहेबाना शातता पोहचविण्याची त्याना सुखी समाधानी ठेवण्याची त्याची जबाबदारी आहे. दिवसातून अनेक वेळा देवाला ते सागितले आहे. त्याचेकडून सेवेचे

पृष्ठ ३७ वर



**'जोनाथन लिव्हिंग्स्टन सीगल स्टोरी' या सुप्रसिद्ध पुस्तकाच्या लेखकाचा व कथेचा परिचय (पूर्वार्ध)**

**रिचर्ड बाश**



## उडण्याचे वेड मला !

प्रत्येक माणसाचे आयुष्य म्हणजे बऱ्या वाईट प्रसंगांनी भरलेला एक चित्रपटच असतो. जागृतावस्थेत त्याच्या कानांवर निरनिराळ्या ध्वनिलहरी आदळत असतात. अंतर्मनातील लहरींवरही नानातऱ्हेचे विचार तरंगत असतात. जीवनाचा अर्थ सापडला की, कसला तरी छंद, वेड माणसाला लागते. अंतर्मनातील चैतन्याची त्याला जाणीव होते. पण हे वेड–हा छंद लागेपर्यंत माणसाचे मन कसलातरी शोध घेत असते व ते करीत असतानाच बऱ्यावाईट प्रसंगातून त्याला जावे लागते.

रिचर्ड बाश या अमेरिकन गृहस्थाच्या आयुष्यातील छत्तीस वर्षे जीवनाचा अर्थ शोधण्यात खर्च झाली. हवाई दलात वैमानिक म्हणून त्याने काम केले. संपादकीय खात्यातले काम, तसेच टपाल नेण्या-आणण्याचे काम असे नाना तऱ्हेचे व्यवसाय त्याने केले; पण कशातच त्याचे मन रमेना. वयाच्या १७ व्या वर्षापासूनच त्याला विमानाबद्दल कुतुहल निर्माण झाले होते. तेव्हापासूनच वैमानिक म्हणून आकाशात भ्रमण करण्याचे त्याला वेड लागले. पण योग्य ती संधी मिळालीच नाही. आयुष्यात निरनिराळे उद्योग करूनही तो कोठेही स्थिर झाला नाही. वर्षभराच्या आतच त्याला एक नोकरी सोडून दुसरी पत्करावी लागत होती. कुठल्याही व्यवसायात वा नोकरीत त्याला यश मिळाले नाही. अपयशाची एक मालिकाच त्याच्या सामोरी आली आणि तिला त्याला तोंड द्यावे लागले.

१९५९ साली बाशचा बेटी फ्रँक या त्याच्या बालमैत्रिणीशी विवाह झाला. वर्षभरातच कॉलेजला रामराम ठोकून त्याने हवाई-दलातील नोकरी स्वीकारली. जेट लढाऊ विमानाचा वैमानिक म्हणून त्याने आपले शिक्षण पुरे केले आणि 'विंग्ज' हा किताब मिळविला. पण या नोकरीतही त्याचे मन रमेना. कारण अगदी उघड होते. या शिक्षण घेतलेल्या वैमानिकांच्या जागेवर नवे वैमानिक आणले गेले त्यामुळे जेट विमानातून आकाशात भ्रमण करण्याची बाशच्या हाता-तोंडाशी आलेली संधी हुकली. यामुळे निराश होऊन बाशने याही नोकरीचा राजीनामा दिला. त्यानंतर त्याने डग्लस एअरलाईन्समध्ये थोडे दिवस नोकरी केली. पण ही नोकरी अगदीच मिळमिळीत होती. सारे काम टेबलाशी. बाशने एका पाठोपाठ एक नोकऱ्या धरल्या आणि सोडल्या. हाताला येईल ती नोकरी कुटुंबाचा उदरनिर्वाह चालविण्यासाठी तो धरत होता, नि त्यात मन रमत नव्हते म्हणून ती सोडत होता. पुस्तके, जडजवाहिर विकण्याच्या



# पंख हवे मज

## सादरकर्ते : रंगा मराठे

छोटया नोकऱ्यासुद्धा त्याने पत्करल्या आणि सोडल्या...सारखी पैशासाठी धडपड आणि विवंचना ! ...

वयाच्या चोवीसाव्या वर्षी तो बाप झाला. वाढत्या प्रपंचाचा बोजा संभाळता संभाळता तो अगदी वेजार झाला होता. यातच आणखी दोन मुलांची जबाबदारी त्याच्यावर पडली होती. कर्जबाजारी झाला होता. प्रापंचिक गरजा भागविण्याकरिता उधारीने घेतलेल्या मालाची बिले थकली होती. नोकरी करीत असताना त्याने काही दिवस विमान-विद्येवर लेखनही केले. ही सारी धडपड धावपळ करूनही पुरेसा पैसा मिळत नव्हता. आणि वाढत्या प्रपंचाचा गाडा चालविणे दिवसेंदिवस कठीण होत होते...लेखन जमत नव्हते. जे पाहिजे ते लेखणीतून उतरतही नव्हते ! व्यर्थ धडपड आणि निरर्थक आयुष्य तो जगत होता.

याच काळात बाशने कुटुंबाचा उदरनिर्वाह चालविण्यासाठी तीन पुस्तके आणि अनेक लेख लिहिले. तरीसुद्धा त्याला पुरेसा पैसा मिळाला नाही वा किर्तीही त्याच्या पदरात पडली नाही. या साऱ्या लिखाणातून त्याचे विमानविद्येचे ज्ञान व आकाशात मुक्त संचार करताना त्याला होणारा आनंद व्यतीत होत असला तरी हे लिखाण वाचकांच्या मनाची पकड घेऊ शकले नाही. त्यातल्या त्यात 'स्ट्रेंजर्स टू दी ग्राऊंड' हे पुस्तक गाजले. या पुस्तकात आकाशात अखंड उड्डाण करणारा बाशच दिसतो. सतत आकाश भ्रमंती, पाय जमिनीला लागतच नाहीत ! ...सारे विश्व ठेंगणे दिसू लागते. माणसे मुंग्यासारखी दिसतात. उत्तुंग गगनचुंबी इमारती पायांच्या बंगल्यासारख्या वाटतात. विश्वाचा सारा खेळ म्हणजे एक स्वप्नच...या पुस्तकाने बाशला जो थोडा पैसा मिळवून दिला, तोही आता संपुष्टात आला होता. आपल्या सेकंडहँड मोटारीत कुटुंबियांना कोंबून बाश नोकरीसाठी या गावाहून त्या गावाला हिंडत होता...आणि अखेर हप्ते थकल्यामुळे बँकेने गाडीही काढून घेतली ! ¤

वाढत्या प्रापंचिक विवंचनांमुळे बाशला रात्री धड झोपही लागत नव्हती...अशाच एका रात्री झोप लागेना म्हणून बाश घरातून बाहेर पडला. कालव्याच्या किनाऱ्याने हिंडायला निघाला. मध्यरात्र उलटून गेली होती. वातावरणात शांतता पसरली होती. इतक्यात त्याला एक अज्ञात आवाज ऐकू आला–

"तुझ्या पाठीमागे उजव्या बाजूला वळून बघ–जोनाथन लिव्हिंग्स्टन सीगल !"

या आवाजामुळे बाशच्या अंगावर भीतीने काटा उभा राहिला. त्याने उजवीकडे वळून बघितले, पण–तिथे कोणीच नव्हते!

पण का कुणास ठाऊक, आता त्या अज्ञात आवाजामुळे बाशच्या शरीरात एक विलक्षण चैतन्य निर्माण झाले. मनात खळबळ सुरू झाली...त्याला आठवले–१९३० साली फार मोठी कीर्ती संपादन केलेल्या एका वैमानिकाचे नाव होते जोन लिव्हिंग्स्टन !

–बाश वेगाने घरी परत आला. बिछान्यावर बसून राहिला. त्याच्या मनात अजूनही तो आवाज घूमत होता–

"जोनाथन लिव्हिंग्स्टन ! ..."

या आवाजाला प्रत्युत्तर देण्यासाठी म्हणून की काय, बाश मोठ्याने म्हणाला,

"हे पहा, आत्ता मी जे ऐकले त्याचा मला काहीही अर्थबोध झालेला नाही. या अज्ञात आवाजाला काही अर्थ असेल तर तो मला कळला पाहिजे. त्याने मला सारे काही सांगितले पाहिजे."

या नंतर जे काही घडले, ते एखाद्या चलतचित्रपटासारखे !

जोनाथन लिव्हिंग्स्टन सीगलची कथा बाशच्या डोळ्यांसमोरून सरकू लागली...हिरव्या शाईची डौलदार अक्षरे पांढऱ्या कागदावर झरझर उतरू लागली ! ...साक्षात्कार व्हावा, मनुष्य झपाटला जावा तसे बाश लिहू लागला. सूर लागावा, तार छेडली जावी अन सुरेल सुस्वर संगीत सुरू व्हावे तसे एका समुद्रपक्षाचे जीवनसंगीत कागदावर उतरू लागले ! एकाच सुरात, एकाच तालात या कथेचे संगीत चालू होते...जेव्हा या जोनाथनला समुद्रपक्ष्यांची सारी जमात वाळीत टाकते, तिथे हे संगीत अचानकपणे थांबले ! बाशला पुढे काही सुचेना. आठवेना. संगीताचे सूर अचानक बंद झाले. त्याबरोबरच झरझर फिरणारी लेखणीही. शब्द संपले. आता पुढे काय ?

या प्रसंगानंतर आठवडेच्या आठवडे निरर्थक गेले. कथेचा शेवट कसा करावा हे बाशला समजत नव्हते. त्यासाठी त्याची अखंड धडपड चालू होती. पण पुढचा मार्ग दिसत नव्हता. शेवट सापडत नव्हता. याबाबतीत बाशला कुणीतरी विचारले, तेव्हा तो म्हणाला,

"...हे सारेच आश्चर्यकारक व बुद्धीला न पटणारे वाटते. पण या कथेचा शेवट कसा करायचा हे माझे मलाच समजत नव्हते. मती कुंठीत झाली होती."

मती कुंठीत झाली होती ! शब्द संपले होते ! अशाच स्थितीत आठ वर्षे निघून गेली ! ¤

*या आठ वर्षांच्या कालावधीतही बाशच्या जीवनाला स्थिरता* नव्हती. संसाराचा गाडा रेटण्याची त्याची अखड धडपड चालूच होती, याच काळात लॉंगबीच येथील 'फ्लाइगज' या वृत्तपत्रात उपसंपादक म्हणून बाशला नोकरी मिळाली होती. याच वृत्तपत्राच्या मॅपलवुड कचेरीत वेस्ट कोस्ट रीजनचा प्रतिनिधी म्हणूनही बाश काम करीत होता. यासाठी आपल्या मुलाबाळांना व बायकोला जुन्या गाडीत कोंबून त्याला दररोज लॉंगबीच ते मॅपलवुड व परत मॅपलवुड ते लॉंगबीच असा सतत प्रवास करावा लागत होता. या जोडीला आओवा सस्थानातील ओटोवा येथील 'अँटिक' या विमानविषयक मासिकात त्याने सपादकाची नोकरी धरली होती. असा हा बाश अन एखाद्या नाजुक बाहुलीसारखी दिसणारी त्याची बायको या साऱ्या धावपळीला व आपत्तीना तोड देत होती. शिवाय याच *कालावधीत बाशच्या कुटुंबात आणखी तीन मुलींची भर* पडली होती. प्रपंचाच्या कटकटींनी गाजलेला मिस्किल चेहऱ्याचा बाश जगात सयमाने व हसतमुखाने वावरत असला तरी काही प्रसगी त्याचा राग अनावर होऊन तो आपल्या मुलांवर संतापायचा. चिडायचा. एवढे असून सुद्धा आपल्या पत्नीचे शेवटचे बाळंतपण त्याने ओटोवा येथील आपल्या घरातच केले...साराशाने सांगायचे झाले तर असे म्हणता येईल की एखाद्या जुन्या चरित्रपर चित्रपटातील देखावे किंवा प्रसग जितके निरर्थक वाटतात तितकेच बाशचे आयुष्य रसहीन, अर्थशून्य झाले होते.

जोनाथनच्या कथेचे सगीत थांबलं होत. काही तरी विलक्षण लिहायला बाशचे हात स्फुरत होते पण काही सुचत नव्हते. सापडत नव्हते. मात्र या काळात बाशने विमानविद्येवर निरनिराळ्या मासिकांतून सुमारे शभर लेख लिहिले. *कथा कादंबरीच्या स्वरूपाचे* थोडेफार लिखाण बाशने केले, पण त्यात त्याची भावनाविवशताच अधिक दिसल्यामुळे प्रकाशकांना त्याच्या लिखाणात काही दम वाटत नव्हता.

या साऱ्या धावपळीत आणि गडबडीत जोनाथनची अपूर्व कहाणी धूळ खात पडली होती. *त्याकडे* ढुंकूनही पाहण्याचे सामर्थ्य बाशमध्ये उरले नव्हते. जणू काही ते सारे लिखाण विस्मृतीच्या कोशात अदृश्य झाले होते. मात्र भौतिक जगात वावरत असताना मनाच्या खोल कप्प्यात दडून राहिलेली जोनाथनची कथा बाशला बेचैन करून सोडीत होती. जोनाथन बाशचा जिवाभावाचा मित्रच झाला होता. त्यामुळे साहजिकच बाशच्या मनात समुद्रपक्ष्याबद्दल कुतुहल निर्माण झाले. समुद्र किनाऱ्यावर जाऊन बाश तासन तास या पक्षाचे निरीक्षण करू लागला आणि यातूनच समुद्रपक्षांवर *त्याचा* एक प्रदीर्घ लेख तयार झाला. त्यात बाशने लिहिले होते,

"...या पक्ष्याचे पख गतिमान उड्डाण करण्याइतके समर्थ आणि मजबूत असतात. ज्या सफाईने ते उच आकाशात वेगवान संचार करतात त्याच सफाईने आणि वेगाने ते समुद्राच्या अगदी जवळूनही उडतात..."

पण बाशने या लेखाच्या शेवटी सीगल्सवर कडाडून हल्ला केला होता, आणि लिहिले होते,

"...पण या पक्ष्यात जिद्द नसते. त्यामुळेच गगनात उंच विहार करण्याच्या आपल्या कलेत तो प्रगती करू शकत नाही." ◻

आठ वर्षांपूर्वी आकस्मिकपणे थांबलेल्या जीवन सगिताची तार एका पहाटे अचानकपणे छेडली गेली...

१९६७ साली ओटोवा येथील आपल्या निवासस्थानी बाशला पहाटे एक स्वप्न पडले. या स्वप्नामुळे बाशच्या अतर्मनात दडलेल्या जोनाथनच्या अपूर्ण कथेवर कसला तरी प्रकाश पडला. त्यामुळे कथेची वाट स्पष्ट दिसू *लागली*...बाशने बिछान्यातून उडी मारली. सराईत बोटे टाईपराइटरवर फिरू लागली आणि अतर्यामात आलेले विचार कागदावर झरझर उतरू लागले.

हा प्रकार म्हणजे व्यावसायिक लेखनाचा उपहास तर नव्हे! एखाद्या काडी पैलवानाने कुस्ती जिंकण्याच्या आत्मविश्वासाने आणि ईर्षेने रिंगणात उतरावे तसा तर हा प्रकार नव्हता?...

पण ही वस्तुस्थिती होती! जे टाइपराइटरवरून उतरले होते; *त्याला आठ वर्षे लागली होती!...* जोनाथनची कथा आता पूर्ण झाली होती!

जोनाथनची जीवनकथा पूर्ण होताच क्षणाचाही विलब न करता बाशने ती न्यूयॉर्कच्या 'फ्लाइग' मासिकाकडे रवाना केली. अन फ्लाइगच्या संपादकानी जराही विलंब न करता ती जशीच्या तशी साभार परत केली!... *यानतर ही कथा बाशजवळ बरेच दिवस* पडून होती. पुढे त्याने ती अनेक प्रकाशकांकडे पाठविली. पण या कथेचे आकलन कुणालाच झाले नाही. त्यामुळे हे पुस्तक प्रौढ वाचकांसाठी छापावे की बालवाङ्मय म्हणून छापावे, असा अनेक प्रकाशकांना प्रश्न पडला होता. याबद्दल बाश म्हणतो,

"हे लहान मुलांसाठी अन् हे मोठयासाठी असे लिखाण मी कधीच करत नाही. जोनाथनची कथा तर तशी मुळीच नाही. ती सर्वांसाठी आहे..."

–तरी देखील पुस्तक साभार परत येत होते. अनेक प्रकाशकांचे उंबरठे झिजवून जोनाथन पुनः पुनः बाशजवळ विसाव्याला येत होता...

शेवटी विख्यात मॅकमिलन कपनीने जोनाथनची जीवनकथा काहीही जाहिरात न करता प्रसिद्ध केली! प्रसिद्धीनंतर सुमारे दीड वर्षं या पुस्तकाकडे कुणाचे लक्षच गेले नाही. आपल्या गुणामुळेच जोनाथन वाचकांना हळूहळू आवडू लागला व पुस्तकाचा खप झपाट्याने वाढू लागला. हा हा म्हणता लक्षावधी प्रती संपल्या!... विक्रीच्या उच्चांकाची मजल आठवड्याला पाच हजार प्रतीवरून दिवसाला साठ हजार प्रतीपर्यंत पोचली!... 'गॉन विथ द विंड' या पुस्तकाच्या खालोखाल जोनाथनने विक्रीचा उच्चाक गाठला. एवढेच नव्हे, तर खालिलाल जिब्रानच्या 'द प्रोफेट' या पुस्तकाशी जोनाथनची तुलना होऊ लागली. ◻

जोनाथनची कथा प्रसिद्ध होऊन तिने जगाला चकित केले, त्या आधी बराच काळ बाश आपलं घर, बायको आणि सहा मुलं यांना सोडून निघून गेला होता... याबद्दल बाश म्हणतो,

"मला ससाराचा विलक्षण उबग आला होता, बायका-मुलांसमावेत मला समाधान मिळणार नाही. असं मनोमन वाटत असल्यामुळे मी घर सोडलं."

पुस्तकाच्या प्रसिद्धीनंतर बाशला जो अमाप पैसा मिळाला,

त्यातला बराचसा हिस्सा त्याने आपल्या कुटुंबियांना पाठविला. लेक मिशिगन येथे एक मोठे घर भाडयाने घेऊन त्याने त्यांची उत्तम व्यवस्था करून दिली. त्याची पूर्वीची पत्नी बेटी (Betty) हिच्याशी त्याचे अजूनही सलोख्याचे संबंध आहेत... मात्र लोकात अशी अफवा उठली आहे, की बाश आता दुसरं लग्न करणार आहे... पण बाशने या बातमीचा साफ इन्कार केला... लग्नाच्या बंधनात जखडून घेऊन स्वतःचे अस्तित्व गमावण्याची त्याची बिलकूल इच्छा नाही.

त्याच्या मनात सदैव फडफड करीत राहणाऱ्या पक्ष्याशीच त्याचे आता नाते जडले आहे. जोनाथन हेच त्याचे एकमेव स्फूर्तिस्थान. वैमानिक म्हणून आकाशात भ्रमण करीत असताना बाशला अनेकदा एक अज्ञात आवाज ऐकू येतो. आणि तो त्याच्यावर हुकूमत चालवतो व संकटाच्या प्रसंगी बाशला हा आवाज मार्गदर्शन करतो. या अज्ञात आवाजाबद्दल बाश म्हणतो,

"याच आवाजाने माझ्याकडून जोनाथनची दिव्य कथा लिहून घेतली आणि याच कथेमुळे मला अमाप कीर्ती व पैसा मिळाला. माझी योग्यताही नसताना या दिव्यत्वाला मी एक निमित्त मात्र कारण व्हावं याची मला खंत वाटते!"

बाशच्या लेखणीतून उतरलेल्या जोनाथनच्या दिव्य कथेमुळे जनमानसावर मात्र एक असा विलक्षण परिणाम झाला, की साऱ्या विश्वात दडलेल्या अज्ञात आणि गूढ शक्तीबद्दल त्याच्या मनात कुतुहल निर्माण झाले... बाशने जनमनाच्या सागरात इतका खोल सूर मारला, की दुकानातून जोनाथन लिव्हिंग्स्टन सीगलच पुस्तक पाहायला जत्रेसारखी गर्दी जमू लागली... 'गॉड फादर' ही मरिओ पुझो या फ्रेंच लेखकाची कादंबरी अशीच लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचली होती. पण ही लोकप्रियतेची वाटचाल करीत असताना पुझोला त्याच्या आधीच्या दोन कादंबऱ्यांनी अर्धपोटी ठेवून तपश्चर्या करायला लावली होती. पण बाशच्या बाबतीत काही वेगळच घडलं. एका दुय्यम आणि सामान्य कथेने त्याला अमाप लोकप्रियता मिळाली.

बाशची आपल्या या पुस्तकावर नितांत श्रद्धा आहे. ती व्यक्त करताना तो म्हणतो,

"... प्रत्येक माणसाच्या अंतरंगात एक अज्ञात सुप्त शक्ती वास करीत असते. आपले सर्वस्व पणाला लावले, तर या दिव्यशक्तीचा दिवसेंदिवस विकास होत जातो व जीवनाचा खरा अर्थ माणसाला समजतो."

खरं तर जीवनाचा अर्थ असंख्य माणसांना समजतच नाही. खाण्याकरिता जगायचं, की जगण्यासाठी खायचे यातले मर्म जरी माणसाला कळले तरी पुरे. मग त्याला साऱ्या विश्वात भरलेल्या चैतन्याचा अंश आपल्यातही आहे, अशी जाणीव हळूहळू होऊ लागेल... हे साधे सरळ तत्वज्ञान बाशने समुद्रपक्षाच्या रूपकातून सांगितल्यामुळे ते वाचकांच्या मनात खोलवर रुजले...

समुद्रपक्षी सागर किनाऱ्यावर कळपाने राहतात. दिवस उजाडला की आपले भक्ष्य शोधण्यासाठी ते समुद्रावर विहार करू लागतात. समुद्राच्या पृष्ठभागावर येणारे मासे व बंदराकडे येणाऱ्या बोटीवर मिळणारे खाद्य याचीच वाट पाहात ते उडत राहतात. भक्ष्य मिळेपर्यंत समुद्रावर विहार करायचा व काळोख पडू लागला की, किनाऱ्यावर परतायचे हाच त्यांचा दिनक्रम. याच कळपातला हा जोनाथन पण वेगळा... तो आकाशात उड्डाण करायचा. पण खाण्यासाठी नव्हे. भर वेगाने उंच उंच भरारी मारायची आणि त्याच वेगाने खाली यायचे. पुन: वर जायचे या कलेत पूर्णत्वाला पोचण्याच्या जिद्दीने तो ही तपश्चर्या करीत राहिला. या उड्डाणातूनच जीवनाचा खरा अर्थ शोधण्याचा त्याने प्रयत्न केला.

बाशला पहिल्यापासून विमानातून संचार करायचे विलक्षण वेड. वैमानिक म्हणून आकाशात सतत संचार करणे हाच त्याच्या जीवनाचा धर्म-अर्थ होऊन राहिला आहे. बाशची विमानावर नितांत श्रद्धा आहे. याबद्दल बाश म्हणतो,

"विश्वातील अचेतन निर्जीव वस्तूतही चैतन्य भरलेले आहे. विमानाचे सुटे भाग निर्जीव आणि अचेतन असतात. पण त्यावर वैमानिकाचा विश्वास नसेल तर ते सारे भाग एक होऊन आकाशात चैतन्य होऊन फिरणाऱ्या विमानावरही त्याची भक्ती जडणार नाही.'

या श्रद्धेने विमानातून आकाशात संचार करणारा बाश आणि गगनात झेप घेऊन पूर्णत्वाकडे पोहोचलेला जोनाथन यांच्यात विलक्षण साम्य वाटते. म्हणूनच की काय, कुणीतरी बाशला विचारले,

"जोनाथन लिव्हिंग्स्टन सीगल म्हणजे तूच का?"

यावर बाशने विनम्र होऊन उत्तर दिले,

"पूर्णत्वाकडे पोहोचलेल्या त्या पक्ष्यापासून मी अजून शेकडो मैल दूर आहे. अजूनही जमिनीवरच मी पंखाची फडफड करीत आहे!" ◻

ज्या जोनाथन लिव्हिंग्स्टन सीगलने दर आठवडयाला पाच हजार प्रतीच्या विक्रीवरून दिवसाला साठ हजार प्रतीच्या विक्री आकडयावर उड्डाण केले, त्या या पुस्तकाच्या एकामागून एक आवृत्त्या निघत गेल्या आणि नोव्हेंबर १९७२ मध्ये या पुस्तकाची दहावी आवृत्ती निघाली...!

पुस्तकाच्या या अफाट विक्रीमुळे अमाप प्रसिद्धी आणि पैसा बाशच्या पायाशी लोळण घेऊ लागला. अवतीभोवती उसळलेल्या पैसा आणि प्रसिद्धी यांच्या कोलाहलापासून आपल्या अंतर्मनात वसत असलेल्या जोनाथनला दूर ठेवण्याची बाश सदैव दक्षता घेत आहे. म्हणजेच जीवनाचा अर्थ समजून घेऊन जगण्याचा प्रयत्न बाश करीत आहे.

जोनाथन हे नाव इतके सर्वतोमुखी झाले आहे, की जो तो आता प्रसिद्धीसाठी ते नाव वापरू लागला आहे.

...पण जोनाथन या नावाने ओळखला जाणारा एकच!—आणि तो म्हणजे प्रत्येक मानवाच्या अंत.सागरात जो सदैव वास करतो; पण ज्याचे अस्तित्व कुणालाच समजू शकत नाही तो!

जोनाथन या नावातील पावित्र्य बाशला जपायचे आहे. त्यामुळेच थिल्लर संगीत, खेळणी, समुद्राच्या लाटावर हेलकावे घेणाऱ्या रंगीबेरंगी 'प्रणय नौका', मदिरा व मदिराक्षी यांच्यात सदैव डुबणारी किनाऱ्यावरील उपाहारगृहे यांना 'जोनाथन' हे नाव देण्याची बाशने आपल्या वकिलामार्फत बंदी घातली आहे. याशिवाय 'जोनाथन' या नावाचे सर्व कायदेशीर अधिकार बाशने आपल्याकडे ठेवले आहेत. या अधिकाराची कडक अमलबजावणी करण्याची मोहीम बाशने सुरू केली. एका ठिकाणी निवांतपणे राहायला त्याला घर नव्हते. म्हणून, ज्या घरात पूर्वी स्टॅलिनची कन्या स्वेटलाना

राहात होती ते ब्रिजहेम्प्टन येथील सुप्रसिद्ध घर बाशने भाड्याने घेतले व तिथे आठ महिने मुक्काम केला...सॅनफ्रान्सिस्को येथील एका अलिशान व राजेशाही हॉटेलचे नाव 'जोनाथन' होते. बाशने त्या नावावर बंदी आणून ते रद्द करायला लावले. शिवाय काही थिल्लर आणि गल्लाभरू ध्वनिमुद्रिकांना 'फ्लाय जोनाथ फ्लाय' असे नाव देण्यात आले होते. तेही कायदेशीर बंदी आणून बाशने रद्द करायला लावलं.

वैमानिक म्हणून आकाशात सतत संचार करणे हाच बाशच्या जीवनाचा खरा अर्थ असल्यामुळे आता ब्रिजहेम्प्टन येथील घरात त्याचा क्वचितच मुक्काम असतो...जोनाथनच्या कीर्तीचे प्रतीक म्हणून बाशने ४६,००० डॉलर्स (सुमारे तीन लक्ष पंचाहत्तर हजार रुपये) खर्च करून एक विमान विकत घेतले आहे. हे विमान घेऊन बाश आकाशात सदैव उड्डाण करीत असतो. त्याची सारखी भ्रमंती चालू असते. उद्या आपला मुक्काम कुठे असेल याची बाशला स्वत:लाच कल्पना नसते...हे विमानच आता बाशचे घर झाले आहे. कारण त्यातच त्याने झोपण्यासाठी बिछाना, लिहिण्यासाठी टेबल, जेवण तयार करण्यासाठी स्टोव्ह अशा सर्व सोयी केल्या आहेत... कॅप्टन राल्फ आणि स्लिम हे बाशचे सहकारी आहेत. स्वत: बाश निष्णात आणि चोखदळ वैमानिक आहे. वादळी हवा, पेट्रोलचा अपुरा पुरवठा, एंजिनचा बिघाड, यासारख्या अडचणीवर मात करून योग्य ठिकाणी विमान उतरवण्याच्या कलेत तो पारंगत आहे...

बाश जमिनीवर असो, वा आकाशात उड्डाण करीत असो, हे विमानच त्याचे घर आहे. व या घरात तो आता संपूर्ण सुखी आणि समाधानी आहे.

एका विलक्षण योगायोगाने जोनाथनच्या कथेला गती मिळाली!

सुप्रसिद्ध चित्रपट निर्माते हॉल बार्लेट दौऱ्यावर असताना त्यांचा मुक्काम सॅन फरनॅन्डो व्हॅली येथे होता. या मुक्कामात त्यांच्या मित्राने दिलेले एक पुस्तक वाचीत असताना ते निम्मे अधिक वाचून होते न होते तोच बार्लेट भारावून गेले. व त्यावर चित्रपट काढण्याचे त्यांनी ठरविले. हे पुस्तक म्हणजेच *जोनाथन लिव्हिंग्स्टन सीगल*...! बार्लेट यानी मॅकमिलन कंपनीला फोन करून बाशची ताबडतोब भेट घ्यायचे निश्चित केले. बार्लेटना थोडा जरी उशीर झाला असता तरी या पुस्तकाच्या पटकथेचे हक्क त्यांना मिळाले नसते...कारण याच वेळी बाश वॉल्पर प्रॉडक्शन या चित्रपट सस्थेला जोनाथनच्या पटकथेचे सर्व अधिकार विकून टाकण्याच्या तयारीत होता...पण योग काही निराळाच होता. हॉल बार्लेट यानी बाशशी संपर्क साधून त्याची ताबडतोब भेट घेतली व प्रदीर्घ चर्चेनंतर करारनाम्यावर सह्या झाल्या!...दहा लक्ष डॉलर्स (सुमारे आठ कोटी रुपये) व नफ्यातील पन्नास टक्के वाटा या अटीवर बाशने चित्रपटाला परवानगी दिली. मात्र चित्रपटासंबंधीच्या सूचना व फेरफार करण्याचे आणि जाहिरात-वितरणाचे सर्व हक्क बाशने आपल्याकडे राखून ठेवले आहेत.

जोनाथच्या चित्रीकरणाची सुरुवात होऊन आता आठ-दहा महिने झाले आहेत. आल्फ्रेड हिचकॉकच्या 'बर्डस्' या चित्रपटासाठी ज्याने पक्ष्यांना शिक्षण दिले त्या रे बरविकला पाचारण करण्यात आले. वास्तविक रे बरविक सेवा-निवृत्त होण्याच्या तयारीत होता. तरीसुद्धा त्याने बार्लेट यांची विनंती मान्य केली. रे बरविक यांनी समुद्रपक्षी पकडून त्यांची चित्रपटात काम करण्याची कुवत व आकलन शक्ती किती आहे. याची चाचणी घेतली व त्यांना शिक्षण दिले.

जोनाथानवरील चित्रपट आता पुरा होत आला आहे. या चित्रपटाबद्दल बरविक म्हणतो, की "जोनाथनवरील चित्रपट हा आत्तापर्यंतच्या चित्रपटातील एक महान चित्रपट ठरेल!...पुस्तकाप्रमाणेच हा चित्रपट साधा सरळ असून त्यात फक्त समुद्रपक्षाचीच कामे आहेत. त्यामुळे जोनाथनने पूर्णत्वाकडे घेतलेली झेप पडद्यावर पाहण्यास लक्षावधी प्रेक्षक उत्सुक झाले आहे...हा चित्रपट जर अद्वितीय ठरला, तर 'लव्ह स्टोरी' या चित्रपटापेक्षाही तो लोकप्रिय होऊन प्रेक्षकांच्या त्यावर उड्या पडतील... ¤

जोनाथन लिव्हिंग्स्टन सीगलची जी दहावी आवृत्ती प्रसिद्ध झाली आहे, त्याच्या मलपृष्ठावर रिचर्ड बाशचे फक्त ६१ शब्दात वर्णन केले आहे. हे वर्णन इतके मार्मिक आणि योग्य आहे, की त्यामुळे बाशचे खरेखुरे व्यक्तिमत्व वाचकाच्या डोळ्यासमोर उभे राहते... आत्तापर्यंत टी. व्ही. वर बाशच्या अनेक मुलाखती झाल्या. त्याची स्वाक्षरी घेण्यासाठी अजूनही वाचकांची झुंबड उडते. बाशचे व्यक्तिमत्वच याला बरेचसे कारणीभूत आहे. ओबडधोबड, रांगडं व्यक्तिमत्व, समोरून कापलेल्या पिंगट जाड मिशा, मिस्किल हास्य व कुतुहलात्मक चेहरा, यामुळेच टी. व्ही. मुलाखतीत त्याने प्रेक्षकावर विलक्षण छाप पाडली आहे. म्हणूनच वाचकानी जोनाथानमधील साहित्यिक मूल्यांकडे डोळेझाक केली आहे. ¤

...बाशने लिहिलेली जोनाथन लिव्हिंग्स्टन सीगलची जीवनकथा आपल्या महाभारतातील सुरस आणि वर्णनात्मक कथा इतकीच रजक असून ती आत्मनिष्ठ आहे. या कथेच्या निवेदनाच्या शैलीतूनच जीविताचे उत्स्फूर्त असे तत्त्वज्ञान ओघाओघाने आले आहे. शिवाय या कथेत निरनिराळ्या धर्माच्या परस्परविरोधी संदेशाचे विचित्र मिश्रण आहे.

...जोनाथन म्हणजेच प्रत्येकात वास करीत असलेला मुक्त आत्मा आहे. प्राणीमात्राला नश्वर देहाचे जेव्हा विस्मरण होते तेव्हा आपल्या अंतर्यामात असलेला आत्मा साऱ्या विश्वात भरलेला आहे याची जाणीव होऊन सारे चैतन्यमय होणे, म्हणजेच पूर्णत्वाला पोहोचणे हा हिंदुधर्माचा संदेश या पुस्तकात न कळत सांगितला आहे. कारण जोनाथन आगतिक होऊन परमेश्वराची करुणा भाकीत नाही तर स्वत: पूर्णत्वाकडे झेप घेण्याचा त्याचा सतत प्रयत्न आहे...स्वत: रिचर्ड बाश ख्रिस्ती धर्माचा पुरस्कर्ता असताना वरील हिंदु तत्वज्ञानाचा प्रभाव या कथेत प्रकर्षाने जाणवतो, हे विशेष! हा संदेश आपल्या साध्या सरळ कथेतून बाशने सामान्य वाचकाच्या अंत:करणापर्यंत पोचविला आहे. अथांग विशाल सागरावर भ्रमण करणाऱ्या जोनाथनमधील चैतन्याने बाशला वेड लावले तीच ही कथा. बाशच्या समृद्ध अनुभूतीतून आणि व्यथेतूनच 'जोनाथन लिव्हिंग्स्टन सीगल' या कथेचा जन्म झाला.

**या कथेची ओळख पुढील अंकी. पुढील अंक — दिवाळी अंक.**




## वसन्त डोळस

**प्रख्यात** साहित्यिक व जगद्विख्यात् प्रवासी जे. मार्टिनर शेपर्ड यांनी आपल्या सर्व कुटुंबाबरोबर सहारा वाळवंटातून प्रवास केला. या प्रवासात त्यांनी उंट हे 'हवाई जहाज' न वापरता हवेवर चालणारी, हवा भरलेली नाव वापरली. जगाच्या पाठीवरील अशा प्रकारचा हा पहिला मानवी प्रयत्न. त्यांच्या त्या रोमहर्षक प्रवासाची कहाणी...,

१९५३ पासून आम्ही दूर दूरचा प्रवास केला होता. आताही परत लांबच्या प्रवासासाठी निघण्याचा विचार मनात घोळू लागला. यावेळी सहारा वाळवंटातून प्रवास करावा असं मी ठरविलं.

सहारा वाळवंटातून प्रवास हाच विचार फक्त आमच्या समोर नव्हता. तर वाळवंटातून प्रवास करताना आम्ही हवा भरलेल्या नावेचा पण उपयोग करणार होतो.

प्रवासासाठी आमच्या कंपूमध्ये पाच जण होते. मी, माझी पत्नी, आणि माझी तीन मुलं. फोटोग्राफीसाठी फोटो स्टुडिओ नेहमी आमच्यासोबतच असे. प्रवास समुद्रावरील असो की, अँडीज पर्वता-सारख्या बारा हजार फुटावरील असो; माझी पत्नी त्याचा व्यवस्थित उपयोग करून निरनिराळे फोटो घेत असे.

त्यावेळी माझी थोरली मुलगी मार्जा बारा वर्षांची होती. जेरी दहा वर्षांचा आणि कोडी तर फक्त सात वर्षांचा होता. प्रवास जवळचा असो वा लांबचा, सोयीचा असो वा गैरसोयीचा मी माझी तीनही मुलं प्रत्येक वेळी बरोबर घेत असे. शहरात जशा दुर्घटना मोठ्या प्रमाणावर घडतात तशा त्या वाळवंटी प्रदेशात, जंगलात किंवा समुद्रात घडत नाहीत असा माझा आजवरचा अनुभव होता. पण याला काही अपवाद असतातच हे मीही नाकारू शकणार नाही.

सुटी पडल्यावर लोक शहराच्या गजबजाटापासून दूर शांत जागी जाऊन राहतात. पण माझं तसं नाही. सुटी पडल्यावर मी नेहमीच अशा प्रवासाला निघतो की; ज्यात अनेक रोमांचकारी प्रसंग येतील व ज्ञानात भर टाकणाऱ्या काही गोष्टीही पहावयास मिळतील.

यावेळची सुटी आम्ही सहारा वाळवंटातून प्रवास करण्यासाठी वापरणार होतो व त्या प्रवासासाठी हवा भरलेल्या नावेचा उपयोग करणार होतो.

मध्य आणि दक्षिण अमेरिकेतील वाळवंटी प्रदेशात हवा भरलेल्या नावेचा अनेक वेळा प्रवासासाठी उपयोग करण्यात आला होता. पेरु, सिरिया आणि लिबियाच्या वाळवटी प्रदेशातूनही मी प्रवास केला होता. आता मात्र सहारा वाळवट पार करून जाण्यासाठी जीव अधीर झाला होता.

हवा भरलेल्या नावेतून वाळूतून प्रवास करावयाचा हे खेळ इंग्लंड, बेल्जियम आणि कॅलिफोर्नियात चागलेच लोकप्रिय आहेत. पण त्याच हवा भरलेल्या नावेतून सहारा वाळवटातून प्रवास करण्याचा जगातील पहिलाच प्रयत्न होता.

प्रवासाचा आराखडा तयार करणे ही सोपी बाब आहे. पण तो आराखडा प्रत्यक्षात आणणे ही गोष्ट म्हणावी तितकी सोपी नाही.

त्यावेळी साऱ्या उत्तर आफ्रिकेत राष्ट्रवादाचे वारे वाहू लागले होते. त्या साऱ्या प्रदेशावर त्यावेळी फ्रान्सची अधिसत्ता होती. त्यावेळी त्या प्रदेशातून फक्त हवाई मार्गानेच प्रवास करता येत होता.

ते हिवाळ्याचे दिवस होते. त्या भागात गस्त घालणाऱ्या लष्करी तुकडीला आम्हाला प्रवासाची अनुमती मिळूच नये असं वाटत होतं. पण त्या वाळवंटातून प्रवास करावयाचाच असा जणू मी हट्टच धरला व अनुमती मिळण्यासाठी अनेक अधिकाऱ्यांची मनधरणी केली. शेवटी एकदाची अनुमती मिळाली. पण त्यासाठी डिपॉझिट म्हणून बरीच मोठी रक्कम भरावी लागली.

आम्हाला अनुमती देताना अधिकाऱ्यानी स्पष्टपणे बजावले की, ' हवेने भरलेल्या नावेशिवाय कमीत कमी दोन कार बरोबर घ्यायला हव्यात. कारण वेळप्रसंगी आम्ही आपल्या मदतीसाठी धावून येऊ शकू ! '

वाळवंटातून हवेने भरलेल्या नावेच्या सहाय्याने प्रवास हा विचारच त्या अधिकाऱ्यांना विचित्र वाटत होता. त्यामुळे ही नाव वाळवंटी प्रदेशातून प्रवास करील यावर त्याचा विश्वासच बसू शकत नव्हता.

त्यामुळे आम्ही त्यांना आमची ती नाव दाखविली नाही. ती नाव अठ्ठावीस फूट लांब होती. तीमध्ये हवा भरल्यावर ती उंटाच्या तांड्याला जोडण्यात येणार होती व अशा तऱ्हेने उंटाच्या तांड्याबरोबर तिचा हवेत तरंगत प्रवास सुरू होणार होता.

प्रवासात वायरलेस सदेशाची देखील व्यवस्था अधिकाऱ्यांनी केली.

प्रवासाला निघावयाच्या अगोदर तजियरमध्ये आम्ही एक जीप घेतली. तसेच एक वॉक्स वॅगन–सेउन कारही खरेदी केली. ती जुनीच होती.

आम्ही आमचा प्रवास तिंशित पासून सुरू करणार होतो. तो मार्ग स्पेनिश सहाराला समातर असा मोरे टानियावरून सेनेगलला जात होता. त्या मार्गाला ' ट्रान्स-सहारा-रूट ' असं म्हणतात. इतर मार्गापेक्षा हा मार्ग सोयीचा व सोपा आहे असं म्हणतात. कारण त्या मार्गावर अधूनमधून ' ओयॅसिस ' आहेत.

पण त्या मार्गात अनेक ठिकाणी ' ओयॅसिस ' व मनुष्यवस्ती असताना देखील अनेक प्रवासी मारले गेले आहेत ही गोष्ट मला ठाऊक होती. काही दिवसापूर्वीच त्या भागात एका इंग्रज दांपत्याला मरण आलं होतं. ती दोघे ठरलेला मार्ग सोडून भलतीकडेच निघाले. त्यांना इतकी तहान लागली की, कारच्या रेडिएटरमधील सर्व पाणी ती दोघे प्याली. तरी देखील तहान शमली नाही म्हणून बॅटरीचे अॅसिड पिऊन टाकलं. यावरून वाळवंटातील ' तहान ' कशी असते हे आपल्या लक्षात येईल.

त्या मार्गाने प्रवास करावयाचे आम्हो ठरविले. कारण आमची प्रवास मोहीम सफल्यावर डाकरमध्ये जाऊन मला माझी काही इतर कामे करावयाची होती.

तंजियरवरून निघून उत्तर आफ्रिकेतील आतरराष्ट्रीय ' जोन ' आम्ही पार केलं आणि मोरोक्कोवरून आम्ही अदागीरला येऊन पोहोचलो.

त्या ठिकाणी आम्ही ठरल्याप्रमाणे रक्कम फ्रेंच अधिकाऱ्यांना भरली. वेळ प्रसंगी आमच्यावर एखादी आपत्ती कोसळली तर फ्रेंच अधिकारी आमच्या मदतीला धावून येणार होते. व त्याची ही फी होती.

ही रक्कम भरल्यावर देखील अनुमती पत्रकासाठी आम्हाला बराच वेळ खर्ची घालावा लागला. पण शेवटी आम्ही अनुमती मिळविलीच.

अदागीरपासून तिंशितपर्यंतचा मार्ग चांगला होता. त्यापुढे मात्र महिन्याभराच्या प्रवासात तसा मार्ग दिसणार नव्हता. सहारा वाळवंटात प्रवेश तिंशितपासून होणार होता. डाकरला पोहोचण्यासाठी आम्हाला १७८५ मैलाचा दुर्गम प्रवास करावा लागणार होता.

तिंशितहून सहाराच्या सरहद्दीवर पोहोचण्यासाठी साधा खडबडीत रस्ता आहे. हा रस्ता अॅटलस पर्वत रांगांच्या दऱ्याखोऱ्यातून पुढे जातो. अशा रस्त्याला ' पिस्ते ' म्हणतात. हा रस्ता कधी वालुकामय प्रदेशातून, कधी खडकाळ प्रदेशातून तर कधी पिठासारख्या बारीक वाळूतून पुढे जातो.

आमच्या प्रवासात सर्वात पुढे वॉक्स वॅगन कार होती. तिच्यामागे जीप होती व उंटाऐवजी त्या जीपलाच आम्ही मागे नाव जोडली होती.

प्रवासात वॉक्स वॅगनच पुढे ठेवली होती. कारण जर एखाद्या ठिकाणी ती वाळूत रुतून बसली तर तिला ओढून काढण्यासाठी मागील जीप उपयोगी पडणार होती.

मी जीपमध्ये प्रत्येकी पाच गॅलन पेट्रोलची अकरा पिपे ठेवली होती. पाण्याची पण दोन पिपे होती. वॉक्स वॅगनच्या टपावर तंबू, खाण्याचे पदार्थ व इतर सामान ठेवले होते. जीपमध्ये दहा गॅलन पाणी होते. शिवाय बरोबर पाण्याने भरलेल्या बऱ्याच बाटल्या घेतल्या होत्या.

माझी पत्नी वॉक्स वॅगन चालवीत होती. वॉक्स वॅगनमध्ये माझी मुलं होती. जीप एक स्पॅनिश तरुण पेट्रो चालवीत होता. या मोहिमेसाठी मीच त्याला बरोबर घेतले होते. मी नावेच्या बैठकीत होतो.

मी आत्मरक्षणासाठी दोन रिव्हॉल्वर, एक शॉट गन आणि एक रायफल बरोबर घेतली होती.

त्या वाळवंटी प्रदेशात फ्रेंच सैन्याने ठिकठिकाणी किल्ले बनविले होते. त्या किल्ल्यांवर ट्रकमधून रसद पुरवठा होत होता. आमच्यासाठी पुढील किल्ल्यांवर पेट्रोल नेऊन ठेवण्याची व्यवस्था आम्ही अगोदरच करून ठेवली होती. ट्रकचा तांडा त्या प्रदेशात केव्हा जाईल हे निश्चित नव्हते. पण निघण्यापूर्वी आम्हाला फ्रेंच अधिकाऱ्यांनी सांगून ठेवले होते की, नुकत्याच रवाना झालेल्या ट्रकच्या तांड्यात तुमच्यासाठी एकेक गॅलन पेट्रोलची पंचावन्न पिपे पुढे पाठविली आहेत.

ॲटलस पर्वतांच्या दऱ्याखोऱ्यातून जाताना आम्हाला हवेत तरंगत चालणाऱ्या नावेचा अजिबात उपयोग करता आला नाही. त्या दऱ्याखोऱ्यातून बाहेर पडल्यावर सपाट प्रदेश लागला. ज्या रोखाने आम्ही चाललो होतो त्याच रोखाने वारा वहात होता. मी लगेच नावेत हवा भरली व तिची शिडे उभारली. वाऱ्याच्या रेटयाने नाव जोरात पुढे निघाली आणि सुमारे शंभर मैलांचे अंतर आम्ही आरामात कापले. सहारा वाळवंट प्रथमच वालुकामय प्रदेशातून जाणारी नाव पहात होते.

तरंगत चालणाऱ्या नावेला संभाळीत पुढे जाताना समोरून आमच्याच रोखाने उंटाचा तांडा येत असलेला दिसला. त्या तांड्यात साठ उंट होते. त्यापैकी तीसांच्या पाठीवर माल लादला होता आणि तीस उंट मोकळेच होते.

माझी नाव वॉक्स वॅगन व जीपपासून सुमारे अर्धा मैल पुढे होती. त्या तांड्याजवळ जाण्यासाठी मी नावेचा मार्ग किंचित बदलला व त्या तांड्याजवळ जाऊन पोहोचलो. पण मला व माझ्या नावेला पहाताच एका उंटावर बसलेला स्वार हात हलवून मोठमोठ्याने ओरडू लागला. नंतर पुढच्याच क्षणी उंट जोराने पळावेत म्हणून त्याने हवेत गोळी झाडली. त्या आवाजाने एकच काय पण सगळेच्या सगळे उंट घाबरून इकडे तिकडे पळू लागले.

पण हा सारा काय प्रकार आहे हे माझ्या लक्षात येईना. कदाचित हवेत तरंगत चाललेली नाव पाहूनच ते घाबरले असावेत व म्हणूनच उंटावरील स्वार व उंट पळत असावेत.

त्यामुळे मी जणू निश्चयच केला की, वाटेत जर एखादा उंटांचा तांडा दिसला तरी शक्यतो त्याच्या जवळ जायचं नाही. त्या पळणाऱ्या उंटावरील स्वारांनी मला बऱ्याच शिव्या हासडल्या. एक स्वार तर इतका चिडला की, त्याने माझ्या रोखाने एक गोळीच झाडली. पण नेम चुकला व मी बचावलो. माझ्यापासून काही यार्डावरच ती गोळी वाळूत रुतून बसली.

वाटेत टिंडॉफ किल्ला लागला. त्यातील अधिकारी आमच्याकडे पहात म्हणाला,

'अदागीरच्या अधिकाऱ्यांनी तुम्हाला प्रवासाची परवानगी दिलीच कशी ? त्यांना वेडबिड तर लागलं नाही ना ?'

आमच्या नावेकडे बोट करीत ते म्हणाले,

'या नावेतून तुम्ही सहारा वाळवंट पार करणार काय ? तुमचा खरा प्रवास अजून सुरू झालेला नाही. तुम्ही इथपर्यंत आलाच कसे ? याचंच मला आश्चर्य वाटतंय. आता आपण येथूनच परत निघा.



हा प्रकार माझ्या लक्षातच येईना...

इथून पुढे जाण्यासाठी मी तुम्हाला परवानगी देऊ शकत नाही. आपण तर आपल्याबरोबर लहान मुलंदेखील आणली आहेत. यावरून आपला सामुदायिक आत्महत्या करण्याचा विचार आहे काय ?'

सुमारे तासभर आमचा त्या ठिकाणी वादविवाद चालला. मी आम्हाला मिळालेली लेखी अनुमती त्याला दाखविल्यावर तो गप्प बसला. शेवटी त्याच कमांडिंग ऑफिसरने जवळच्या गावात आमच्या राहण्याचा बंदोबस्त केला.

आता इथून पुढे जीवघेणा प्रवास सुरू होणार होता. म्हणून एक-दोन दिवस विश्रांती घेऊन मगच पुढे निघावयाचे आम्ही ठरवले.

ती ख्रिसमसची संध्याकाळ होती. जवळ आवश्यक चीजवस्तु असताना देखील ख्रिसमसप्रसंगी लहान मुलांना भेटीदाखल देण्यासाठी काही वस्तु आम्ही खरेदी केल्या.

रात्र पसरली. चंद्रकोर आकाशात विलसत होती. तारे चमकत होते. त्यावेळी टिंडॉफच्या किल्ल्यात आम्ही ख्रिसमस साजरा करीत होतो. आम्ही त्या ठिकाणी एका पार्टीचे आयोजन केले. मेरीने आणलेल्या सर्व वस्तु झाडावर लटकविण्यात आल्या. आम्ही एक छोटासा ट्रान्झीस्टर बरोबर आणला होता. पण त्या वाळवंटी प्रदेशात इंग्लंड, अमेरिकेचे कार्यक्रम नीट ऐकू येत नव्हते. तो सण आम्ही आणि आमच्या मुलांनी आनंदाने साजरा केला.

दिवस उगवल्यावर वारा जोरात वाहू लागला आणि पहाता पहाता वाळूचे वादळ उठले व सारे जग त्या वादळात गडप होते की काय असं वाटू लागलं. ती वाळू जोरात येऊन आमच्या डोळ्यात व कानात घुसू लागली. सहारा वाळवंटातील वाळूची वादळे तीन, पाच किंवा नऊ दिवसापर्यंत अखंडितपणे होतात. ते वादळ मात्र फक्त तीनच दिवसात शमले, पण त्याचा जोर काय विचारता ?

वादळ संपताच कमांडिंग ऑफिसरने एका इसमाजवळ आम्हाला चिठ्ठी पाठविली. त्या चिठ्ठीत पुढील मजकूर होता–

'आपण आपल्या मोहिमेपासून दूर व्हायला कबूल नाही. तरी आता लगेच पुढच्या प्रवासास कूच करा. कारण एक वादळ शमल्यानंतर लगेच दुसरे वादळ उठत नाही. तरी तेवढ्या अवधीत आपण लगेच या भागातून पुढे सरका !'

त्या सूचनेनुसार तासाभरात आम्ही पुढील प्रवासासाठी तयार झालो. आमच्या पुढील टप्प्यात आता ट्रिक्वेटचा किल्ला होता. पासपोर्टवर शिक्का मारतेवेळी आम्हाला विचारण्यात आले की, ट्रिक्वेटला पोहोचण्यास किती वेळ लागेल ?

असं विचारण्यामागे त्यांचा उद्देश होता की, जर चोवीस तासात आम्ही ट्रिक्वेटला पोहोचलो नाही तर लगेच आम्ही चुकलो आहोत असं समजून आमच्या शोधासाठी ट्रिक्वेटहून शोध घेणाऱ्या तुकड्या निघणार होत्या.

ट्रिक्वेटला यायला आम्हाला दोन दिवस लागले. पण तो वेळ आम्ही अगोदर ट्रिक्वेटच्या अधिकाऱ्यांना कळविला होता. आम्ही जरी भरकटत दुसरीकडे गेलो तरी दोन-तीन दिवस पुरेल इतके खाण्याचे पदार्थ व पाणी आम्ही बरोबर घेतले होते. अर्थात वेळ आम्ही अंदाजपंचे कळविला होता. कारण अमुकच वाजता आम्ही ट्रिक्वेटला पोहोचू हे अगोदर कसे सांगता येणार ? कारण आमच्या नावेची गती ही सर्वस्वी वाऱ्यावर अवलंबून होती.

टिंडॉफ आणि ट्रिक्वेट या दोन किल्ल्यांमध्ये सुमारे सहाशे किलोमीटरचे अंतर आहे. हा रस्ता अत्यंत खडतर व वालुकामय आहे. मार्गाच्या खुणा वादळाने वाळूत गडप होऊन जातात. कधी कधी खडकाळ भागातून प्रवास करावा लागतो. याची आम्हाला अगोदरच कल्पना देण्यात आलेली होती. पण त्याचा आमच्यावर काहीच परिणाम झालेला नाही हे पाहून कमांडिंग ऑफिसर म्हणाले,

'आता या पुढील प्रवासात मार्ग सोडून दुसरीकडे भरकटत जाण्याचा फार धोका आहे. कारण या तीन दिवसांच्या वादळाने रस्ता नाहीसा झाला असेल. प्रत्येक किलोमीटरवर असणारे दगडही या वादळाने वाळूत गाडले गेले असतील. अरब लुटारूही किलोमीटरचे दगड वाळूत पुरून टाकतात. आपण आपल्या मार्गापासून भरकटत दुसरीकडे चालला आहात, असा संशय येताच जागीच थांबा. आमचे उंटस्वार लगेच आपल्याला मदत करण्यासाठी येतील. आता आपण लगेच पुढील प्रवासास निघा. परमेश्वर आपल्याला आपल्या मोहिमेत यश देवो !'

### प्रवासाची सुरूवात...

टिंडॉफपासून काही मैल मी नावेतून वेगाने निघालो. कारण आमचा प्रवास ज्या दिशेने चालला होता, त्याच दिशेने जोरात वारा वहात होता. वॉक्स वॅगन व जीपच्या पुढे माझी नाव होती. माझी नावही रस्त्यानेच पुढे चालली होती. पण मागाहून वॉक्स वॅगन व जीप येत आहे ना, याची खात्री करून घेत मी पुढे चाललो होतो.

प्रवासात कधी कधी वाटायचं की, सहाराचा प्रवास म्हणजे एक मामुली प्रवास आहे. पण एखादी आपत्ती आल्यावर वाटायचं की, प्रत्येक अनुभव हा नवाच आहे.

वॉक्स वॅगन जर वाळूत रुतून बसली तर तिला खेचण्यासाठी मागे जीप होती. पण दोन्हीही वाळूत रुतून बसल्यावर मग मात्र पंचाईत होऊन बसत असे.

टिंडॉफपासून चाळीस मैलांच्या अंतरावर आम्हाला डोंगराळ प्रदेश लागला. मार्गात मोठमोठाले दगड अस्ताव्यस्त पडले होते. काही काही दगड तर शंभर फुटांहून अधिक उंच होते. त्यांच्या बगलेतून आम्हाला पुढील प्रवास करावा लागला.

वाटेत त्या उंच दगडांच्या सावलीत आम्ही थांबलो. त्या रात्री जोरात वाळूचे वादळ उठले. पाऊस नव्हता—पण आकाश ढगांनी झाकळलं होतं. अधून मधून विजांचा कडकडाट चालला होता. रात्री सुमारे दहा-बारा मोठमोठ्या दगडांवर वीज कोसळली. त्या दगडांजवळच आम्ही आमचा तंबू ठोकला होता.

आम्ही वॉक्स वॅगनकारपासून थोड्याच अंतरावर नाव उभी केली होती. आम्ही इतके दमलो होतो की, नीट तंबूदेखील उभारला नव्हता. आम्ही कार आणि जीपमध्येच रात्री झोपलो. पण कडाक्याच्या थंडीमुळे चांगलेच काकडलो.

दिवस उगवताच आम्ही पुढे निघालो. आता खडकाळ प्रदेश संपून परत वालुकामय प्रदेश सुरू झाला होता. आम्ही चाललो होतो त्याच दिशेने वारा पण वहात होता. त्यामुळे आमच्या नावेचा पण व्यवस्थितपणे प्रवास सुरू झाला होता.

प्रत्येक किलोमीटरच्या नंबराजवळ थांबून आम्ही दुर्बिणीतून पुढील नंबर पहात होतो व आपला प्रवास योग्य त्या मार्गाने चालला आहे ना, याची खात्री करून घेत होतो.

एक किलोमीटरइतका प्रवास करायला आम्हाला दुपार झाली. पण एवढ्याशा प्रवासातच आम्ही चांगलेच दमलो होतो. आम्ही तेथेच थांबलो व दुर्बिणीतून आजूबाजूच्या प्रदेशाचे निरीक्षण करू लागलो. समोर किलोमीटरचा नंबर किंवा तशी एखादी खूण पण दिसेना. समोर काहीच खूण दिसत नसताना वॉक्स वॅगन व जीप घेऊन खुणेच्या शोधासाठी भटकणे म्हणजे उगीचच पेट्रोलचा अपव्यय करण्यासारखेच होते.

तेव्हा वॉक्स वॅगन व जीप तेथेच उभी करून हवेवर चालणाऱ्या नावेतूनच पुढे जायचे व किलोमीटरची खूण शोधून काढावयाची असे मी ठरविले व त्याप्रमाणे नावेतून पुढे निघालो. इकडे तिकडे खूप भटकलो पण किलोमीटरचा नंबर काही सापडला नाही. शेवटी हात हलवीत परत मूळ ठिकाणी आलो.

कंपासच्या सहाय्याने देखील योग्य ती दिशा अचूक समजेल याची खात्री नव्हती. कारण रात्रीच्या भयंकर वादळाने त्यामध्ये बिघाड झाला असेल, याची मला पूर्ण कल्पना होती. आता दिशा ठरविण्याचा दुसरा एक मार्ग होता आणि तो म्हणजे सूर्य. पण वाळवंटी प्रदेशात सूर्य पण लपला होता.


परत मी नावेतून पुढे निघालो. पण जाताना पेट्रोला सांगून ठेवलं की, दर दहा मिनिटांनी तू जीपचा हॉर्न वाजव व मेरीला सांगितलं की, दर पंधरा मिनिटांनी तू हवेत एकदा फायरिंग कर. वालुकामय प्रदेशात अडथळा नसल्यामुळे आवाज बराच दूरवर जातो. त्यामुळे मी आवाज ऐकून त्या रोखाने परत येऊ शकलो असतो.

यावेळी नावेतून मी बराच दूरवर भटकलो. मार्जा माझ्याबरोबर होती. तिची दृष्टी अत्यंत तीक्ष्ण होती.

वाटेत काही ठिकाणी वाळूचे मोठमोठे ढीग लागले. त्याच्या पलीकडे गेल्यावर आम्हाला वॉक्स वॅगन व जीप दिसेना. इतक्यात मार्जा आनंदाने ओरडतच म्हणाली,

'पपा, तो पहा उजव्या बाजूला किलोमीटरचा नंबर !'

मी तिकडे पाहिले. वाळूच्या ढिगाआड किलोमीटरचा नंबर दिसत होता.



मी सावध होतो म्हणून...

नावेच्या टायरच्या खूणा खाली उमटल्या होत्या. आम्ही परत फिरलो. हॉर्नचा आवाज व फायरिंगचा आवाज अधूनमधून कानावर येऊन पडत होता. वॉक्स वॅगन व जीप जवळ येऊन पोहोचल्यावर लगेच आम्ही पुढील प्रवासासाठी निघालो.

प्रथम मार्जाने शोधून काढलेल्या किलोमीटरच्या खुणेजवळ आलो. पुढ नंतरचे दोन किलोमीटरचे नंबर सापडले नाहीत. मार्जाने आपल्या तीक्ष्ण दृष्टीने एकदम पाचव्या किलोमीटरचा नंबर शोधून काढला. परत प्रवास सुरू झाला व त्या खुणेपर्यंत जाऊन पोहोचलो. नंतर मात्र किलोमीटरचे नंबर व्यवस्थितपणे सापडले. व त्यामुळे प्रवासही बरा झाला.

रस्त्यात ठिकठिकाणी ओॲसिसमध्ये आम्हाला छोटी छोटी हरणे अधूनमधून शहामृग देखील दिसले. एकदा तर मी नाव अगदी शहामृग मादीजवळ नेली. वाळूत तिने अंडे घातले होते व त्यावर बसली होती. वारा जोरात नव्हता. त्यामुळे नाव पण सावकाश चालली होती.

मला पाहताच शहामृगाची मादी पटकन् उठून उभी राहिली व पळून न जाता माझ्यावर तिने झडप मारली. पण सावध असल्यामुळे बचावलो. नाहीतर शहामृगाच्या मादीच्या पंज्याच्या एकाच फटक्यात एखादे हाड मोडले असते. पण मादी थांबली. मी माझी नाव दुसरीकडे वळवली. त्यामुळे आपल्याला पाहून आपला शत्रू पळून चालला आहे असं कदाचित् त्या मादीला वाटलं असावं– बराच दूरवर जाईपर्यंत ती मादी मला पहात होती. नंतर ती परत फिरली व आपल्या अंड्यावर जाऊन बसली.

दिवसभर प्रवास करूनदेखील आम्ही जेमतेम तीस चाळीस किलोमीटर इतकेच पुढे सरकत होतो. वरचेवर वॉक्स वॅगन किंवा जीप वाळूत रुतून बसत होती. त्यामुळे तिला वर खेचून काढण्यातच बराच वेळ जात होता. त्या उद्योगात आम्ही मात्र चांगलेच घामाघूम होत होतो.

त्यामुळे दुपार होईपर्यंत मी इतका दमून जात असे की, स्टिअरिंगवर डोके ठवल्यावर लगच झोप लागत असे. मी झोपी गलेलो पाहू मग इतरही झोप घेत.

टिंड्रॉफहून निघाल्यावर तिसऱ्याच दिवशी वॉक्स वॅगनमध्ये काही तरी बिघाड झाला होता. जसे जसे ऊन चढू लागे तसे तसे वॉक्स वॅगन नीट चालतच नसे. सकाळी १० वाजल्यापासून दुपारी चार वाजेपर्यंत ती चालतच नसे. मग तिला जीपला जोडून पुढे ओढावी लागे. चार नंतर मात्र ती परत व्यवस्थित चालू लागे.

रात्री प्रवास करण्याचा प्रश्नच नव्हता. जर दिवसा किलोमीटरच्या खुणा नीट सापडत नसत मग रात्रीच्या गर्द अंधकारात त्या कशा सापडणार ?

वाटेत ठिकठिकाणी लहान मोठी ओॲसिस लागतील असे आम्हाला आगोदर सांगण्यात आलं होतं. पण ते काही खरं नव्हतं. कारण ज्यांना खऱ्या अर्थाने ओॲसिस म्हणता येईल अशी एक दोन ठिकाणे प्रवासाच्या सुरुवातीला व प्रवासाच्या शेवटी पहावयास मिळाली. मध्य सहारात वाळू तापल्यामुळे इतकी उष्णता निर्माण होते की तिची तुलनाच करता येणार नाही. या भागातून प्रवास करताना आम्हाला मिनिटा मिनिटाला तहान लागत होती. ओठ सुकून जात होते. दिवसातून संपूर्ण शरिराला आम्ही दोनदा कोल्ड-क्रीम लावीत होतो. तसं केलं नसतं तर संपूर्ण शरिराला खोलवर भेगाच पडल्या असत्या. आम्हाला अगोदरच सांगण्यात आलं होतं की, या वाळवंटात माणूस पाण्याअभावी तीस तासांहून अधिक काळ जिवंत राहू शकत नाही.

ट्रिक्वेटचा किल्ला गाठण्यासाठी अजून दोन दिवस प्रवास करावा लागणार होता. पाण्याच्या दोन पिंपापैकी एक पिंप रिकामे झाले होते, संध्याकाळी तंबू टाकता टाकता मी पेट्रोला म्हणालो,

'दुसऱ्या पिंपातून पाणी काढ !'

पेट्रो जीपजवळ गेला. व जीपमधून पिंप काढून तंबूकडे आणले. पिंपातील पाणी न काढता ते पाणी गेले कुठे ? व पिंप हलके कसे काय झाले ?

मी पिंप उलटेपालटे करून पाहिले. खडकाळ व दगड गोट्यातून प्रवास करताना आदळून आपटून त्याला अनेक ठिकाणी कोचे पडले होते. व सांधे ढिले होऊन त्यातून पाणी गळून ते रिकामे झाले होते.

मी विचार करू लागलो. आता पुढे कसे काय होणार ? कारण वॉक्सवॅगनमध्ये फक्त दोन लोटे पाणी शिल्लक होते. पण तेही पूर्ण भरलेले नव्हते. तीन छोट्या डब्यांमध्ये आटविलेलं दूध होतं. व एकामध्ये संत्र्याचा रस होता. याशिवाय दुसरा पातळ द्रव म्हणजे मोटारच्या रेडिएटरमधील पाणी. पण ते पिण्यासाठी वापरल्यास जीप बंद पडणार होती.

शेवटी ठरवलं की, ट्रिक्वेटच्या दिशेने जितके पुढे सरकता येईल तितके जायचे. शिल्लक असलेल्या पाण्यावर जर ट्रिक्वेटपर्यंत मजल मारता आली तर परमेश्वरच पावला म्हणावयाचे. परंतु जर पाणी अलिकडेच संपले तर पेट्रो जीपमधील सर्व सामान व मुलांना घेऊन ट्रिक्वेटकडे निघेल. आणि मी व मेरी पेट्रो परत येण्याची वाट पहात तिथेच थांबू.

दुसऱ्या दिवशी आम्ही ट्रिक्वेटच्या दिशने वेगात चाललो होतो. पाण्याचा एक घोट बराच वेळ तोंडात ठेवून मग गिळत होतो.



स्वर्गसुख...

कार, जीप व नाव इतक्या वेगात घेऊन निघालो होतो की, त्यांचे स्प्रिंग कधी तुटून पडतील याचा नियम नव्हता. प्रवासाला निघताना बरोबर जितकी चीजवस्तु घेतली होती त्यातील बरीचशी संपली होती. म्हणून आम्ही आता अधिक वेगाने पुढे निघालो होतो.

सगळीकडे अंधार पसरू लागल्यावर आम्ही थांबलो. दुसऱ्या दिवशी सूर्य उगवायच्या आतच आम्ही पुढे निघालो. किलोमीटरच्या खुणा काळजीपूर्वक पहात आम्ही वेगाने पुढे आगेकूच करीत होतो. आज जर किलोमीटरचा एखादा नंबर सापडला नाही आणि जर दुसरीकडे भरकटलो तर मरणाशिवाय दुसरा पर्यायच नव्हता.

माझी मुलं आळीपाळीने वॉक्सवॅगनवर जाऊन बसत होती व दुर्बीणीतून इकडे तिकडे पहात होती. जर का याच सुमारास वाळूचे वादळ उठले. तर आम्हा सर्वांनाच जिवंत समाधी मिळणार होती. कारण वाळूचे वादळ उठल्यावर उंटावरून तरी लोक आपला जीव धोक्यात घालून कशाला आम्हाला शोधायला येतील ?

पण त्या साऱ्या खडतर प्रसंगाला तोंड देत देत शेवटी आम्ही ट्रिक्वेटला येऊन पोहोचलोच. वाटेत अनेक वेळा धीर खचून पुढे पाऊल निघत नव्हते. पण आम्ही तशीच हिंमत धरून पुढे पुढे निघालो.

समोर ट्रिक्वेटचा किल्ला स्पष्टपणे दिसू लागल्यावर आमच्या सहाजणांच्या सुकलेल्या चेहऱ्यावर मंदस्मित झळकले.

ट्रिक्वेटमध्ये आम्हाला दोन चांगल्या रुम उतरण्यासाठी देण्यात आले. प्रत्येक रुमला स्वतंत्र बाथरूम होता. त्यामध्ये शॉवर्स होते. प्रवासात पाण्याचा एकेक थेंब आम्हाला सोन्यासारखा वाटत होता इथ थंड पाण्याचे शॉवर्स पाहून आम्ही आनंदलो. कंटाळा येईपर्यंत त्या शॉवर्सखाली बसलो. इथे परत आम्हाला या भयंकर अशा प्रवास मोहिमेचा नाद सोडण्याची विनंती करण्यात आली. पण पुढे जाण्याची आम्हाला उत्कंठा लागली होती.

तेथील अधिकारी म्हणाले,

"या पुढील प्रवास या पेक्षाही महाभयंकर असा आहे. दक्षिणेकडे अरब लुटारूंच्या टोळचा फिरतात. ते आपल्याला लुटून ठारही करण्यास मागेपुढे पाहणार नाहीत. आठवडचा पूर्वीच आमच्या गस्ती तुकडीतील तीन सैनिकांना गोळचा घालून त्यांनी ठार केले आहे. आमच्याजवळ इथे पुरेसे सैनिक नाहीत. त्यामुळे त्यांच्या कारवायांना पायबंद घालण्यास आम्ही असमर्थ आहोत. जर त्या लुटारूंनी आमच्या या किल्ल्यावर हल्ला केला तर अपुऱ्या सैनिकांमुळे येथून पळून जाण्याशिवाय आमच्यापुढे दुसरा मार्ग नाही.

ट्रिक्वेटला पोहोचल्यावर काही फ्रेंच अधिकाऱ्यांनी मला नावेतून फिरवून आणण्याचा आग्रह केला. त्याच्या आग्रहाला मला मान द्यावा लागला. त्यांना नावेत बसवून समोरच्या वालुकामय प्रदेशातून फिरवून आणले. त्यांना खूपच आनंद झाला. आम्ही गेल्यावर कित्येक दिवस ते आमचीच चर्चा करीत बसले असतील.

ट्रिक्वेटच्या किल्ल्यात आम्ही तीन दिवस मुक्काम केला. पण प्रत्येक दिवशी लोक येऊन आपुलकीने आमची ओळख करून घेत व पुढील प्रवास न करण्याचा सल्ला देत.

त्यांच्या वारंवार होण्याच्या आग्रहामुळे पुढील प्रवास करावा की, करू नये ? असा प्रश्न माझ्याही पुढे उभा राहिला. तेव्हा मनात विचार आला की, सर्वांनाच पुढे घेऊन जाण्याऐवजी आपणच एकटचाने निघावे व नीट मार्ग पाहून यावा.

त्याप्रमाणे सकाळीच जीप घेऊन मी दक्षिणेकडे निघालो. सेनेगलचा तो रस्ता अगदीच बेकार होता. या रस्त्याने आम्हाला पुढे जाता येईल की, नाही ? यावद्दल खुद्द मलाच शंका वाटत होती. नाव तर त्या रस्त्यावरून चालूच शकणार नव्हती. पण जीप देखील ठिकठिकाणी वाळूत रुतून बसेल असा एकंदरीत रंग दिसत होता.

किल्ल्यामध्ये परत आल्यावर मी माझ्या पत्नीला सांगितले की, "तू मुलांना घेऊन विमानाने पुढ जा. आणि वॉक्स वॅगन इथेच ठेव. पेट्रोला बरोबर घेऊन मी व पेट्रो जीप व नावेतून पुढे निघतो !"

पण माझ्या पत्नीने तसे करण्यास स्पष्टपणे नकारच दिला. ती ती म्हणाली, आम्ही सर्वजण तुमच्या बरोबरच राहू. आपण जर आमच्या बरोबर विमानाने येणार असाल तरच आम्ही विमानाने जाऊ. नाही तर आपण सर्व बरोबरच पुढचा प्रवास करू !"

मुलांनीही आपल्या आईचाच विचार उचलून धरला. मेरी म्हणाली,

"आता आपण बरीच विश्रांती पण घेतली आहे. सर्व चीजवस्तूही आता भरपूर आहे – आता आपण लगेच पुढे निघू या !"

मेरीच्या विचाराला मी संमती दर्शविली.

दिवस उगवण्याच्या आतच आम्ही जागे झालो. बाहेर पाऊस पडत होता. सहारात पाऊस होतो तो फक्त नावापुरताच. पण आज मुसळधार पावसाने आमची झोपमोड केली. कॅंप व्यवस्थापकाने जेव्हा दरवाजा ठोठावला तेव्हाही पाऊस पडतच होता.

तो म्हणाला,

"आपण पुढचा प्रवास करू नये असं आम्हाला वाटतं. आपण इथून विमानाने जा – पण आपण आमचं ऐकाल असं वाटत नाही. पण ते काहीही असो. आपल्या प्रवास मोहिमेसाठी हा पडत असलेला पाऊस वरदानच ठरणार आहे. पावसाने वाळू चांगली बसली असेल. पण वालुकामय प्रदेशात पावसाचा ओलावा फार काळ टिकत नाही. तरी आपण आता लवकर पुढे निघा. जोपर्यंत अंगात शक्ती आहे तोपर्यंत पुढचा प्रवास करा आणि शक्ती संपल्यावर...!"

पण अर्धवट बोलणे त्याने पूर्ण केलेच नाही. तो निघून गेल्यावर वीस मिनिटातच सर्व आवराआवर करून आम्ही पुढील प्रवासासाठी निघालो. पाऊस अजूनही पडतच होता. सूर्य उगवला नव्हता. आम्ही हेडलाईटस सुरू केल्या. ट्रिक्वेटपासून काही किलोमीटरपर्यंत चांगला पक्का रस्ता होता व पुढील किलोमीटरचे नंबरही अगदी सहजगत्या सापडत होते. त्यामुळे सूर्य उगवण्याची वाट न पहाता आम्ही तसेच पुढे निघालो.

सर्वात पुढे वॉक्स वॅगन होती. तिच्या मागे जीप आणि जीपच्या मागे माझी नाव. पावसाने ओल्याचिंब झालेल्या रस्त्यावरून आमचा प्रवास सुरू झाला होता.

सूर्योदय झाल्यावर थोड्या वेळाने पाऊस बंद झाला. वालुकामय प्रदेशात बरेच पाणी साचले होते. तो भाग लगेच सुकून जाईल असं वाटत नव्हतं. दिवसभर आमचा प्रवास चालूच होता. त्या दिवशी आम्ही इतका प्रवास केला की, आतापर्यंतच्या प्रवासात तो एक उच्चांक होता.


दुसऱ्या दिवशी मात्र तो पक्का रस्ता संपून भुसभुशीत असा कच्चा रस्ता सुरू झाला. अशा रस्त्यावरून जोरात पुढे जावे लागते. हा भाग वरून चांगला दिसतो. पण आतमध्ये इतका भुसभुशीत असतो की, त्यात वाहने व माणसे देखील खोलवर रुतून बसतात व त्यांना जिवंतपणीच समाधी मिळते. सहारातील लोक अशा भागाला 'सडलेला भाग' म्हणतात.

पण त्या भागातून प्रवास करताना विशेष अडचण वाटली नाही. कारण वॉक्स वॅगन व जीपच्या मानाने माझ्या नावेचे वजन फारच कमी होते. वरचा भाग जरा भक्कम असल्यामुळे ताशी चाळीस मैल वेगाने आम्ही पुढे निघालो.

पण पुढच्या प्रवासात कितीही सावधपणे वाहने चालविली तरी वरचेवर वॉक्स वॅगन व जीप वाळूत रुतून बसू लागली. व प्रत्येक वेळी त्यांना वर खेचून काढण्यासाठी बराच आटापिटा करावा लागत होता व त्यात बराच वेळही खर्च होत होता. त्यामुळे पुढे पुढे पळणारी नाव परत मागे फिरवून मला त्यांच्यासमोर उभी करावी लागत होती. आम्ही चांगल्या कठीण भागावरूनच प्रवास करीत होतो.

जर का वॅगन किंवा कार वाळूत रुतून बसली की, अगोदर तीमधील सर्व सामान खाली उतरून ठेवावे लागे. सँड ट्रॅक्सच्या सहाय्याने तिला वर खेचून काढीत होतो. आणि मग परत तिच्यात सामान भरल्यावर आमचा पुढील प्रवास सुरू होई.

उष्णता वाढू लागली होती. थर्मामीटरचा पारा १२० फॅरनहिटपर्यंत चढला होता. त्या भागात जर काही भाग कठीण सापडला



प्रसंग आला तरच फायरिंग कर

नसता तर त्या भुसभुशीत भागात आमच्या प्रवास मोहिमेचे काय झाले असते कुणास ठाऊक. भुसभुशीत भाग संपून कठीण भाग लागला की, आमचा प्रवास ठीक होई. अधून मधून दिसणाऱ्या वृक्षांचा भाग कठीण होता. पण त्यामधून प्रवास कसा करावयाचा?

वाटेत घनदाट झाडी लागली व त्या जंगलातून आमचा प्रवास सुरू झाला. किलोमीटरचा एकेक नंबर मागे पडत होता.

संध्याकाळी मात्र एके ठिकाणी आम्ही तंबू टाकला. रात्रीच्या कडाक्याच्या थंडीपासून बचाव करण्यासाठी लाकडे पेटवून शेकोटी केली व झोपी गेलो.

दुसऱ्या दिवशी सकाळीच आम्ही पुढील प्रवासासाठी पुढे निघालो. सुमारे पन्नास मैलांचा टापू चांगला लागल्याने आम्ही ताशी साठ मैल वेगाने पुढे निघालो.

दुपारी उंटांचा एक तांडा येत असलेला दिसला. तो आमच्या रोखाने व आम्ही त्यांच्या रोखाने चाललो होतो. आम्ही वेग कमी केल्यावर उंटांचाच वेग मंदावला. ते जरा लांब अंतरावरून निघाले.

मी दुर्बिणीतून त्या तांड्याकडे पाहिले. त्या उंटांवर माल लादलेला नव्हता. सर्वांवर अरब स्वार दिसत होते. त्या सर्वांजवळ रायफली होत्या. मी मेरीला सावध केले. ते अरब स्वार जोरात उंटांना पळवित होते. सर्वांचे चेहरे राकट दिसत होते. ते अरब लुटारूच असावेत याविषयी आमची पुरेपूर खात्री पटली.

पेट्रो जीप चालवीत होता. मी ओरडून त्याला जवळ बोलविले. त्याने व मी बरोबरच ब्रेक दाबले. मी वॉक्सवॅगनमधून बाहेर उडी टाकून उभा राहिलो. जीपचे व वॉक्सवॅगनचे इंजिन चालूच होते. पेट्रोला एक रिव्हॉल्वर देत म्हणालो, 'पेट्रो घाबरू नकोस. मी म्हणेन तसं फक्त कर. आपल्याला त्यांच्याबरोबर दोन हात करावयाचे नाहीत. अजून ते बरेच दूर आहेत. आपण जर येथून अधिक वेगाने पुढे निघालो तर ते आपल्याला पकडू शकणार नाहीत. मुलांना व मेरीला बरोबर घेऊन मी पुढे निघतो. नाव मी वॉक्सवॅगनला जोडतो. तू आमच्या पाठोपाठ चल. पण रिव्हॉल्वर मात्र जवळच ठेव. प्रसंग आला तरच फायरिंग करावयाचे. नाही तर नाही. त्यांनी आपल्यावर फायरिंग केले तरच आपणही त्यांच्यावर फायरिंग करावयाचे. चल निघ लवकर!'

हे सारं मी त्याला एका दमात सांगून टाकलं. पेट्रोने मान हलवून

सर्व समजल्याचे सूचित केले. मी पळतच जाऊन वॉक्सवॅगनमध्ये बसलो. आणि लगेच अतिशय वेगाने पुढे निघालो. पण याच रस्त्याने पुढे गेलो तर अरब लुटारूंची भेट होणार होती. म्हणून रस्ता सोडून उजव्या हाताने मी जोरात पुढे निघालो व पेट्रोला तशी खूणही केली. पण रस्ता सोडून प्रवास करण्याने कदाचित आमची वॅगन व जीप वाळूत रुतून बसण्याचा धोका होता.

जर तस झालं तर आम्ही वॉक्स वॅगन व जीप वर उपसून काढी-पर्यंत लुटारूंची टोळी येऊन पोहोचणार होती. पण समोरचा धोका ओळखून आम्ही त्यात्र मार्गाने प्रवास सुरू ठेवला.

आमची चाल अरब लुटारूंच्या लक्षात आली व ते हात हालवून आम्हाला थाबण्यासाठी इशारा करू लागले. पण थाबण्याचा प्रश्नच नव्हता. दुर्बिण खाली ठेवून मेरीने हातात रायफल घेतली. मी वॉक्स-वॅगनला जोरात पळवित होतो. लहान-मोठे दगड उडून आजूबाजूला पडत होते. नावेचं वजन कमी असल्यामुळे तिचाही वेग वाढला होता. पेट्रो आमच्या पाठीमागून वेगातच येत होता. रायफल पूर्णपणे भरली आहे किंवा नाही ते मेरीने नीट पडताळून पाहिले. मुलावर मात्र याचा काहीच परिणाम दिसत नव्हता. मी कोडीला शॉटगन सीट खालून काढून सीटवर काढून ठेवण्यास सांगितले. काडतुसांचा डबा पण उघडा ठेवण्यास सांगितले.

माझे आणि मेरीचे चित्त विचलित झाले होते. पण समोर उभ्या ठाकलेल्या प्रसंगाचा मुलावर काहीच परिणाम दिसत नव्हता.

वॉक्सवॅगन वाळूत रुतण्याच्या मार्गावर असतानाच नशिबाने हात दिला व पुढचा भाग कठीण लागला. त्यामुळे आम्ही परत वेग वाढविला. अरब लुटारूंचा तांडा मागेच लागला होता. या कठीण भागात आल्यावर त्यांचाही वेग वाढणार होता. वाळवटातील प्रवासात आमच्या वाहनाना उट ऐकू शकणार नाहीत याची आम्हाला पूर्ण कल्पना होती.

आमच्या रोखाने त्या लुटारूंनी काही गोळ्या झाडल्या पण त्या पळणाऱ्या उटावरून झाडण्यात आल्याने सर्वांचाच नेम चुकला होता. पण आम्ही आगोदरचा वर्तविलेला अंदाज बरोबर होता. ते अरब लुटारूच होते.

अर्ध्या तासानतर आम्ही मागे वळून पाहिले. आता अरब लुटारू बरेच मागे राहिले होते– कदाचित् आमचा पाठलाग करण्याचे त्यांनी सोडून दिले असावे– कदाचित् विसर पाडून परत हल्ला करण्याचा त्याचा विचार असावा.

पण आमच नशीव बलवत्तर असेल तर रात्र होण्याच्या आत आम्ही पुढील किल्ल्याच्या परिसरात पोहोचू असं आम्हाला वाटत होतं.

आणि झालही तसंच. आम्ही खरोखरच नशीबवान होतो. रात्र होण्याच्या आगोदरच आम्हाला किल्ल्यावरील दिवे दिसू लागले. दिव्यांच्या रोखाने आम्ही किल्ल्यापर्यंत मजल मारली. किल्ल्याच्या मुख्य दरवाज्यात तीन सशस्त्र सत्री पहारा देत होते. त्यांनी आम्हाला अडविले. आम्ही तेथेच उभे राहून कमांडिंग ऑफिसरला सदेश पाठविला ते लगेच बाहेर आले. हासत मुखाने आमचे स्वागत केले आणि आम्हाला आत घेतले.

ते म्हणाले,

'तुमच्यासाठी दोन रुम तयार ठेवण्यात आले आहेत. दुपारपासून आम्ही आपलीच वाट पहात होतो. दुपारी जवळपास एक अरब लुटारूंचा तांडा फिरत असल्याचे आमच्या स्काऊट तुकडीने सांगितले होते. त्यामुळे आपण त्याच्या तावडीत सापडता की, काय याबद्दल आम्हाला काळजी वाटत होती. पण आपण सहीसलामत निसटलात. हे बरेच झाले!'

त्यावर मी हासत म्हणालो,

'अहो, त्याच्या तावडीत सापडता सापडता निसटलो!'

आता दक्षिण सहारातील एटार फक्त तीन किलोमीटर अंतरावर होते. हिवाळ्यात त्या भागात अरब गुराखी उंट व शेळ्यामेंढ्या-साठी चाऱ्याची व्यवस्था करण्यासाठी येतात. एटारमध्येच सहारा वाळवट सपत नाही. पुढे बराच वालुकामय भाग तुडवून जावा लागतो. अधून मधून थोडाफार भाग हिरवागार दिसतो.

एटारच्या दक्षिणेकडील एकजुज्त, नोआ-चोत, रोस्सो या तीन गावात आम्ही थांबलो. नतर सेंट लुई नदी पार करून आम्ही सेनेगलमध्ये प्रवेश केला. पुढे हाय-वे होता. ओल्या लाकडाला जसा फुगवटा यावा, तसा हा हाय-वे दिसत होता. त्यावरून प्रवास करताना आदळून आपटून हाडे खिळखिळी होत होती.

एटार पुढील प्रवासात हिरवळीच्या भागात आम्हाला गिनी जातीच्या कोंबड्याचे थवेच्या थवे दिसले.

जसजसे पुढे जाऊ लागलो तसतसे काळ्या रंगाचे लोक दिसू लागले. त्यावरून त्या भागात अरबांपेक्षा निग्रो लोकांचाच प्रभाव जाणवू लागला.

शेवटी अनेक आपत्तींना तोड देत देत आम्ही सहारा वाळवंटातून प्रवास करीत करीत करीत डाकरमध्ये येऊन पोहोचलो–सहारा वाळवटातील जीवघेणा प्रवास वॉक्सवॅगन व जीप बरोबरच हवा भरलेल्या नावेतून आम्ही पूर्ण केला. जगाच्या पाठीवरील हा पहिलाच प्रयत्न होय.

# स मा प्त

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कथा

पृष्ठ २३ वरून

दान मागितले आहे. तरी आपणाला आता काही करता येत नाही या जाणिवेने त्या कासावीस झाल्या. डोळ्यात प्राण आणून साहेबाकडे बघत राहिल्या. पत्नीच्या अंत.करणातील तळमळ, तडफडाट साहेबांना तिच्या डोळ्यातून, व्याकुळ चेहऱ्यावरून कळून आला. तसे तिला हलके वाटावे, ताण सैल व्हावा म्हणून साहेब यशवंताच्या झोळी-जवळ उभे राहिले. झोळीत बघू लागले.

यशवंत उठला होता. आपल्या बाळडोळ्यातील नजर जिकडे जाईल तिकडे बघत होता. त्याच्या चेहऱ्यावरील ते बाळभाव आणि त्याचे अबोध डोळे पाहून भिमरावांना बरे वाटले.

मुलाचे कौतुक बघत साहेब उभे आहेत याचा आनंद रमाबाईंना झाला होता. त्या हळूच पुढे आल्या. डोईवरला पदर नीटनेटका करून त्यांनी मान वर करून साहेबांकडे नजर टाकली. साहेबांचा चेहरा नेहमीप्रमाणे असलेला पाहून रमाबाईंच्या मनावरील ओझे एकदम नाहीसे झाले. त्यांना वाटले, साहेब नेहमी असे देवासारखे दिसावे. आणि त्यांनाच हसू आले. साहेब असे देवासारखे कसे दिसतील ?

'उठलाय बघा...'

'माझा आवाज ऐकून उठला.'

'छान झालं. नाहीतर तुम्ही त्याला दिसता कुठे ?'

'अन् तोही माझ्याकडे बघतो कुठे ?... वर आढ्याकडे बघतोय. रागवलेला दिसतोय. मनात म्हणत असेल, बाप फुकटची झोप पण घेऊ देत नाही...'

रमाबाईला हे ऐकून वाईट वाटले. त्या मनातल्या मनात म्हणाल्या, देवा ह्या भोळ्या सांबाला सांभाळ... तो एकदम पावसा-सारखा धो धो कोसळणारा. आहे तेवढे देऊन टाकणारा. मला बापडीला या महापूराला कुठ कव घालता येईल ? तूच देवा, तूच वाली हो...

'मुतला बघ. घे. रडेल. त्याचं ते काय म्हणतात त्या ते, फडकं बदल.' रमाबाईने मोठ्या लाड कौतुकाने लेकाला उचलून घेतले. उराशी धरून कबरेचे दुपटे काढून टाकले. पदराने त्याचे पाय पुशित मुका घेतला आणि त्या आनंदून म्हणाल्या,

'आता पूर्वीसारखा रडत नाही. शहाणा झालाय.

'फार.'

'सवाई होणार.'

'झाला तर पाहिजे...पण–'

'पण काय, माझा बाळ खूप शिकणार नाही ?'

'कदाचित आपण लढाईवर असू. रणमैदानात काय होईल कुणी सांगावे. मला सुभेदारासारखे बाप होता येणार नाही. किती वेळा मी विझू बघायचा. पण ते मला विझू देत नसत. चेतवित. विझून जावे असे आपोआप वाटते. फुटक्या मडक्यात जसे पाणी टिकत नाही तसे आपले होते. आपले भांडे फोडूनच ठेवले आहे. फोडतातच. त्यात तारुण्य, चैतन्य, उत्साह, आनद, काही टिकत नाही. झिरपून जाते. अन् माणसाचे माणूसपण राहत नाही. आपले लोक बघतेस. केवढे आहेत ? पै पैशात सहज मावून जाणारे. जाऊदे...'

साहेब मुके झाले. आणि नतर रमाबाईकडे बघत म्हणाले,

'ए, मी अवघड होत चाललोय काय ? कठीण बोलतोय काय ? सारखा पुस्तकात असतो म्हणून विचारतो...' आपण खूप वेळ बायकोशी बोलण्यात घालविला. इतक्या वेळात ग्रंथालयात पोहचलो असतो. ती मुलगी आली तर पुस्तकं हाताला लागू देणार नाही. तसे साहेब घाईने म्हणाले,

'निघतो.'

'लवकर या.'

'संध्याकाळपर्यंत.'

'नका...आणि हे बघा...' साहेब उबऱ्यात थांबले. तशा रमाबाई घाईघाईने म्हणाल्या–'तुम्ही पास व्हाल असं रस्त्यानं, तिथं कोणी विचारल तर त्याला तसं सागू नका. त्यांना ते तुमच मोठं होणं आवडत नाहीत. डूख धरतील...अन् वाटेल ते–

रमाबाईंना पुढचे वाक्य उच्चारणे जड गेले. त्या घाबरल्या. त्यांचे भय घालविण्यासाठी भीमराव म्हणाले,

'कोणी काही करीत नाहीत...अन् करायला गेले तर एकएकाला चिरडून टाकीन. तू काळजी करीत जाऊ नकोस...मरशील...

'काळजी कराव असच आहे...म्हणून तर मामंजींनी तुम्ही पास झाल्यावर सत्कार-सभा घेण्याची अस ठरवून टाकलंय...आपल्याला बाहेर पाठवण्याचं ठरवलय. कोणाच्या डोळ्यावर यायला नको...'

'बाबांनी ठरवलय ?'

'एवढे ते घाबरलेत ? बदलून गेलेत...'

'आपल्या लोकांत रहायला जावं असं म्हणू लागलेत.'

'असं...? का ?'

'पेपरातलं वाचून. ऐकून. त्या दिवशी बातमी आली नव्हती का. एकानं मिशाचे आकडे केले म्हणून त्याचे मुडकेच तोडले...अन् एकाने मुलांच्या लग्नात गोड-धोड जेवण दिले म्हणून त्याला, वऱ्हा-डाला झोडपून काढले. मांडव मोडला...

हे ऐकताच साहेब उबऱ्याआत आले. हासले. आणि मोठ्या मम-तेने म्हणाले,

'तू हुशार आहेस...'

'का होणार नाही ?'

'बघ, कसा चांगला हजरजबाबीपणा दाखवलास. तू बुद्धिमान आहेस. तू शिक. आत्याकडं बसेनास. मी शिकवू लागलो तर तोंडातून शब्द काढीनास.

'शिकल.'

'कधी.'

'सांगू ?'

'बोल.'

'मोठं घर घेतल्यावर ?'

'म्हणजे तुला शिकविताना माझा आवाज बाहेर जाणार नाही. तुझे दीर, जावा, सासरे ऐकणार नाहीत. घेऊ घेऊ. राजवाडा बांधू.'

'राजवाडा ?'

'तुला शका वाटतेय् ? हे हात बघ...हे हात कोणाचे आहेत ?' रमाबाई बघत होत्या. नरम, गुलाबी, स्वच्छ रेखीव हात पाहून त्या

पटकन हात पुढे करून म्हणाल्या,

'हा रुमाल धरा...अन् पैसे. याचे पुस्तक घेऊन पायी येऊ नका. लवकर या...' साहेबांनी हातात पडलेला रुमाल, पैसे खिशात घातले, खाली वाकून यशवंतच्या गालावर बोट ठेवले. आणि ते माघारी फिरले. पायात चपला अडकावून ते म्हणाले,

'बाबा आले तर सांगा...आत्या...'

'काय रे सायबा...' आत्या पलीकडल्या खोलीतून ओरडली.

'येतो.'

'लवकर ये बाळा, दादा सागून गेलाय, साहेबाला लवकर यायला सांग. रमा बोलली असल...रमा, सागितलस ना बाळा...'

आत्याच्या शब्दातील प्रेमवात्सल्याने रमाबाईंचे मन आनदीत झाले. त्या साहेबाकडे बसऱ्या चेहऱ्याने बघत म्हणाल्या,

'बघा, विसरू नका...पायी पायी येऊ नका...' बोलता बोलता चेहऱ्यावरले हास्य लोपले. आणि तिथे गाभीर्य आले.

'बरं.' भीमराव पुढे झाले. जिन्याजवळ आले. जिना उतरू लागले. रमाबाई बघत होत्या. साहेब दिसत होते, ते दृष्टीआड झाले पण त्यांची पावले ऐकू येत होती तोवर बरे वाटत होते. पण पावले ऐकू येईनाशी झाली तशी मनात पोकळी निर्माण होऊ लागली. आणि तिथे भय, काळजी, चिंता रिघू लागली. असे झाले. मनात नको ते विचार येतात अन् सबंध दिवस काळीज कुरतडीत राहतात, जीव टांगून ठेवतात. तसे होऊ नये म्हणून त्या यशवताला घेऊन पलीकडल्या खोलीत गेल्या. तसे आत्याने विचारले,

'साहेब गेला ? लेकाशी लय बोलत होता.'

'हो...'

'लेकाशी नाही आत्या. त्याच्या आईशी...' लक्ष्मीबाई हासल्या. रमाबाईंना ते ऐकून बरे वाटले.

'बायकोशी बोलताना साहेबाचे बोलणे इथवर ऐकू येते... हसायला लागला तर खोली भरून जाते...मोकळी मोकळी होऊन जाते' आत्या कौतुकाने म्हणाल्या. रमाबाईंना हेच हवे होते. असे बोलणे निघाले म्हणजे मन रमून जाते. भरून येते. साहेब घरात असल्यासारखे वाटते. त्यांच्याबद्दल बोलणे निघाले म्हणून त्या आत्याला नेहमीप्रमाणे प्रश्न विचारणार होत्या. आणि जावेलाही त्यात सामील करून घेणार होत्या.

भीमराव चालले होते. आत अतःकरणात सूर्योदय होण्याआधी जसे पूर्वेचे होते, एक अद्‌भुतरम्य सौदर्य, रसमय, मृदुल मधूरता येते, चैतन्य पसरते, तसेच काहीतरी आत होत होते. शरीरभर पसरत होते. त्यामुळे मोठा उत्साह, उल्हास वाटत होता. पावले भराभर पडत होती. एक उबदार उदात्त अनुभव येत होता. त्यामुळे वृत्ती बहरून आल्या होत्या. खूप छान छान वाटत होते. ते अनुभवीत, वाढवीत भीमराव स्टेशनावर आले. इतके चालून आल्याचे, गाडीची वाट बघत थाबल्याचे, गाडी आली व ते तिच्यात केव्हा बसले, ती कधी सुरू झाली याची त्याना काही जाणीव झाली नव्हती. गाडी चालली होती. तिची गती तर खूपच मदत करीत होती. आत निर्माण झालेल्या सुखाला अधिक मधूर, कोमल करीत होती.

आणि एकाएकी आत उदित झालेली पहाट नाहीशी झाली. तसे मन अगदी आकाशासारखे शांत स्थिर झाले. असे काही क्षण गेले, आणि आकाशातून तारा ओघळावा तसा एक सवाल ओघळत आला.

रमाच्या मनात हे संशयाचे भूत कोणी उठवून दिले आहे ? माझ्या-वरील आत्यंतिक प्रेमाने ? की येथल्या वर्णविद्वेष जोपासणाऱ्या संस्कृतीने ?

आणि या प्रश्नाला उत्तर तयार होऊ लागले, झाले–व्यक्त होऊ लागले.

समजा, मी जर इतर हाजारो महाराप्रमाणेच मोलमजूरी करून दीनपणे जगणारा असतो तर माझे ते जगणे पूर्णपणे धार्मिक पारं-पारिक असते. अगदी शंबूकाचा शिरच्छेद झाल्यावर जे जिणे शूद्रावर लादले गेले तेच माझे जिणे असते. दुःख दैन्याशी, लाचारी गुलामीशी बाधलेले.

म्हणजे रमाला माझ्या जिविताची धास्ती वाटली नसती. तिचे कितीही प्रेम असते तरी हिंदुधर्माभिमान्याचा तिला संशय आला नसता. कारण ते माझा जीव घेतील हा विचारच तिच्या मनात आला नसता. आता येतोय. त्याला कारण–

माझे शिक्षण. म्हणजे जे शूद्रांनी करू नये असे धर्म आणि त्याची पवित्र पुस्तके साागत आहेत. नेमका त्याच्या विरोधी मी नुसते शिक्षण घेतो आहे म्हणून गेलो आहे... आणि धर्माने तर जे शूद्र शूद्रत्व सोडतील त्यांचा नाश करण्याचे सांगितले आहे... हे रमाच्या काना-वर गेले आहे की काय ? म्हणून तिला भय वाटते ? म्हणून संशय येतोय ?

की प्रत्येक हिंदु-जातीला दुसऱ्या जातीबद्दल भीती वाटते ? हे *भय वाटण्याचे कारण काय ? प्रत्येक जाती जातीत हे शत्रुत्त्व आहे ?* वैर आहे...? कशातून हे शत्रुत्व निर्माण झालेले आहे ? जेव्हा हक्क, सुख, सन्मान, सपत्ती, विकास हिरावून घेतली जाते, तेव्हा शत्रुत्व निर्माण होते. हिंदू जाती-जातीत शत्रुत्त्व असण्याचे हे कारण आहे ? अपहरण आहे !

म्हणून ह्या जाती परस्पराचा द्वेष करतात, तिरस्कार करतात. द्वेष आणि तिरस्कार, वैर ह्या युद्धप्रवृत्ती आहेत. हिंसकता आहे. म्हणजे प्रत्यक्ष युद्धभूमीवर नसतानाही प्रत्येक हिंदु जात परस्पराशी असे युद्ध करीत असते. आणि म्हणून अधिक दृढही होत असते. म्हणजे जाती नष्ट होणारच नाहीत ! अमरच राहणार आहेत ? म्हणून संताना जातीभेद मोडता आला नाही ? पण त्याना ते शक्यही नव्हते. कारण ते जुन्याच विचारावर, देवधर्मावर आणि उत्पादन साधनावर उभे होते...सर्व सामाजिक, आर्थिक, वैचारीक भूमी जुनी असल्यावर नुसती भक्तिभावना काय काय बदल करणार ?

हा बदल आता होईल. कारण औद्योगिक इथे येते आहे. नवे विचार येताआहेत, पण इथले बुद्धिमान लोक या नव्या युगाचा पुरस्कार का करीत नाहीत. टिळक व्हाल्टेअर का होत नाहीत ? या ज्ञानविज्ञावर लोकांना संघटीत का करीत नाहीत ? विष्णूशास्त्री चिपळूणकर इतके विद्वेषपूर्ण ज्योतीराव फुले, सुधारक, स्वामी-दयानंद याचे विषयी का लिहीता आहेत ? त्यांचा सुधारकाना का विरोध आहे ? ज्यांच्यातून सुधारणा जन्मा आल्या त्या नव्या ज्ञान-विज्ञानाला ते नाहीसे करीत नाहीत. कारण तेवढे सामर्थ्य नाही. किंवा त्याना हे नवे ज्ञानविज्ञान हवे आहे त्याचबरोबर जे लोक पूर्वी-पासून वरिष्ठ होते, नेते होते, राज्यकर्ते होते तेच लोक पुनः राज्य-

कर्ते असावेत म्हणून ज्या रुढीसंकेतांनी, देवधर्म, धर्मग्रंथांनी त्यांना हे श्रेष्ठत्व बहाल केले आहे त्याचे ते संरक्षण करता आहेत...पुढे येणाऱ्या सम्यक समीक्षेला व चळवळीला नष्ट, भ्रष्ट करून टाकण्यासाठी ही भृणहत्त्या सुरू झालेली आहे की काय ?...

म्हणजे हे लोक जनतेची एकजूट घडवून आणणार नाहीत. तिच्यात ऐक्यभाव, बंधूभाव निर्माण करणार नाहीत. जुने शत्रुत्त्व, अलगत्त्व कायम राखतील. म्हणजे पॅरीस कम्यूनप्रमाणे इथे क्रांती होऊ देणार नाहीत... म्हणजे भारतीय बुद्धिवाद्यांत—म्हणजे ब्राह्मणात व्हाल्टेअर येणारच नाही.

म्हणजे उद्योगधंद्याची वाढ होऊनही इथे क्रांती होत नाही. आणि अस्पृश्यता जाणार नाही. त्यांना ती घालवायचीच नाही...म्हणजे शूद्रांना संधी नाही...

नाही. असे झाले नाही पाहिजे.

पण तसे होणार आहे...ज्यांना धर्माने धन कमविण्याचे सांगितले होते, जमीनीचे मालक केले होते तेच लोक कारखानदारीत आहेत... तेच उद्योग, व्यापार करून पैसे गोळा करताआहेत...तेच ब्रिटीश सरकारचे कारभारी आहेत. म्हणजे रमाचा संशय, भय खरे आहे... पॅरीस कम्यूनचे सर्व काही वाचले पाहिजे.

आणि नेमक्या याच वेळी गाडी थांबल्याचे जाणवले. त्यांनी गडबडून बाहेर पाहिले. बोरीबंदर स्टेशनात गाडी उभी होती. लोक उतरून बाहेर पडत होते. ते लगबगीने उतरले. भराभर पाय उचलू लागले. त्यांना ग्रंथालयात जाण्याची घाई झाली होती. सर्वच फ्रेंच लेखक ते आज घेणार होते. वाचणार होते. व्हॉल्टेअर तर अगदी गेल्या गेल्या वाचणार होते.

ते स्टेशनबाहेर आले. रस्त्यानं एक उंच लखलखीत घोड्याची बग्गी चालली होती. ती रुबाबदार गाडी बघून त्यांना ग्रंथालयात येणाऱ्या त्या निळ्या डोळ्यांच्या इंग्लीश मुलीची आठवण झाली. तिला नेहमी त्यांनी घेतलेल्या पुस्तकांचीच गरज लागते. अधून-मधून ती आपल्याकडे बघते. असे का होते ?

त्या मुलीसंबंधी विचार करीत आणि तिने आपल्याआधी जाऊन पुस्तके घेऊ नयेत म्हणून ते वेगाने चालू लागले.

लायब्ररीजवळ आले. रस्त्यावर त्या मुलीची बग्गी बघताच त्यांना वाटले, आता अडचण येणार...पुस्तके जाणार...

ते धावत पायऱ्या चढू लागले. ग्रंथालयाच्या हॉलमध्ये आले. काउंटरजवळ ती मुलगी उभी होती आणि भीमरावकडे मिष्कीलपणे बघत होती, ते जवळ येताच ती अगदी जुनी ओळख असल्याप्रमाणे सहजपणे म्हणाली,

' या, मिष्टर आंबेडकर, मी तुमच्या आधी आले. ठरवून आले. मला हवी असलेली पुस्तके मागितली तर ग्रंथपाल साहेबांनी तुमचे क्लेम दाखवले. मला काही पुस्तके मिळाली तर बरे होईल. घेऊ ?'

आता उत्तर काय द्यावे ? होय म्हणावे तरी अडचण. नाही म्हणावे तरी अडचण. ते विचार करीत असतानाच ती स्मित करीत म्हणाली,

' घेऊ ?'

' सर्वच ?'

' हो. ' ती खोडसाळपणे गम्मत करावी म्हणून म्हणाली.

' मग मी काय वाचू ?'

' रशियन लेखक वाचा...तिथं एक क्रांती अपेशी झाली आहे. दुसरी जन्म घेते आहे. '




## वर्गणी

◻ ' चित्र, वार्ता पुस्तक ' ही पुरवणी महिन्यातून दोनदा, साप्ताहिक माणूस व्यतिरिक्त प्रसिद्ध होईल.

◻ या पुरवणीची वार्षिक वर्गणी रुपये पंचवीस वेगळी पाठवावी.

◻ साप्ताहिक माणूस वर्गणीदारांसाठी पाक्षिक पुरवणी वर्गणीत वीस टक्के सवलत ठेवली आहे.

◻ म्हणजे साप्ताहिक माणूस वर्गणीदारांनी आपला वर्गणीक्रमांक कळवून फक्त वीस रुपये चित्र, वार्ता, पुस्तक पुरवणी वार्षिक वर्गणीप्रीत्यर्थ पाठवावेत.

—व्यवस्थापक

'तुम्ही हे मला का सांगता ?'

'कारण तुम्ही देखील माझ्याप्रमाणे किंवा मी तुमच्याप्रमाणे वाचते...क्रांतिकारी, पुरोगामी, देश, समाज समजून देणारे वैचारिक साहित्य.'

'हे तुम्ही कसे ओळखले.'

'मी रोज बघते ना...'

'पण मी कधी पाहिले नाही ते...'

'तुम्ही आपल्या विचारात येता. विचारातच बाहेर पडता. मी मात्र मित्राच्या शोधात होते. तुम्हाला पाहूनच मी मित्र म्हणून तुम्हाला निवडले होते...माझे नाव मिस कमल बेजामीन...

'कमल ?'

'होय. माझी आई इंडियन आहे. आणि वडील डॉक्टर, इंग्लीश. जन्म पॅरीस येथे. शिक्षण लडन येथे. बेंगॉली, फ्रेंच, इग्लीश व फार्शी या भाषा मला येतात. मी विचाराने क्रांतीकारक आहे आणि भारतीय संगितावद्दल मला प्रेम आहे...आपला परिचय ?

'मी आपला स्नेही भीमराव आंबेडकर. बी. ए. पर्यंत शिकलो आहे. उद्या बी. ए. पास होईन. डाउनट्रॉडन क्लासमधून आलो आहे. फ्रेंच भाषा येते. फार्शी, इग्लीश चागली येते. मराठी मातृभाषा आहे. सगीत, चित्रकला आणि सशोधन हे विषय आवडतात. रेव्हल्यूशन बद्दल अतिशय आकर्षण आहे...

'आभारी आहे. भीम . आपण आपली मैत्री साजरी करू या. मी चहा देते...तुम्ही निम्मी पुस्तके मला द्या...'

'घ्या. फक्त व्हॉल्टेअर द्या...तोच वाचावा असे ठरवून आलो होतो. इथल्या जातीभेदावर आणि फुडला सिस्टीमवर, जनतेतील अगदी युद्धपातळीवर गेलेल्या बेकिवर काही तरी उपाय सापडला पाहिजे. केवळ राजकीय क्रांती झाली तर सत्ता जे पूर्वी राज्यकर्ते होते त्याच्याच हातात जाईल. ती जाऊ नये म्हणून काय केले पाहिजे ते मी शोधतो आहे...

'म्हणजे तुम्ही रेव्हल्यूशनरी आहात...'

'नाही.'

'कार्लमार्क्स वाचलाय...?'

'नाव कानावर आलं आहे–'

'तरी असा विचार करता ? ग्रेट. तुम्ही परदेशात गेलं पाहिजे...'

'मनात तसा विचार येऊन जातो. स्वप्नाप्रमाणेच तो विचार क्षणजीवी ठरतो...कारण–


**पूर्णिया**

अनिल अवचट

सहा रुपये

राजहंस प्रकाशन


'का ? काय ?

'पैसा नको ?' बायकोला, आत्याला, वडिलांना तर नोकरीची, मोठ्या पगाराची, स्वप्ने पडू लागली आहेत...पाच सहा वर्षे ते धीर धरतील ? दु:खदैन्य सहन करतील. ते तर सुखाचा श्रीमतीचा रोज विचार करता आहेत. काय करावे ? नोकरी की परदेशात जाऊन उच्च शिक्षण ? रमा तर स्वतंत्र, स्वावलंबी होण्यासाठी अधीर झाली आहे तिचे तरी चूक काय ? जन्मत:च दैन्य दु.ख घेऊन आली आणि आताही ते सहन करतेय. तिला सुखाची स्वप्ने पडणारच... बाबांनाही केलेल्या कष्टाचे फळ बघायचे...थकलेतही...आपल्यासाठी त्यानी खूप केले. आई झाले. बाप झाले. शिक्षक झाले...आपले सारे सहन केले आणि मागू ते दिले... काय करावे ? हे की ते ? नोकरी की ज्ञान ? प्रकाश !

'कसला विचार करता एवढा ?'

'परदेशात जावे काय याचा ?'

'जा. जावेच. तुम्ही तर गेले पाहिजे. तिथे पहाट होत आहे नव्या युगाची, ज्ञानविज्ञानाची, जनतेच्या क्रांतिकारक लढ्याची. इथे काय आहे ? अर्थडॉक्स, बुद्धिजीवी, सुधारणावादी, कॉंग्रेस...आणि टिळक. चला...'

ती भराभर पायऱ्या उतरू लागली. खूप आनंदित झाल्यासारखी ती दिसत होती. तिच्या हालचालीतील मुक्तता, बोलीभाषणातील मोकळेपणा पाहून भीमरावांना वाटले, या मुलीत केवढे चैतन्य आहे. आत्मविश्वास आहे आणि आपण...आपण किती निरुत्साही, निरस आहोत. आपल्या ठायी चैतन्य, उत्साह टिकून रहात नाही. सुभेदार नसते तर आपले शिक्षण झालेच नसते. ते सतत चेतवीत राहिले. या देशात खालच्या समाजातील तरुण तरारून येऊच नयेत अशीच सस्कृती आणि भाषा तयार केलेली आहे. क्षणाक्षणाला तेजोभंग होईल असेच इथले वास्तव आहे. परदेशात गेलो तर आपण तरुण होऊ. चैतन्य घेऊन येऊ...इथे राहिलो तर सडून किडून जाऊ...

'भीम !' तिने खाली जाऊन हाक मारली. भीमरावाने नजर उचलून पाहिले. ती तळाच्या पायरीवर उभी होती. तिची घोड्याची गाडी वळण घेऊन तिच्याकडे येत होती. आली होती.

'या...लवकर...मला तुमच्याशी बोलायचं आहे. या, प्लीज...'

भीमराव तिच्या आग्रहाने उत्तेजित होऊन वेगाने पायऱ्या उतरू लागले.

'आभारी आहे...बसा...' तिने बगीत बसण्यासाठी भीमरावांना सूचित केले. ते आत बसताच ती पटकन आत येऊन बसली आणि मोठ्या हर्षभराने म्हणाली,

'बोला...तुमचा आवाज आणि हसणे मोठे लक्षणीय आहे. अगदी समुद्र पाहिल्यासारखे वाटते.'

कुठल्याही स्त्रीने त्यांच्याबद्दल असे उद्गार काढले नव्हते. म्हणून त्यांनी तिच्याकडे नजर टाकली. तशी ती निर्मळसे हसत म्हणाली,

'तुम्ही खूप निसर्गासारखे वाटला.'

'स्तुती करता आहात.'

'फक्त वर्णन.' आणि तिने कोचमनला सूचना दिली. घोडे निघाले. वेग घेऊ लागले. भीमराव प्रसन्न होऊ लागले. दुरून समुद्र आणि हिंदुस्थानचा दरवाजा दिसू लागला होता.



# एक परके

लेखक
मिखैल शोलोखोव

अनुवाद
सौ. तारा पंडित

मध्यरात्र झाली होती. एक लांडगा जोरजोराने ओरडत होता. रस्त्यावर कुत्री भुंकत होती. त्या आवाजांनी म्हाताऱ्याची झोप मोडली. तो उठून बसला. त्याला खोकल्याची ढास लागली. खोकला थांबताच तो थुंकला आणि शर्टाचा खिसा चाचपू लागला.

रोज मध्यरात्री असाच तो जागा व्हायचा. उठून बसायचा. खोकायचा आणि धूम्रपान करीत राहायचा. अगदी छाती भरून धूम्रपान करायचा आणि मधून मधून त्याच्या डोक्यात विचारांचं काहूर माजायचं. हे विचार त्याच्या एकुलत्या एका मुलाबद्दल

असायचे, मुलगा लढाईवरून परत आलाच नव्हता म्हणून !

म्हाताऱ्या गाव्हरिलाचा एकुलता एक मुलगा. त्याच्यासाठी त्याने खूप कष्ट केले होते, खस्ता खाल्या होत्या आणि त्याला लाल सैन्या-विरुद्ध लढाईवर पाठवायची वेळ आली तेव्हा त्याने घरची बैलजोडी विकली आणि आलेल्या पैशातून एक उमदा घोडा मुलासाठी खरेदी केला. तो घोडा असातसा नव्हता. टाच मारली की वाऱ्यासारखा पळत सुटायचा आणि मुलाला निरोप देतेवेळी बापाने म्हटल होतं, 'बघ पेट्रो, मी तुझी सगळी तयारी करून दिलीय. एखादा मोठा ऑफिसर तरी काय राहील अशी तुझी शान आहे. आपल्या कोसॅक सैन्याची इमानाने चाकरी कर, बेईमान होऊ नकोस; आणि लक्षात ठेव, शात वाहणाऱ्या डॉन नदीचा कधीही उपमर्द करू नकोस. तुझ्या आजोबांनी, पणजोबानी झार राजाचीच सेवाचाकरी केली आहे. तूही ती परंपरा चालू ठेवायला हवी.'

म्हाताऱ्या गाव्हरिलाने खिडकीतून बाहेर नजर फेकली. हिरवागार निसर्ग स्वच्छ चांदण्यात न्हाऊन निघत होता. वारा त्याच्याशी हितगूज करीत होता. गतदिवसांच्या स्मृती चाळवीत होता.

म्हाताऱ्याला खोकल्याची उबळ आली की लवकर थांबत नसे. त्यामुळे त्याच्या छातीचा भाता वरखाली होई. त्याला धाप लागायची. मधूनच तो घसा साफ करून टेकून बसायचा आणि मग पुन्हा तेच ते विचारचक्र त्याच्या डोक्यात फिरत राहायच.

*

मुलाला सैन्यात दाखल करून एक महिना उलटला असेल नसेल तोच लाल सैन्य गावात घुसलं. त्यानी धुडगूस घालायला सुरूवात केली, आणि म्हाताऱ्याच सुरळीत जीवन उस्कटून टाकलं, एखादा रिकामा खिसा उलटा करून बाहेर काढावा तसं ! अगदी ह्याच वेळी पेट्रो तिकडे डॉनच्या पैलतीरावर लढत होता. युद्धात कौशल्य दाखवून यशाचे रंगीत पट्टे पोषाखावर दिमाखाने मिरवीत होता.

गावात घुसलेल्या गुडांना केवळ भीती दाखवण्याच्या हेतूने म्हाताऱ्याने आपला लाल पट्टा असलेला सैनिकी पोषाख चढवला. कोसॅक राज्याचे पदक त्यावर लावले. शिवाय राजाची निष्ठापूर्वक सेवाचाकरी केल्याची मानचिन्हे म्हणून मिळालेली पदकेही छातीवर लावली. एवढा जामानिमा करून दर रविवारी तो चर्चमध्ये जाई. रस्त्याने चालताना वरच्या कोटाची बटने मुद्दाम उघडी ठेवी जेणे-करून सर्वांना त्याची मानचिन्हे दिसू शकतील.

ह्या गावावर आता सोव्हिएट लोकाचे वर्चस्व प्रस्थापित झाले होते. त्याचा अध्यक्ष एक दिवस गाव्हरिलाशी झालेल्या भेटीत म्हणाला, 'आजोबा, हा सगळा सरंजाम तुम्ही उतरवून ठेवा. आता तशी पद्धत राहिली नाहीये.'

म्हातारा गाव्हरिला एकदम उसळून म्हणाला, 'मला हुकूम देणारे तुम्ही कोण ? तुम्ही स्वतः मला ही मानचिन्हे दिली आहेत होय ?'

'पण ज्या कोणी दिली तो तर आता माझ्या माहितीप्रमाणे कधीचा किडयाच्या सैन्याचीच देखभाल करीत आहे.'

'करीत असेल. पण म्हणून मी यातलं काहीही काढून ठेवणार नाही आणि तुम्ही सुद्धा ते काढू शकणार नाही; काढाल तर ते मेलेल्या माणसाचंच, जिवंत माणसाचं नव्हे!'

'फार मोठ्या गोष्टी करताहात तुम्ही आजोबा. मी फक्त तुम्हाल मित्रत्वाचा सल्ला दिला. अहो, ते सारं अंगावर घालून तुम्ही झोपलात तरी मला काहीही म्हणायचं नाही बरं. पण सांगायचं इतकंच की ते लोक उगाच तुमच्या मागे लागतील. तुम्ही कोणत्या दर्जाची व्यक्ति आहात हेच मुळी ते विसरले आहेत. आपला माणूस देखील ओळखू यायचा नाही.'

हा कडवट अपमान म्हाताऱ्याचं मन पोखरू लागला, बहरलेल्या वृक्षवेलींना अळधाकिडे पोखरून टाकतात तसा. त्यांनी आपली पदकं, मानचिन्हं उतरवून ठेवली खरी पण मनातून नुसता जळफळाट होत होता. अगोदरच मनात वस्ती करून असलेला द्वेष वाढत होता.

आता तर काय, मुलगाही गेला. कुणासाठी काम करायचं आता ? कुणासाठी पैसे वाचवायचे ? धान्याची कोठारं मोडकळीला आली. गुराढोरांनी गोठ्याचं कुपण तोडून टाकलं. वासरांच्या गोठ्याच्या छपरांचे वासे वादळाने अगोदरच उध्वस्त झाले होते ते पुरते नष्ट होऊ लागले.

आजपर्यंत त्याने जे काय कमावलं असेल, वाचवलं असेल त्याला उतरती कळा लागली आणि आता काही करू म्हटलं तर बोट उचलण्याचीही शक्ती त्याच्यात नव्हती. पण वसत ऋतु आला आणि असहाय्यपणे शरण आलेली भूमी पायापाशी पाहिली मात्र, तो तिच्या मोहात पडला. रात्रीच्या शात वेळी तिची मूक हाक त्याने ऐकली. त्याला राहवल नाही. आपले बैल त्याने नागराला जोडले. सारी जमीन नांगरून काढली आणि त्या वखवखलेल्या काळचाशार जमिनीची कूस उत्तम गव्हाच्या पेरणीने भरून दिली.

सारे कोसॅक योद्धे लढाईवरून, समुद्राच्या पैलतीरावरूनदेखील परत आले पण पेट्रोचं काय झालं हे कोणीच सांगू शकलं नाही. कोणीतरी म्हणालं, लाल सैन्याशी दोन हात करता करता पेट्रोच्या सैन्याची तुकडी नामशेष झाली.

गाव्हरिलाने आपल्या पत्नीला यातलं अवाक्षरही सागितलं नाही. रात्रीच्या वेळी बिछान्यात पडल्या पडल्या रडत असल्याच नि सूं सू करीत जोराने श्वास घेत असल्याचं त्याला ऐकू यायचं. घसा साफ करून मग तो तिला म्हणायचा,

'काय झालंय ग तुला रडायला ?'

'काही नाही. डोक दुखतय माझं.' ती निरर्थक उत्तर द्यायची. आणि तोही मग आपल्याला खरं कारण जणू माहीतच नाही असं भासवायचा.

'तू थोडं चिंचेच पाणी का पीत नाहीस ? मी आणून देतो वाटल्यास.'

'काही गरज नाही. थोड्या वेळाने आपोआप थांबेल दुखायचं. तुम्ही मुकाट्याने झोपा.'

अन मग पुन्हा एकदा साऱ्या घरावर शाततेचं अदृश्य जाळं पसरायचं. खिडकीतून चद्र खोडसाळपणे बघायचा. दुसऱ्याचं दुःख बघून त्याला जणू आनदाच्या उकळ्या फुटत होत्या. एका आईचं हृदय फाडून चिंधड्या करणारं ते दुःख !

ते दोघे अजूनही आपल्या मुलाची वाट बघत होते. कधी ना कधी तो परत येईलच ही त्याना आशा होती. एक दिवस गाव्हरिलाला वाटलं गरम कपडे शिवावेत. तो पत्नीला म्हणाला, 'आपलं कसंही

निभेल पण पेट्रो परत आला की त्याला घालायला काहीतरी लागेल. आपण त्याच्यासाठी एक कोट शिवून ठेवू या. थंडी पडायला सुरुवात झालीय.'

मग त्यांनी पेट्रोच्या मापाचा एक कोट शिववून घेतला आणि घडी करून कपाटात व्यवस्थित ठेवून दिला. त्याच्यासाठी चांभाराकडून जोडे देखील तयार करवून घेतले घरी काम करताना वापरण्यासाठी म्हणून. म्हातान्यानं स्वत.चा जुनाच गणवेष वाळवींनं खाऊ नये म्हणून त्यावर तंबाखू शिंपडून ठेवला आणि एकदा कोकराच्या कातड्याची एक छानसी हॅट बनवून ती खुटीवर टांगून ठेवली. अंगणातून येतायेताच ती मुलाला दिसेल नि मग तो हसत हसत घरात येत म्हणेल, 'बाबा, खरच का इतकी थंडी आहे बाहेर?'

दोन दिवसानतरची गोष्ट. अंधार पडायच्या आधी गोठा साफ करायला म्हणून गाव्हरिला घरातून बाहेर आला. पाणी काढायला म्हणून विहीरीपाशी जाताच हातमोजे घरात राहिल्याचं त्याच्या लक्षात आलं. तो पुन्हा घरात गेला. पाहतो तो त्याची पत्नी जमिनीवर बसली होती आणि पेट्रोसाठी तयार केलेली पण पेट्रोने कधीही न घातलेली हॅट अगदी तन्मयतेने कुरवाळीत बसली होती. एखाद्या लहान बाळाला जवळ घेऊन त्याच कौतुक करावं तसलाच प्रकार!

त्याच्या डोळ्यांपुढे अंधार आला. एखाद्या जंगली जनावरासारखा तो तिच्या अंगावर धावला. तिच्या हातून हॅट हिसकली आणि ओरडला, 'काय गाढवपणा चालवला आहेस? हे काय वागणं झालं?' त्याने ती हॅट आलमारीत ठेवून लागलीच कुलुप लावून टाकलं.

डॉन नदीच्या पाण्यासारखे दिवसामागून दिवस नि आठवड्यामागून आठवडे पुढेपुढे चालले होते.

एके दिवशी शेजारचा एक मुलगा अकस्मात गाव्हरिलाकडे येऊन म्हणाला—'आजोबा, प्रोखोर तुर्कस्थानमधून परत आलाय. तुमच्या पेट्रोच्या तुकडीतच तर तो होता.' गाव्हरिला जवळ जवळ धावतच निघाला. पण प्रोखोरची भेट झाली नाही. तो बाहेर गेलेला होता भावाला भेटण्यासाठी म्हणून.

सारी रात्र गाव्हरिलाला झोप आली नाही. चांगले डोळे उघडे ठेवून तो जागत होता. ह्या कुशीवरून त्या कुशीवर वळत होता. रात्रभर तो अस्वस्थ होता. दिवस उजाडण्यापूर्वीच तो उठून बसला. निळसर आकाशात पूर्वेच्या दिशेकडून आळसावलेली पहाट अधूक प्रकाश मदगतीने फेकीत होती. चंद्र अजूनही आकाशाच्या मध्यावर डुलक्या घेत होता.

*

सकाळची न्याहारी अजून व्हायची होती. गाव्हरिला खिडकीतून बाहेर बघत होता. 'प्रोखोर येतोय बहुतेक.' तो स्वत:शीच म्हणाला. पण आत येणारा माणूस निराळाच दिसला. त्याचा गणवेश कोसॅकचा नव्हताच मुळी. त्याचा एकूण सगळाच आविर्भाव तिन्हाइतासारखा दिसला. पायात ब्रिटीश लोकांसारखे जोडे होते. ओव्हरकोट त्याच्या मापाचा दिसतच नव्हता मुळी.

'नमस्ते गाव्हरिला.'

'सुखी अस सैनिका. ये, आत ये. बैस इथे.'

प्रोखोरने टोपी काढली. म्हातारीला नमस्कार केला आणि कोपऱ्यातल्या एका बाकड्यावर बसला.

'काय विचित्र हवा आहे सध्या. वाऱ्याने तर आमचाही बर्फ करून टाकायला सुरुवात केलीय. बाहेर पडण मुष्कील झालंय अगदी.'

'हो, खरंच. यावर्षी जरा लवकरच बर्फ पडायला सुरुवात झालीय. एरवी ह्यावेळी सुद्धा गुरंढोरं बाहेर चरू शकतात.' हे तुटक संभाषण. अन मग जीवघेणी शांतता. गाव्हरिलाने सारं बळं एकवटलं. चेहरा शक्यतो निर्विकार केला. मग म्हटलं—

'खूप वाळला आहेस रे बेटा तू. परदेशच पाणी मानवलं नाही तुला.'

प्रोखोर हसला. 'छे! कुठं काय.' काहीतरी उत्तर द्यायचं म्हणून तो म्हणाला.

म्हातारीने मध्येच तोंड खुपसल— 'आमचा पेट्रो...'

'चूप बस ग जरा. माणूस एवढ्या बर्फातून चालत आलाय. जरा दम खाऊ देशील की नाही? तुला काय पाहिजे ते सगळं कळेल हळूहळू जरा धीर धरायला काय घेशील?' म्हातारा मग पुन्हा पाहुण्याकडे वळून म्हणाला—'मग काय, प्रोखोर, कसं वाटत लाईफ एकंदरीत?'

'अभिमान धरण्यासारखं काहीच नाही. पाठीच हाड मोडलंय. कुत्र्यासारखा लगडत घरी परतलोय. जिवंत राहिलो हेच विशेष.'

'अस आहे तर एकूण...'

'मग काय तर. शरीर आणि प्राण एकत्र राहिले हे नशीबच. पण गाव्हरिला, तुमच्या डोक्यावरचे पांढरे केस छान चमकताहेत हं. इथ सोव्हिएट राजवटीत कसं वाटत जीवन?'

गाव्हरिला खिन्नपणे हसत म्हणाला—

'खरं म्हणजे मी आपल्या मुलाची वाट बघतोय, तो येईल अन आम्हा म्हाताऱ्यांना दोन घास खाऊ घालील ह्या आशेवर दिवस काढतोय.'

प्रोखोरने नजर फिरवली.

गाव्हरिलच्या ते लक्षात आलं. मग त्याने सरळ सरळ विचारून टाकलं—'पेट्रो कुठे आहे? साग. साग लवकर तो कुठे आहे ते!'

'म्हणजे...तुम्ही ऐकलं नाही तर?'

'आम्ही निरनिराळ्या अफवा ऐकल्या.'

प्रोखोर विचारात पडला. मग म्हणाला—

'गेल्या जानेवारीत...मला वाटत जानेवारीतच, आमच्या सैन्याची तुकडी समुद्रकाठच्या एका छोट्या गावाला होती अन आमचं सगळ सुरळीत चालल होतं...'

गाव्हरिला किंचित पुढे वाकला. हलक्या आवाजात म्हणाला—

'तो जिवत नाही का?'

प्रोखोर काहीच बोलला नाही. फक्त आपली दृष्टी त्याने खाली वळवली. तो प्रश्न जणू त्याला ऐकूच आला नाही. तो पुढे सांगू लागला—

'आम्ही तिथे होतो आणि अकस्मात लाल सैन्य हजर झाल. त्याच्याशी सामना देण्याची जबाबदारी तुमच्या पेट्रोवर टाकली गेली. तो नेतृत्व करीत होता...अन मग...त्यावेळीच ते घडलं...'

धाडकन आवाज आला. स्टोव्हवरून भांडं खाली पडलं होतं. म्हातारीने बिछान्यावर हात पसरले आणि जोराने किंकाळी फोडली.

गाव्हरिला तिच्या अंगावर ओरडला–'अशी काय किंकाळतेस ?' मग त्याने दोन्ही हाताचे कोपरे टेबलावर टेकवले आणि प्रोखोरच्या डोळ्यात रोखून बघत विचारलं–'सांग पुढे काय झालं ते ?'

'त्यांनी पेट्रोचा पराभव केला...त्यांनी त्याला मारून टाकलं... आणि त्या लाल सैन्याने जंगलात आश्रय घेणाऱ्या आम्हा सर्वांवरच हल्ला चढवला...'

बोलताना शब्द त्याच्या घशात अडकत होते. तो एकदम उठला. बाजूला ठेवलेली टोपी त्याने चुरगाळीतच उचलली. बाहेर येऊन घोड्यावर खोगीर टाकताच तो घोडा वेगाने पळत सुटला. प्रोखोरच्या हाती लागलाच नाही तो मागेच राहिला. 'बस. एवढंच.' तो म्हणाला,

'पण समजा, मी ह्यावर विश्वास ठेवायला तयार नसेन तर ?'

गाव्हरिलाने स्पष्ट विचारलं. आणि हे शब्द उच्चारताना त्याचे डोळे पाण्याने भरून आले. संताप आणि दुःखाच्या आवेगाने त्याने आपला शर्ट फाडला, केसाळ छाती उघडी केली. बिचारा प्रोखोर घाबरून गेला. म्हाताऱ्याने पाठीमागे मान टाकली, आणि तो शोक करू लागला.

'माझ्या एकुलत्या एका मुलाला त्यांनी मारून टाकलं ? माझ्या पेट्रोला मारून टाकलं ?...खोट आहे हे !...हे साफ खोट आहे... माझ्याशी खोटं बोलतोस ?... मला फसवतोस ?...मी यावर विश्वास ठेवणार नाही...कदापि विश्वास ठेवणार नाही... नाही !!...'

रात्र पडली तसा तो उठला. कोट खांद्यावर अडकवला आणि बाहेर अंगणात आला. बर्फ तुडवीत तुडवीत गवताच्या गंजीपर्यंत येऊन पोहचला. वारा वाहत होता. त्याबरोबर बर्फाचे बारीक कणही उडत होते. चेरी वृक्षाखाली गडद अंधार दाटला होता.

'बाळा !' गाव्हरिलाने हलकेच आवाज दिला. क्षणभर स्तब्ध उभा राहून पुन: म्हणाला– 'पेट्रो, माझ्या लाडक्या बाळा !'... तो अतिशय गहिवरला. गवताच्या गंजीवरच बर्फाच्या ढीगावर पडला. आणि दुःखावेग सहन न होवून त्याने डोळे मिटून घेतले.

✤

आदल्या दिवशीच्या गोळीबारामुळे साऱ्या गावात शांतता पसरली होती. सध्याकाळ होऊ लागली तेव्हा धैर्य धरून गाव्हरिला घरा बाहेर पडला. अंगणातून चालत गवताच्या गंजीपर्यंत आला. तेथें त्याला भयानक दृश्य दिसलं. तीन माणसं जखमी होवून तेथे पडली होती. हेच लोक आदल्या दिवशी गाव्हरिलाकडे आले होते. जास्तीचं साठवलेलं धान्य अरेरावीने मागत होते. पण आज त्यांची ही दुर्दशा पाहून गाव्हरिलाचा आदल्या दिवशीचा रागद्वेष कुठल्या कुठे पळाला त्याच्या अंत:करणातून एकाएकी सहानुभूतीचा झरा वाहू लागला. त्या तिघांपैकी दोघे तर घायाळ झाले होते आणि कित्येक तास बर्फावर पडल्यामुळे गोठून गेले होते. तिसरा गवताच्या गंजीवरच होता. फक्त एकोणीस वर्षांचं वय असलेला तो तरुण पाहून गाव्हरिलाचा जीव कळवळला. त्याने ह्या तरुणाच्या छातीला कान लावला आणि आश्चर्याने तो मागे सरकला– त्या चावणाऱ्या थंडीतही त्याची नाडी व्यवस्थित सुरू होती.

म्हातारीने विश्वास टाकला आणि ती स्टोव्ह पेटवण्यास लगबगीने निघाली. तोवर गाव्हरिलाने किंचित् कण्हत असलेलं, रक्त वाहिल्याने काळं पडलेलं ते तरुण शरीर पाठीवर घेतलं नि अडखळत तो घराकडे चालू लागला.

त्याने ते धूड एका बाकड्यावर अलगद ठेवलं. त्याची छाती चोळली. त्याच्या जखमा धुतल्या. हातपाय गरम कपड्याने चोळण्यास सुरवात केली. थकून जाईपर्यंत त्याचं हे चोळण्याचं काम सुरू होतं. आणि मग हळूच त्याच्या छातीशी कान लावून पाहिलं, अनियमित पडणारे छातीचे ठोके त्याला जाणवले.

संपूर्ण तीन दिवस आणि चार रात्री तो असाच समोरच्या खोलीत शरीराने अत्यंत क्षीण झालेल्या अवस्थेत पडून होता. हळूहळू त्याचा श्वासोच्छ्वास नियमितपणे सुरू झाला.

गाव्हरिला रोज बोटांनी त्याचं तोंड उघडायचा, गच्च मिटलेले दात चाकूने हळूच विलग करायचा आणि मग त्याची बायको एका बांबूच्या बारीकशा नळीतून दूध किंवा मटणसूप असे पातळ पदार्थ त्याला पाजायची.

चवथ्या दिवशी त्याच्या प्रकृतीत बरीच सुधारणा झालेली दिसली. त्याला हळूहळू हातपाय हलवता येऊ लागले. त्या दिवशी प्रथमच त्याला घाम आला.

तो स्वप्नात बडबडायचा किंवा बिछान्यावरून उठायचा प्रयत्न करायचा. अशावेळी गाव्हरिला व त्याची बायको पाळीपाळीने त्याच्यावर रात्रंदिवस लक्ष ठेवीत.

संपूर्ण हिवाळा संपेपर्यंत रोज गाव्हरिला त्या जखमी तरुणाच्या बिछान्याजवळ बसायचा, त्याचा हात हातात घ्यायचा आणि त्याची निरर्थक बडबड लक्ष देऊन ऐकायचा. त्याचे शब्दोच्चार निराळेच वाटायचे.

अशा प्रकारे त्या अनोळखी तरुणाची रात्रंदिवस सेवा करता करता आपल्या पत्नीच्या प्रकृतीवर परिणाम होत असल्याचं गाव्हरिलाच्या लक्षात आलं. ती अशक्त दिसू लागली. आपल्या लाडक्या पेट्रोच्या विचारासरशी तिच्या सुरकुतलेल्या गालांवरून ओघळणारे अश्रू आता आटले होते. मृत्यूला कवटाळू पाहणाऱ्या, आपल्या मुलाएवढ्याच ह्या तरुणासाठी मात्र ते ओघळत नव्हते. कारण तो दुसऱ्या कुणा स्त्रीचा मुलगा होता ना...

सैन्याच्या एका तुकडीचा कमांडर गावातून जात असताना गाव्हरिलाच्या घरापाशी थांबला. घोडा बाहेर उभा करून तो आत आला. बिछान्यावर पडलेल्या त्या क्षीण देहाकडे पाहत म्हणाला– 'आमच्या कॉमरेडची तुम्ही सेवा करताहा आजोबा ?

'होय'

दिवसांचं रूपांतर आठवड्यात होऊ लागलं. अखेर सोळाव्या दिवशी त्या मुलाने तोंड उघडलं नि एक क्षीण आवाज गाव्हरिलाच्या कानावर आला. कोळ्याच्या जाळ्याच्या तंतूइतका बारीक भासला त्याला तो.

'आजोबाऽ'

'काय बाळ ?'

'त्यांनी माझा चांगलाच खतमा केला, होय ना ?'

'देवाने वाचवलं ना पण ?'

यावर तो काहीच बोलला नाही. पण त्याच्या छोट्याशाच पारदर्शक कटाक्षात गाव्हरिलाने बालिश विनोदी हास्याची झलक पाहिली.

'बाकीचे माझे सवंगडी... काय झालं त्यांच ?'

'ते ?... त्यांना चौरस्त्यावरच पुरून टाकल.' तो स्तब्ध झाला.

गाव्हरिलाने विचारल– 'तुझं नांव ?'

'निकोलाई' त्याच्या नजरेत थकवा दिसत होता.

'हरकत नाही. आम्ही तुला पेट्रो म्हणू... आमचा मुलगा होता पेट्रो नावाचा.' गाव्हरिला आणखी काहीतरी पुढे बोलणार होता. पण त्या मुलाचा जोराने श्वासोच्छवास सुरू झाला आणि त्यानी दोन्ही हात बिछान्याखाली लोबकळत ठेवले. हे पाहून गाव्हरिला मुकाट्याने तेथून निघून गेला.

हळूहळू त्याच्या अंगात चैतन्य सचारू लागलं. आता त्याला उशीवरून डोकं उचलता येऊ लागल. पण सतत बिछान्यावर पडून पडून त्याची पाठ सुजल्यासारखी झाली.

दिवस जात होते, तसतसा गाव्हरिला आपल्या नव्या पेट्रोकडे अधिकाधिक आकर्षित होऊ लागला. आणि पहिला पेट्रो, त्याचा स्वत:चा मुलगा त्याच्या स्मृतिपटलावरून दूर दूर सरकत अस्पष्ट होऊ लागला. मावळत्या सूर्याचे किरण खिडकीच्या तावदानावरून सरकत सरकत नाहीसे व्हावेत, अगदी तद्वतच! कधी कधी तो मुद्दाम आपल्या मुलाची आठवण करून पाहायचा, पण जो जो तो प्रयत्न करी तो तो मुलाची स्मृति त्याच्यापासून दूर दूर पळू लागे. त्याचं त्यालाच राहून राहून नवल वाटे. मनातल्या मनात तो खजील पण होई. बराच वेळ अशा विचित्र मन.स्थितीत तो अगणात येरझारा घाली अन मग बायको पेट्रोजवळ केव्हाची बसून आहे हे आठवताच तो लगबगीने घरात येई अन आपल्या ड्यूटीवर चूपचाप रुजू होई. त्याची पत्नी मग तेथून उठता उठता गाव्हरिलाकडे रागीट नजर फेकल्याविना जात नसे.

नव्या पेट्रोला आता बिछान्यातल्या बिछान्यात उठून बसता येऊ लागलं. एक दिवस रात्रीच्यावेळी त्याच्या कानावर संभाषण आलं–

'झोप लागली का गं ?'

'नाही. का बरं ?'

'काही नाही. आता आपला मुलगा लवकरच हिंडू फिरू लागेल. तू आपल्या पेट्रोचा एक ड्रेस अन् त्याची पदकं वगैरे काढून ठेव. त्याला घालायला लागेल ना. त्याच्याजवळ कपडे कुठे आहेत ?'

'माहीत आहे मला. आधीच काढून ठेवले आहेत मी.'

'वा ! मोठी हुषार आहेस तू...कोट पण काढलास ना बाहेर ?'

'का नाही काढणार ? त्याला काय उघड्याने फिरू द्यायचं ?'

गाव्हरिलाने कड बदलला. त्याला एक डुलकी आली. पण एकाएकी त्याला कसलीतरी आठवण आली. उशीवरून डोकं उचलत तो म्हणाला–

'आणि काय ग, हॅटच काय ? ती नाही का काढून ठेवलीस वर ?

'काय उगाच त्रास देता ? झोपू द्या ना जरा. हॅट आहे तिथे खुटीवर लटकवलेली. कालपासून तिथेच आहे. सारखे तिथून जा-ये करता पण तुम्हाला ती दिसत नाहीये.'

गाव्हरिला चूप बसला आणि झोपी गेला.

वसंत ऋतुच्या आगमनाची चाहूल लागत होती. डॉन नदीच्या पात्राकडे पाहून विशेष जाणीव होत होती. बर्फ काळा पडू लागला होता. कुरतडल्यासारखा दिसत होता.

मार्च महिना संपला होता.

'बाबा, आज मी उठेन म्हणतो. खूप बरं वाटतंय् मला आज.'

गाव्हरिलाकडे मधून मधून येणारे लाल सैन्यातील सारे लोक त्याला त्याचे पांढरे केस पाहून बाबा म्हणून सबोधत असले तरी आज ऐकलेल्या ह्या शब्दात त्याला वेगळीच ऊब जाणवली. त्याच्या चेहऱ्यावर लाली पसरली त्यांनी बळेच खोकला काढला आणि आपल्या मनातील आनदाची भावना त्यामागे दडवून ठेवली. मग म्हटलं–

'दोन महिने भरपूर विश्रांती घेऊन झाली. आता उठून हिंडाफिरायला हरकत नाही, पेट्रो.'

तस त्याच्यात सभाषण फारस झालच नाही. पण जे काय बोलणं झालं त्या प्रत्येकवेळी पेट्रोच्या तोंडून निघणाऱ्या 'बाबा' ह्या आपुलकीच्या उद्गारांनी त्याच्या मनात आनंदाच्या उर्मी उसळत एवढं खरं!

आणखी दोन दिवसानी रात्रीच्यावेळी बिछान्यावर पडल्या पडल्या गाव्हरिलाने विचारल–

'बाळा, तू कुठचा रे मूळचा ?'

'युराल्सचा.'

'शेतकऱ्याचा ?'

'नाही. कामकरी वर्गातला.'

'तू काही व्यापार वगैरे करीत होतास ? कोण होतास तू अगोदर ?'

'मी एका फॅक्टरीत काम करीत होतो बाबा. पोलादाच्या कारखान्यात. तिथेच लहानाचा मोठा झालो.'

'मग तू त्या लोकाबरोबर धान्य गोळा करायला म्हणून कसा आलास ?'

'सैन्यातर्फे पला पाठवण्यात आलं होत.'

म्हणजे ? तू लाल सैन्याचा कमांडर होतास ?'

'होय बाबा.'

'याचा अर्थ तू...'

'मी कम्युनिस्ट आहे 'पेट्रो हसत म्हणाला. आतापर्यंत चूप बसलेली म्हातारी बोलायला सधीच पाहात होती. म्हणाला–

'तुझ्या कुटुंबात कोणकोण आहे रे पेट्रो ?'

'छे! कोणीही नाही माझ म्हणायला मला कोणीच नाही. आकाशात भ्रमण करणाऱ्या चद्रासारखा मी एकटा एक आहे.'

'तुझे आईवडील जिवंत नाहीत ?'

'मी सात वर्षांचा होतो तेव्हा माझ्या वडिलांचा एका झटापटीत खून झाला आणि आई दुसऱ्या एका माणसाबरोबर पळून गेली. मला तिने सोडून दिल. फॅक्टरीतच मी राहिलो, तिथेच वाढलो.'

गाव्हरिलाने पाय लोंबकळत सोडले. मग त्याने हळूहळू पण स्पष्ट बोलण्यात सुरुवात केली–

'ठीक आहे, बाळ. तुझ्या घरी तुझं कोणीच नसेल तर तू यापुढे आमचेकडेच राहा. आमचा एक मुलगा होता–त्याचं नाव होतं पेट्रो... त्यामुळेच आम्ही तुलाही पेट्रो म्हणू लागलो आहोत...त्याला आता बरेच दिवस झाले आता आम्ही दोघे म्हातारा-म्हातारी उरलो आहोत, एकमेकाना सोबत करीत आहोत. आजवर तुझ्या काळजीतच आम्ही दिवस काढले म्हणूनच कदाचित तुझ्याविषयी आम्हाला विशेष प्रेम वाटू लागलं असाव. तुझ रक्त वेगळं असेलही, तरीपण तुझ्यासाठी आमची अंत.करणं तुटतात हेही तितकच खर आहे जणु काही तू आमचाच मुलगा आहेस, आमच्या रक्ताचा आहेस अशी आम्हाला तुझ्याविषयी ओढ वाटते...तू आमच्याजवळच राहा बेटा. आपण सारे एकत्र राहू या. डॉनच्या काठची ही जमीन मोठी सुपीक आहे. तिच्यावर आपला चरितार्थ चालेल. येथे तुझा चागला जम बसला की मग एखादी चागलीशी मुलगी बघून तुझे लग्न करून देऊ आमचे आयुष्य आता सरत आले आहे. पुढे या जमिनीचा मालक तूच होशील. तुला माझे एकच सांगणे आहे आमच्या ह्या असहाय्य वृद्धत्वाची तू कदर करावीस आणि मरेपर्यंत आम्हाला दूर लोटू नयेस... बेटा पेट्रो, आम्हा म्हाताऱ्यांना दूर लोटून निघून जाऊ नकोस हो... पेट्रो!'

थोड्या वेळाने पुन्हा गाव्हरिला उसने हसत म्हणाला–

'आम्ही दोघ खर म्हणजे कधीपासूनच तुझ्यासाठी मुलगी धुंडतो आहोत.'

एवढा वेळ पेट्रोची नजर जमिनीवर खिळली होती. एका हाताने बसलेल्या बाकड्यावर तो मधूनच टकटक आवाज करीत होता. मनातल्या मनात उत्तर देण्याची तयारी करीत होता. एकाएकी सारे धैर्य एकवटून त्याने मान वर केली.

'बाबा, मी तुमच्याजवळ राहीन. पण मी जास्त काम करू शकणार नाही. माझा उजवा हात अजून ठीक झालेला नाही. तरीपण शक्य तेवढे काम मी करीत जाईन. ह्या उन्हाळाभर तरी मी नक्कीच तुमचेकडे राहीन. नंतर बघू या.'

म्हातारी सूत कातत बसली होती. चाक एकदम वेगाने फिरू लागलं. त्या आवाजाने जणु ते आनंदच व्यक्त करीत होतं. पाहता पाहता लोकरीचा जाडजूड गोळा तयार झाला. किंवा कदाचित तो आवाज म्हणजे जणु अगाई गीतच असाव. त्या पेंगुळलेल्या जीवनासाठी गाइलेलं!–कुणी सांगावं?

✤

वसंत ऋतुच्या पाठोपाठ उन्हाळा आला. हवा चागली होती. डॉन नदी बंडखोर झाली होती. दुथडी भरून वहात होती. सगळीकडे चैतन्य खेळत होतं. वातावरणात सुगध दरवळत होता. झाडं आपल्या फुलांच्या पाकळ्या तलावाच्या काठाकाठाने पसरवीत होती. रात्रीच्या वेळी आकाशात मधूनच वीजा चमकायच्या–एखाद्या तरुणीच्या कटाक्षांसारख्या!

गाव्हरिला आणि पेट्रो दोघ मिळून कामाला लागले. आठवडाभर शेतावर राहिले. नांगरणी, वखरणी, पेरणी सारं काही दोघानी मिळून केलं. रात्रीच्या वेळी बैलगाडीच्या खाली दोघे झोपून राहात. एकच पांघरुण पाघरीत. आपल्या ह्या नव्या पुत्राशी कसल्यातरी अदृश्य साखळीने आपण बांधले जात आहोत असा क्षणोक्षणी गाव्हरिलाला भास होई. आणि ह्या संभ्रमात दुसरा पेट्रो–मृत्युमुखी पडलेला पेट्रो–स्मृतितून अस्पष्ट होऊ लागे. त्याच्याबद्दल गाव्हरिला आता कमीच विचार करी. भरमसाठ कामामुळे तर नुसत्या आठवणी करीत बसण्याइतकी फुरसदही त्याला मिळेनाशी झाली.

दिवस कसे चोरासारखे पळू लागले. धान्य कापणीचा समय केव्हा कसा येऊन ठेपला ते कळले देखील नाही

एके दिवशी सकाळी पेट्रो विचारात गढून गेला होता. सारा दिवस त्याने खूप काम केलं. सायकाळी कमिटीच्या मिटीगसाठी निघून गेला. तो गेल्यानंतर म्हातारीने एक पत्र गाव्हरिलाला दाखवलं. त्यावर पत्ता, 'कॉमरेड निकोलाई, द्वारा गाव्हरिला' असा होता.

गाव्हरिलाने बराच वेळ ते पत्र उलटंपालटं करून पाहिलं. त्यावरची अक्षर निरखून पाहिली आपल्या मन:शातीला उध्वस्त करणाऱ्या त्या पत्राचा क्षणभर त्याला रागही आला. त्याला एकदा वाटल, ते उघडून बघावं. पण त्याने तसं काही केलं नाही. पेट्रो त्याला फाटकाशीच भेटला.

'बेटा तुझ पत्र आलंय् एक.'

'माझं–?'

'होय. आत चल आणि वाच.'

गाव्हरिलाने दिवा लावला आणि पत्र वाचताना पेट्रोच्या चेहऱ्यावर उमटलेले आनंदाचे भाव निरखू लागला. त्याच वाचणं सपलं तेव्हा विचारल —

'कुठून आलंय रे पत्र?'

'युराल्स वरून.'

'कोणी लिहीलंय?'

'कारखान्यात काम करणाऱ्या माझ्या मित्राने.'

गाव्हरिला चरकला. 'कशाबद्दल लिहिलंय?' त्याने विचारलं. पेट्रोची नजर निस्तेज झाली. अनिच्छापूर्वक तो म्हणाला–

'ते मला परत बोलावताहेत. कारखाना पुन्हा सुरू करायचा त्याचा विचार आहे १९१७ पासून बद पडला होता.'

'मग?...तू जाणार आहेस?'

'कोण जाणे! मला काही कळत नाही–!'

✤

पेट्रोचा पडलेला चेहरा, निस्तेज नजर, बिछान्यावर पडल्यापडल्या अस्वस्थतेमुळे त्याचं कुस बदलणं हे सार गाव्हरिलाच्या लक्षात यायला वेळ लागला नाही. बराचवेळ विचार केल्यावर त्याची खात्री झाली की खेड्यातलं जीवन पेट्रोला मानवणारं नाही. ती काळीशार जमीन नांगरून काढण्यासाठी म्हणून त्याला साद घालू शकत नाही. ज्या कारखान्यात पेट्रो वाढला, लहानाचा मोठा झाला तोच त्याचेवर आपला हक्क प्रस्थापित करणार हे नक्की.

कापणीच्या तिसऱ्या दिवशी पेट्रोने आपणहून बोलायला सुरुवात केली

'बाबा, मी इथे राहू शकणार नाही. तो कारखाना मला सारखा खुणावतो आहे. माझ्या अंत.करणाच्या धाग्यांना पीळ पाडतो आहे...'

'इथलं जीवन तुला आवडत नाही?'

'तसं नव्हे...पण तो कारखाना आमचा आहे. जुलमी राजाचं सैन्य पुढे सरसावलं तेव्हा दहा दिवस आम्ही काम थांबवलं. मग

त्यांनी आमची नऊ माणसं मारून टाकली व त्यावर तावा मिळवला. आता सारे कामकरी सैन्यातून निवृत्त होऊन पुन्हा कारखाना चालू करण्याच्या विचारात आहेत. त्यांची, त्याच्या कुटुंबियांची उपासमार होत आहे. पण आता ते कसून प्रयत्न करणार आहेत. अशा वेळी मी इथे चैनीत कसा राहू शकेन? माझी सद्सद्‌विवेकबुद्धी मला स्वस्थ राहू देईल असं वाटतं?'

'पण तू जाऊन काय करणार? तुझा उजवा हात निरुपयोगी ठरला आहे.'

'ह्या बोलण्यात काय अर्थ आहे बाबा? मिळतील तेवढे लोक त्यांना हवे आहेत.'

'ठीक आहे. मी तुला तुझ्या निर्णयापासून परावृत्त करीत नाही. तुझी इच्छा असेल तर तू अवश्य जा. पण एकच कर, म्हातारीला खरं सागू नकोस. तू पुन्हा परत येणार आहेस असं तिला साग. लवकरच येणार म्हणून म्हण. तिला तुझा विरह सहन होणार नाही. खरं सांगितलस तर तिचा अतच व्हायचा एखादवेळी...कारण तूच आता आमच सर्वस्व आहेस.. होय ना?'

अस बोलताना आशेचा एक बारीकसा किरण त्याच्याही मनात डोकावत होता. त्या आधारानेच त्याने पुढे म्हटल—'आणि कोण जाणे! कदाचित तू पुन्हा परत येशीलही. आम्हा म्हाताऱ्याविषयी तुझ्या अंत.करणात थोडातरी जिव्हाळा असेलच...होय ना?'

गाडी तयार झाली. बैल जोडले गेले. गाव्हरिला पेट्रोला पोचवायला म्हणून निघाला. रस्ताभर तो बोलत होता आणि चेहऱ्यावर उसनं हसू खेळवीत होता.

एका विशिष्ट मर्यादेपाशी आल्यावर त्याने म्हटलं—'आता इथेच आपल्याला एकमेकांचा निरोप घ्यायला हवा. पुढे रस्ता सरळ नाही. टेकडीवरून जातो. पुढचं अंतर तुला पायी जाव लागेल.'

पेट्रो गाडीतून खाली उतरला. त्याने सामानाची पिशवी सावरली. गाव्हरिलाने मोठ्या कष्टाने आपले हुंदके आवरीत थरथरणारे हात समोर केले.

'अच्छा, बेटा. गुडबाय्. तुझ्याविना उद्याचा सूर्योदय आमच्यासाठी असणारच नाही...'

त्याचा चेहरा अश्रूंनी आणि वेदनांनी माखून निघाला आणि एकाएकी त्याने आपला आवाज चढवला. म्हटल—

'बेटा, खाण्याच्या वस्तू विसरला नाहीस ना? म्हातारीने मोठ्या प्रेमाने तुझ्यासाठी तयार केल्या आहेत त्या...नीट ठेवलंय् ना सगळं? अच्छा...गुडबाय्...साभाळून जा हं बेटा...'

पेट्रो निघाला. जवळजवळ धावतच. तो दूर गेल्यावर गाव्हरिला म्हणाला, 'परत ये ह.' आधारासाठी त्याने गाडीच्या कठड्याला धरलं.

'छे! तो कधीच येणार नाही.' त्याच्या अत करणातील खोल स्तब्धतेतून एक आवाज उमटला.

पेट्रो आणखी दूर गेला. आता त्याचं डोकं फक्त दिसत होतं. त्याने आपली टोपी हलवून अभिवादन केलं आणि धुळीच्या उच लोटात तो अदृश्य झाला.

---


# बिमल रॉय गुरुदत्त आणि राजकपूर

मुंबईच्या अफाट चित्रनगरीवर
ज्यांनी आपल्या कर्तृत्वाने
छाप पाडली आणि
स्वतःची हुकमत चालवली
त्या तीन कलावंतांचा आणि
त्यांच्या कलाकृतींचा प्रदीर्घ परिचय

सादरकर्ते
दिलीप कुलकर्णी
अरुणा अंतरकर

# चित्र वार्ता दिवाळी अंकात

# पाक्षिक भविष्य

कृष्ण माईणकर

**दि. १ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर १९७३**

**मेष** : भरभराटीचा काळ

राशीत अत्यंत समर्थ असा मंगळ ही एकच गोष्ट खरे म्हणजे तुमच्या यशाची हमी द्यायला पुरेशी आहे. पण एवढीच काही तुमच्या बाबतीत जमेची बाजू नाही. दशमस्थानी गुरु व पहिल्याच आठवड्यास होणारी या गुरुची चंद्राशी युती औद्योगिक क्षेत्रात नव्या पर्वाची नांदी ठरणार आहे. दि. १६ रोजी रवि तूळ राशींत प्रवेश करीत आहे. हा रवि नीच असून मंगळाबरोबर त्याचा प्रतियोग होत आहे. संसारी जीवनात यानंतर काही काळ काळजी घेणे आवश्यक ठरणार आहे. पतीपत्नींची भांडणे वाढवू नयेत. प्रेमसंबंधात परस्परांत अविश्वाचे वातावरण राहील. घटस्फोटाचे खटले मनाविरुद्ध जातील. दि. २६ च्या रवि-चंद्राच्या युति आसपास सावधगिरीने वागावे. दि. ३ रोजी शुक्राचे वृश्चिक या त्याच्या नीच राशीत पदार्पण होईल. या शुक्राचा शरीरस्वास्थ्याच्या दृष्टीने थोडा फार प्रतिकूल परिणाम जाणवेल. रक्तदाब, दमा, अशक्तपणा याचा जुना त्रास उदभवेल. त्याचबरोबर आर्थिकदृष्टया हा योग लाभदायक ठरेल. लॉटरी, रेस, सौंदर्यप्रसाधने यांपासून आर्थिक उन्नती होईल. अनपेक्षित पैसा मिळेल. उंची कापडाचा व्यापार तेजीत येईल. महिलाकडून अर्थप्राप्ती व भरभराट होण्याचा योग आहे. सर्वच बाबतीत प्रत्यक्ष पत्नीची मदत, सल्ला, मार्गदर्शन लाभदायक ठरेल. दि. १७ ऑक्टोबरच्या चंद्र-शनी युतीनंतर दुरावलेले मित्र व नातेवाईक पुन: जवळ येतील. मदतीचा हात पुढे करतील. त्यांच्याकडून पैसादेखील मिळेल. दि. ६ ऑक्टोबरला होणारी चंद्र-गुरु युती नोकरी व उद्योगधंदा यात डोळे दिपवून टाकणारे यशस्वी बदल घडवणार आहे. ध्यानीमनी नसताना नोकरीत महत्त्वाची वरिष्ठ जागा मिळणार आहे. सर्वसामान्य व्यक्तींचे नोकरीतील जीवन देखील सुरळीत होणार आहे. बेकारी संपणार असून रोजगार सुरू होणार आहे. स्वत:चा उद्योग सुरू करण्याचे खूप दिवस मनात असलेले स्वप्न एका धनिकाच्या सहाय्याने पुरे होणार आहे. महिन्याच्या मध्यात चालू धंद्यातील पेचप्रसंग मिटणार आहे. मंदीची झळ कमी होणार आहे. **महिलांस** : स्वत:च्या विचाराने न वागता यावेळी पतीच्या मार्गदर्शनाने वागणे हिताचे ठरेल. मनासारखे वस्त्र व दागदागिने मिळण्याचा योग आहे. नोकरीत वरिष्ठांच्या कलाने वागून यश मिळवा. ¤

**वृषभ** : नोकरीत स्थैर्य

साडेसातीचे शेवटचे पर्व तुमच्या बाबतीत सुरू झाले आहे. ही शेवटच्या पर्वातील साडेसाती तुम्हाला त्रासदायक व प्रतिकूल अशी मुळीच जाणार नसून उलट फायद्याचीच

**काँग्रेस पक्षांत अंतर्गत वावळाचो शक्यता**

ऑक्टोबरच्या दि. १५ पर्यंत राजकीय धर्माचा ग्रह रवि कन्या राशीत आहे. भारताच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या मकर राशीत जरी हा रवि भाग्यस्थानी असला तरी भारताच्या मिथून लग्नाचे सुखस्थान त्याने दूषीत करून टाकले आहे. शिवाय रवि मंगळ यांचा खडाष्टक योग देखील राशीलग्नाच्या सुखस्थानातच दि. १५ ऑक्टोबरपर्यंत आहे. बुध हा अर्थकारणाचा ग्रहदेखील सध्या अनुकूल नाही. याचा इत्यर्थ असा की पावसाने अन्नधान्य परिस्थिती सुधारली असली तरी ते अन्नधान्य लोकांच्या पदरी सहजतेने पडेल असे मानावयास काही आधार नाही. या महिन्याच्या शेवटी दिवाळी येत आहे. पण दिवाळीचा आनंद व उत्साह लोकांत निर्माण होणे कठीण आहे. महागाई व टंचाई यांच्या चरकातून सर्वसामान्य लोकांची सुटका होणे कठीण वाटते. सत्तारूढ पक्षाविरुद्धचा असंतोष उग्र रूप धारण करण्याची शक्यता जास्त आहे. त्याचा परिणाम सत्तारूढ पक्षावर (काँग्रेसवर) मोठ्या प्रमाणात होणार आहे. वरिष्ठ नेत्यांच्या आश्वासनावर विश्वास राहणार नाही. मंत्री व नेते जास्तीत जास्त अप्रिय होतील. मंत्री मंडळांत बदल करण्याची गरज भासेल. बदल होण्याचीही शक्यता आहे. नालायकांना बाहेर काढण्याची हिम्मत पंतप्रधानांना होणार नाही. पक्षात त्यांच्याविरुद्ध गटबाजीची बीजे रोवली जाण्याची बरीच शक्यता आहे. काँग्रेसमधील जहाल बाहेर पडतील किंवा त्यांना शिस्तीचा बडगा दाखवला जाईल. आंध्राच्या चळवळीला पुन: चालना मिळून विभाजनाचा पर्याय विचारासाठी येईल. संघटना काँग्रेस व इंदिरा काँग्रेस यांचे एकीकरण लांबणीवर पडेल. कामराज, तारकेश्वरी सिन्हा, रामसुभग सिंग हे नेते संघटना काँग्रेसला जहाल बनवण्याचा प्रयत्न करतील. अशोक मेहतांना अध्यक्षपद नकोसे वाटू लागेल. महाराष्ट्र राज्याच्या बाबतीत लिहायचे तर मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांच्या विरुद्ध थोडीफार वादळाची चिन्हे दिसू लागतील. पण शेवटी ते पेल्यातील वादळच ठरेल. महाराष्ट्राच्या मंत्रीमंडळात असंतोषाची लागण होईल. मात्र राजीनामे देणार नाहीत. राज्यमंत्री शरद पवार यांचे महत्त्व वाढणार आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या बाबतीत लिहायचे तर भारत-पाकच्या दिल्ली कराराच्या असफलतेबद्दल मी व्यक्त केलेला होरा अनुभवास येत आहे. त्याचा अधिक प्रत्यय येऊ लागेल.

जाईल हे निःसंशय समजा. गेल्या काही वर्षांत झालेले नुकसान, स्थलांतर, अप्रतिष्ठा व उद्योगधंद्यात झालेली अधःपतित अवस्था आता इतिहासजमा होणार आहे. ते वाईट दिवस आता मनातही आणू नका. भूतकाळाकडे पाहू नका. भविष्यकाळाचा धैर्याने वेध घ्या. दि. ६ ऑक्टोबरला भाग्यस्थानी होणारी चंद्र-गुरु युती तुमचे भवितव्य प्रगतीच्या दिशेने बदलून टाकणार आहे. सुकलेल्या आशाआकांक्षांना नव्या निर्मितीची हिरवी हिरवी पालवी फुटणार आहे. उत्साह आणि आनंद मनाच्या साऱ्या वृत्ती प्रकाशून टाकणार आहे. तुमच्या मनःस्थितीत पहिल्या आठवड्यात झालेला हा बदल तुमच्याकडून बरेच काही घडवणार आहे. १६ ऑक्टोबरला रवि तूळ राशीत प्रवेश करणार आहे. या रविला फारसे बल नाही. त्याचे अभिजात सामर्थ्य व तेज तेथें निस्तेजच आहे. पण त्याचे शत्रुस्थानीचे महत्त्व फार मोठे आहे, याची अवश्य दखल घ्या. हे महत्त्व तुमचे शत्रु व तुमचे विरोधक यांच्या बाबतीत तुमच्या कर्तृत्त्वाला उठाव आणणार आहे. ज्या विरोधकानी तुमच्या विरुद्ध कटकारस्थाने केली, तुमच्या प्रतिष्ठेला कमीपणा आणण्याचा प्रयत्न केला, तुमच्या विरुद्ध निंदानालस्तीची हौस भागवून घेतली त्या सर्वांचे पारिपत्य होणार आहे. तसे सामर्थ्य तुम्हाला लाभणार आहे. हा प्रत्यय विशेष करून नोकरीत येणार आहे. दुष्ट साहेबाला आता तुमच्या तत्राने वागावे लागणार आहे. राजकारणात तुमच्या विरोधकांना तुमच्यापुढे माघार घ्यावी लागणार आहे. नाइलाजाने का होईना तुमची स्तुति करण्याची त्यांच्यावर पाळी येणार आहे. दि. ३ ऑक्टोबरला शुक्र वृश्चिकेला जाताच व दि. १४ ला शुक्र नेपच्यून युती घडताच ससारात शुभदायक काळ सुरू होईल. पुत्रजन्माचा आनद लाभेल. पत्नीचे सुख आनद देईल. सासुरवाडीकडून मदत मिळेल. उद्योगधद्यांत प्रगती होईल. दि. १६ च्या शुक्रहर्शल युतीनतर परदेशी प्रवासाचा योग जोरदार आहे. पुष्कळ दिवसाचा प्रवास घडेल. आर्थिक स्थिती सुधारेल. महिलांस : लग्न ठरण्याचा जोरदार योग दि. १४ नंतर येणार आहे. जोडीदार अनुरूप असा मिळणार आहे. कॉलेज तरुणी प्रेमात पडणार आहेत. त्यात यशही येईल. ☐

## मिथून : प्रतिष्ठा उंचावेल

तुमच्यावरील गुरुची कृपा कमी झाली असली तरी त्याबद्दल मनात कोणतीच क्षिती बाळगण्याचे कारण नाही. साडेसाती आहे. साडेसातीत सतत सावधगिरी हवी हेही खरेच पण बाराव्या शनीची कारकीर्द सपून राशीतील चंद्राबरोबर त्याची पहिल्या स्थानाची कारकीर्द सुरू झाली तेव्हाच तुमच्याभोवती अनुकूल वातावरण तयार होऊ लागले. मगळाने लाभस्थानी मेष राशीत उच्चपदावर पदार्पण केले आणि जुलैपासून तुमचे भाग्यचक्र प्रगतीच्या दिशेने वाटचालू लागले. हा महिना यश आणि अनुकूलता घेऊन प्रवेश करीत आहे. तुमच्या जीवनातील निराशा सपून आशा आणि उत्साहाचे तेजस्वी पर्व दुसऱ्या पंधरवड्यापासूनच साकार होणार आहे. दि. ६ ऑक्टोबरला मकरेत अष्टमस्थानी चंद्रगुरु युती होत आहे. या युतीची अवश्य नोंद घ्या. तब्येतीच्या बाबतीत जुन्या एखाद्या आजाराची पुनरावृत्ती होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे. एवढी काळजी घेतल्यास ही युती आर्थिक उन्नती घडवून आणील असे समजून चाला. वारसदारीचा, स्थावराचा वाद, सपत्तीचा दावा तुमच्या बाजूने होईल व पैशाचे डबोले हाती येईल. दुसरा आठवडा महत्त्वाचा आहे. लॉटरीत पैसा मिळेल. दि. ३ ऑक्टोबरला शुक्र वृश्चिक राशीत प्रवेश करून निस्तेज बनणार आहे. परस्त्रीच्या बाबतीत काळजी घ्या. वासनेवर ताबा ठेवा. ह्यातून काही वाईट घडणार नाही, याकडे लक्ष द्या. तुमच्या वर्तनाबद्दल सशय निर्माण होईल. मात्र प्रतिष्ठेला तडा जाणार नाही. उलट हा महिना प्रतिष्ठा उंचावणारा आहे. दि. १७ हर्शल तुळेत जाईल आणि मोठेपणाचे हार तुमच्या गळ्यात पडतील. एखाद्या सभेत तुमचे वक्तृत्व चमकेल. तुमचे लेखन लोकप्रिय होईल. चांगल्या कल्पना सुचतील. मागण्या पुऱ्या करता येतील. राजकारणी लोकांना दि. १६ नंतरचा काळ अनुकूल आहे. त्याची उपेक्षा सपेल. ते ज्या पक्षात असतील त्यच पक्षात त्यांना महत्त्वाचे स्थान मिळेल. जन्मस्थ रवि जर मिथून राशीत असेल तर अशा राजकारणी व्यक्तीला शासनात अत्यंत महत्त्वाचे उच्च स्थान प्राप्त होईल. आर्थिक स्थिती व औद्योगिक प्रगती चालू राहील. महिलांस : चंद्र-गुरु युतीपासून नोकरीत प्रगती होईल. दुय्यम उद्योगात चांगली अर्थप्राप्ती होईल. हाती पैसा खेळेल ☐

## कर्क : मनःस्थिती सुधारेल

अनुकूल भविष्य वाचण्यात प्रत्येक व्यक्तीला आनद होत असतो. खोटे ठरले तरी अनुकूल आणि चांगलेच भविष्य लोकाना हवे असते. प्रतिकूल असले तरी खरे भविष्य वाचण्याची वाचकांच्या मनाची तयारी नाही. पण शनि हा मन हळवे बनवतो तसेच कणखरही बनवतो. आपणास शनीची साडेसाती आहे. पण आपल्या मन.स्थितीवर त्याचा परिणाम होणार नाही. दि. ६ आक्टोबरच्या चद्र-गुरु युतीपासून आपली मनस्थिती उत्साहाच्या वाऱ्यावर तरंगणार आहे. औदास्य, नाराजी, अतिरेकी विचार सारे सारे आता विरत जाणार आहे. सातव्या गुरुची तुमच्यावर भरपूर कृपा आहे. तुम्ही रोज सकाळी गुरुचरित्र शक्य असेल तेवढे वाचीत जा. त्यामुळे शांती व समाधान मिळून अगिकृत कार्याला प्रेरणा मिळू शकेल. दि. १३ ऑक्टोबरच्या चद्रमंगळ मेषेतील युतीपासून आपले व्यावसायिक जीवन भरभराटेल, चांगलेच सुधारेल. तुम्ही जर मोठे उद्योगपती असाल, अनेक वा एका धंद्याचे मालक असाल, तर दुसऱ्या पधरावड्यापासून तुमच्या धंद्यात भरभराट होणार आहे. अडचणीवर तुम्ही मात करणार आहात. तुम्हाला उत्पादनांसाठी हव्या असलेल्या वस्तू उपलब्ध होतील. आर्थिक सहाय्य मिळेल. तुमच्या धद्यात जर सघर्ष चालू असला तर तो मिटण्याची चिन्हे दिसू लागतील. नव्या उद्योगाची मुहूर्तमेढ रोवण्याची योजना दृष्टिपथात येईल. दि. १६ च्या शुक्र-हर्षल युतीपासून नोकरीत आकस्मिक बदलाची चिन्हे दिसू लागतील. चालू कामात बदल होईल. कदाचित सध्याची जाईनही बदलेल. कलावंतांच्या भोवती दाटलेला अधार दूर होवून त्यांना प्रकाश दिसू लागेल. सरकारी मदत देखील कुणाच्या नशिबी येईल. दि. १७ ला शनियुती व्ययस्थानी घडत आहे. राशिस्थ चंद्र शनीने दूषीत होत आहे. साडेसाती आहे. कोणतेही मोठे धाडस करू नये. प्रवासाचे बेत रद्द करावेत. ते तडीस जाणे कठीण आहे. वाहन स्वतः चालवणाऱ्यांनी तरी जास्त काळजी

घ्यावी हे बरे ! पचनशक्तीवर परिणाम होईल. तब्बेतीची कुरकुर सुरू होईल. मोठा त्रास मात्र होणार नाही. पण काहीना काही सुरू राहील. मित्राची मदत हवी तशी मिळणार नाही. आर्थिक परिस्थिती खालावणार नाही. परंतु पैसा नुसता खर्च होत राहील. **महिलांस :** गुरुकृपा आहे. मनोरथ पुरे झाले नाहीत तरी निराशा पदरी येणार नाही. माहेरचे पाठबळ मिळेल. व्रतवैकल्ये हातून पार पडतील. नोकरीला असाल तर अनुकूलता व सहानुभूती मिळेल. ☐

## सिंह : कौटुंबिक सुख


वृश्चिकेच्या चंद्राने महिन्याची सुरुवात होत आहे व दि. ३ ऑक्टोबरला शुक्रदेखील त्याच्या सहवासांत येत आहे. ज्योतिषशास्त्रदृष्टया वृश्चिकेचा शुक्र नीच, निर्बल असला तरी तो चंद्राने युक्त आहे व त्याला स्थानमहात्म्य मोठे आहे. त्याचे स्थानमहात्म्य उपेक्षून चालणार नाही. आजवर दुरावलेले मातृसुख यावेळेपासून पुनः मिळू लागेल. आईचे सुख ही परमभाग्याचीच गोष्ट होय तुम्ही राहत्या जागेच्या चिंतेत असाल तर यावेळी जागा मिळू शकेल. कुणाचे बंगल्याचे स्वप्न साकार होईल. धनिक व प्रतिष्ठीत स्त्रीचे उत्तम सहकार्य मिळेल. त्यामुळे अनेक बाबतीत मोठे यश मिळेल. सोने, चांदी, पितळेची भांडी कापड याचा तुम्ही व्यापार करीत असाल तर त्याला गिऱ्हाईकांची झुंबड उडून पैसा मिळेल. वाहन घेण्याचा योग यानतर लवकरच येईल. पैसा मिळवण्याच्या दृष्टीने थोडीफार सुधारणा होईल. मात्र हाती टिकणार नाही. मन चैनीकडे धाव घेईल. विवाहीत व्यक्तीने जरा दम धरावा. दि.१७लाहर्षल पराक्रम स्थान उज्वल करण्यासाठी तूळ राशीत प्रवेश करील व दि. २५ रोजी त्याच्याबरोबर चद्राची युती होईल. त्यापूर्वीच्या १० दिवसांत अनेक शुभ घटना घडून येणार आहेत. तुमची स्वप्ने साकार होणार आहेत. राजकारणात तुमचे स्थान पक्के होणार आहे. तुम्ही राजकारणात जर महत्त्वाच्या जागेवर असाल तर तिथली डळमळ दूर होईल. अनेकांचे सहकार्य लाभेल. नोकरीत कर्तृत्वाला उठाव मिळेल. बुद्धी व योजना कार्यान्वित करण्यासाठी नव्या क्षेत्रात नेमणूक होईल. चालू नोकरीचे स्वरूप देखील बदलण्याची शक्यता आहे. दि. १७ ते २५ या दरम्यान लक्षात येण्याइतके आर्थिक मान सुधारेल. कर्ज काढावे लागणार नाही. मागची पगार वाढ मिळून वेळ साजरी होईल. तुम्हाला शनि अकरावा आहे तो आर्थिक व औद्योगिक क्षेत्रात तुमचा मित्र आहे. लॉटरीत व रेसमध्ये पैसा मिळेल. मादक वस्तूच्या व्यापारात खूप पैसा मिळेल. नवी वस्तू घेण्याची इच्छा पुरी होईल कुटुंबात आनदाचे व प्रसन्नतेचे वातावरण राहील. मुले मान देतील. दि. २७ च्या चद्र-बुध युतीच्या जवळपास लक्षात राहील असा सन्मानाचा योग येईल. **महिलांस :** आजार व अनारोग्य यामुळे त्रासलेले मन दि. ३ पासून मुक्त होईल. सुधारणा होईल. नोकरीत कामाचा त्रास कमी होईल. दुसऱ्या आठवड्यात पैसा मिळेल. ☐

## कन्या : प्रगतीकडे वाटचाल

आठव्या मगळाने तुमचे शारिरीक जीवन मोठे चमत्कारिक करून टाकले आहे. अनारोग्य, अपचन, निराशा, निरुत्साह यामुळे सध्या तुम्ही एकप्रकारे अगतिक झाला आहात. पण काळ बदलत असतो. रात्र संपते व गुलाबी उषःकालाची तुतारी ऐकू येते. तसेच तुमच्याबाबतीत घडू लागणार आहे. हा महिना प्रसन्नतेची झुळूक घेऊन येणार आहे. भावनेला व वृत्तीला सुगधाचे वारे स्पर्श करणार आहे. शारिरीक निरोगीपणा अजून काही काळ येणार नसला तरी मनाचा निरोगीपणा मात्र लाभणार आहे. दि. ३ला वृश्चिकेत शुक्राचे पदार्पण होताच याचा प्रत्यय येऊ लागेल. दि. १३ ला चद्रमगळाचीयुती आठव्या स्थानी होत आहे त्यावेळी थोडी तब्येतीची काळजी घ्या. दि. १६ पर्यंत रवीचे तुम्हाला चागले सहाय्य आहे. यापूर्वी अनेक कामे निकाली काढा. आर्थिक परिस्थितीत सुधारणा होईल. लेखनात पैसा मिळेल. लेखकाला मागणी येईल. प्रतिष्ठा, पैसा, कीर्ती मिळेल. चार लोकात नाव घेतले जाईल. राजकारणात प्रवेश मिळेल. महत्त्वाकांक्षा उत्तेजित होईल. दि. ३ नतर घरात मंगलकार्य घडेल. पाहुण्याचे प्रस्थान घरी होईल. नातेवाईकांची पत्रे येतील. सबंध सुधारतील. दि. ६ रोजी मकरेत पचमस्थानी चद्राबरोबर युती होईल. तिथूनच पुढे प्रगतीची चाहूल लागेल व अनेक बाबतीत सुधारणेचे पर्व सुरू होईल. प्रामुख्या आर्थिक प्राप्तीचे सुकलेले झरे यानंतर पुन्हा वाहू लागतील. थाबलेले व्यवहार सुरू होतील. पैसा मिळू लागेल. कर्ज फिटू लागेल. नोकरीत थोडीथोडी सुधारणा होऊ लागेल. अस्थिरता कमी होईल. वडिलांच्या मनात आपुलकी निर्माण होऊ लागेल. त्यांनी तुमच्यावर केलेल्या अन्यायाची त्यांना जाणीव होऊ लागेल. नोकरीत हातून गेलेली सूत्रे, प्रसिद्धीची साधने पुन्हा मिळण्यासारखी परिस्थिती निर्माण होईल. नोकरी नसल्यास ती मिळेल. दुसऱ्या पंधरवडयात सेवानिवृत्ती असेल तर ती पुढे ढकलली जाईल व वाढ मिळेल. दि. १७ ते २६ या काळात व्यावसायिक स्थिती सुधारेल. प्रकाशन व्यवसायाला तेजी येईल. तुमचा छापखान्याशी संबंध असेल तर फायदाच होईल. बँक व्यवहाराशी संबध असेल तर फायदाच होईल. परीक्षा असेल तर त्यांत नेत्रदीपक यश मिळेल. परदेशी प्रवासाचा योगदेखील यावेळी आहे. **महिलांस :** विवाहाच्या हालचाली करायला हा काळ उत्तम आहे तीर्थयात्रा घडतील. प्रवासाचा योग आहे. नोकरीत दुसऱ्या पधरवडयात अनुकूलता लाभेल. ☐

## तूळ : कर्तृत्वाचे चीज

तुम्हाला शनी हा एक अंतरिक्षातील समर्थ ग्रह भाग्यस्थानी साथ देत आहे त्यामुळे खरे म्हणजे तुमचे सारे सुरळीत असावयास हवे. पण इतरही ग्रह तसे थोडे तरी अनुकूल असावयास हवेत. मगळ सातवा स्वगृहीचा आहे. तो तेवढा अनुकूल नाही. रवी दि. १६ पर्यंत अनुकूल नाही. म्हणूनच पहिला पंधरवडा जरा सबुरीनेच काढा. दुसरा पंधरवडा अधिक अनुकूल जाईल. दि. ३ रोजी शुक्र कुटुबस्थानी वृश्चिक राशीत प्रवेश करीत आहे. तो तेथे अगदी निस्तेज आहे. कुटुबात थोडी कटकटीची परिस्थिती उद्‌भवेल. ती तात्पुरती राहील. पण तुमचे वर्तन व विकारवशता जरा ताब्यात ठेवा. हातून काही आक्षेपार्ह घडणार नाही याची काळजी घ्या. परस्त्रीच्या फदात फारसे पडू नका. हा शुक्र आर्थिक स्थिती मात्र बरीच सुधारणार आहे. दुय्यम व्यवसायांत चार पैसे मिळतील. सोनेचांदी, कापड व्यापार, सौंदर्यप्रसाधने




## आपण असे आहात !

वरील आकृतीत दर्शविल्याप्रमाणे आपल्या कुंडलीत शुक्र असेल तर आपण विलासी, रंगेल मनोवृत्तीचे, कलासक्त व स्त्री पक्षाकडे ओढा अधिक असणारे आहात असे समजावे.

आपण स्त्री असाल तर आपला चेहरा अत्यत सुंदर, मोहक, आकर्षक व तेज:पुंज असेल. व आपला हमखास प्रेमविवाहच होईल. आपणास अगदी आपल्या मनासारखा प्रेमळ पती लाभेल व आपले सारे जीवन सुखाचे जाईल.

आपणास नटण्यामुरडण्याची हौस फार राहील. दिवसातून हजार वेळा आरशासमोर उभ्या राहून आपणांस आपले सौदर्य न्याहाळीत बसण्याची, स्नो पावडर जरा कमी पडली की काय ? फुलांची वेणी हवी तशी नीट बसलीय किंवा नाही हे तपासून पाहण्याची सवय (खोड) असेल, थोडक्यात म्हणजे आपण अगदी नेहमी टिपटॉप दिसावे असा आपला कटाक्ष आहे.

कपड्यांच्या बाबतीत तर विचारूच नका. रंगीबेरंगी पातळे, निरनिराळ्या डिझाईन्स् असलेले ब्लाऊज पिसेस आपणांस वापरणे फार आवडेल. नवीन फॅशन सुरू करण्यात आपणच पुढाकार घेता असा माझा आपणावर आरोप आहे. (आपण कबूल करा किंवा करू नका.)

हा शुक्र फारच उत्तम समजावा. नृत्य, गायन, वादन, अभिनय, रांगोळी, भरतकाम (Embroidery) यापैकी कोणत्या ना कोणत्या कलेत आपण प्राविण्य मिळविलेले असलेच पाहिजे.

आपणास दागदागिन्यांचा सोस फार. आणि आपल्या नशिबाने आपणास हवे तेवढे दागिने व पैसा प्राप्त होऊन आपण ऐषआरामात जीवन जगाल.

पुरुषानाही हेच गुणधर्म लागू आहेत. या योगावर जन्मलेला पुरुष कलावंत होणार, श्रीमान विद्वान होणार. फक्त पुरुषाचा दोष इतकाच आहे की–' त्याला, जे नवं ते हवं ' असं सारखं वाटेल.

विवाहापूर्वी याचे अनेक प्रेमसंबंध जमलेले असतील. त्याचप्रमाणे विवाहानंतरही, प्रेमसंबंध जमणार नाहीत, असे मी म्हणू शकत नाही.

एकूण हा शुक्र माणसाला प्रणयकुशल बनवितो व सुखीही करतो. आपण असे आहात ना ?

हा शुक्र कोणत्याही पापग्रहाने, विशेषत: मंगळ, शनि व राहू, यांनी बिघडलेला नसावा.

**एन्. आर. साळवी, ॲस्ट्रॉलॉजर पनवेल**

याच्याशी संबंध असतील त्या व्यक्तीना पैसा बराच मिळेल कर्ज मुक्तीही होण्याची संधी मिळेल. दि. ६ ते १२ या दरम्यान कोणताही उद्योग सुरू केला तर यश लाभेल. आशा आकांक्षा साकार होऊ शकतील. दि. १३ च्या आसपास पोटाचा विकार असलेल्यांनी जरा खाण्यापिण्यावर बधन ठेवावे. मद्याची वा मादक पदार्थाची ज्यांना सवय आहे त्यानी जास्त काळजी घ्यावी. दि. १६ ला रवी राशीत येईल. त्यानंतर तुमचे सारेच तंत्र बदलेल. शुक्रहर्षल युती राशीतच घडत आहे. तुमची प्रतिष्ठा वाढेल. समाजात मोठेपणा मिळेल. अनेक क्षेत्रात यश मिळेल. राजकारणात तुमचा प्रभाव वाढेल. डॉक्टरी व्यवसाय तेजीत चालेल. कोणतीही स्पर्धा जिंकू शकाल. प्रसिद्धी, कीर्तीचा योग आहे. चालू उद्योगात सुधारणेला वाव मिळेल. यावेळी कारखानदार, व्यापारी यांना आर्थिक लाभ उत्तम होईल. नोकरीत सुखाचे दिवस येतील. बढती बदलीचे योग आहेत. रवी-चंद्र युती दि. २६ ला राशींत होत आहे त्यावेळी मनातील एखादी खूप दिवस अपुरी राहिलेली इच्छा पुरी होईल. त्यावेळी लॉटरी वगैरे असल्यास लाभ होईल. लेखक असलात तर पुस्तकाला पुरस्कार मिळेल. गौरव, मानसन्मान असे काही घडेल. महिलांस : चौथा गुरू सुखाची महत्वाकांक्षा वाढवील. आईची खूप दिवसानी भेट होईल. माहेरच्या माणसांत मजेत वेळ जाईल. भावनेच्या आहारी जाऊ नका. ¤

### वृश्चिक : विरोधकांशी तडजोड

राशिस्वामी शत्रूस्थानी ठाण मांडून बसला आहे तो पर्यंत सार्वजनिक क्षेत्रात तुम्ही अजिंक्यच आहात. तसा तुम्हाला अनुभवही येत आहे. पण ही स्थिती दि. १६ नंतर थोडी पालटणार आहे. याची वेळीच दखल घ्या. दि. १६ ला अकरावा असलेला रवि बारावा होत आहे. तो जरी निर्बली असला तरी त्याच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. दि. ३ रोजी शुक्र राशीत येत आहे. त्यानंतर संसारात प्रसन्नतेचे वातावरण येऊ लागेल. कुटुबातील भांडणे मिटतील. नवरा-बायकोत समजस्याचे वातावरण निर्माण होईल. पुत्र रत्नाचा लाभ होईल. ज्याची लग्ने ठरत नसतील त्यांची लग्ने चटकन ठरतील. साखरपुडे होतील. तरुण तरुणी प्रेमात पडतील. हृदयात कसेसेच होऊ लागेल. चंद्र-मगळाची युती सातव्या स्थानी मेष राशीत दि. १३ रोजी होत आहे. त्यानतर सासुरवाडीकडून उद्योगधद्यासाठी मदत होईल. तुमच्या मनात एखादा उद्योग सुरू करावयाचा असेल तर ही वेळ अनुकूल आहे. भागिदारीत उद्योग सुरू करा. स्त्री भागिदार मिळत असल्यास अवश्य घ्या. जमिनीचा खरेदी विक्री व्यवहार भरपूर लाभ मिळवून देईल. शेतीच्या अवजारात, शेतीच्या उत्पन्नात पितळेचे सोने होईल. नोकरीत वरिष्ठांच्या गळ्यातील तुम्ही ताईत बनाल. तुमच्या आजवरच्या साऱ्या महत्त्वाकांक्षा यावेळी सफल होतील.

स्त्री अधिकारी असेल तर वरदान मिळेल. दि. १७ नंतर रवि बारावा होत आहे. कोर्टात अगर एखाद्या सरकारी कामात विरोधकांशी तडजोड करावी लागेल. सरकारी कामात दक्षता घ्यावी लागेल. कायद्याबाहेरचे कृत्य करण्याचा मोह टाळावा. हाती प्रत्यक्ष पैशाचे व्यवहार असतील तर मनावर 'कडक' ताबा ठेवा. पैसा वापरण्याचा उद्योग करू नका. व्यापारी लोकांनी बेकायदेशीर व्यवहार करू नयेत. नोकरीत बोलण्यावर बंधन घाला. सतापून बोलाल तर त्यामुळे नुकसान होईल. नोकरीत दक्षतापूर्वक वागलात तर त्या परिस्थितीत फरक पडणार नाही. दि. १७ नतर तब्येतीला जपणे आवश्यक आहे. पूर्वी एखादा आजार होऊन गेला असेल तर त्याचा पुन्हा उद्भव होईल. उष्णतेचा त्रास होईल. महिलांस: भाडणे टाळणे आवश्यक आहे. नोकरीत चुका होऊ देऊ नका. तात्पुरती नेमणूक असेल तर अधिक काळजी घ्या. पैसा मिळेल. ◻

## धनू : नोकरीत प्रगती

राशिस्वामी गुरु दुसरा आहे. मकरेत गुरुला फारसे तेज व सामर्थ्य नसते. तरीपण दुसरे स्थान हे धनस्थान असल्यामुळे हा हा महिना धनाच्या दृष्टीने प्रगतीचा, इच्छापूर्तीचा व आर्थिक समाधानाचा जाणार आहे हे सागायला आनद वाटतो. महिन्याच्या शेवटी दिवाळी येणार आहे. गेले वर्ष या वर्षीचा बराच काळ, नशिबी जवळ जवळ शिमगाच आला होता. पण या महिन्यात आपल्या जीवनात आनदाची दिवाळी येत असल्याची चाहूल लागेल. मन.स्थिती सुधारेल. निराशा दूर होईल. अनेक दिवसाचा आजार बरा होईल. आरोग्य लाभेल कोणतेही काम करायला उत्साह वाटेल. दि. ६ ऑक्टोबरला चद्र गुरुची युती धनस्थानी होत आहे. हे तुम्हाला वरदान ठरावे. यापूर्वी हातून निसटलेली सधी पुन्हा मिळेल. लेखनाच्या बाबतीत ज्या ज्या ठिकाणी तुमच्यावर अन्याय झाला असेल तो आपोआप दूर होईल. तुमची योग्यता पटेल व तुमच्या लेखनाला पुन्हा मागणी येईल. लेखन मोबदला देखील समाधानकारक मिळेल. प्रवासाचा बेत तडीस जाईल. विमानातून प्रवास करण्याची इच्छा पुरी होईल. दि. १३ ला चंद्र-मंगळाची युती मेष राशीत पंचमस्थानी होईल. नोकरीच्या दृष्टीने या युतीची आवश्य नोद घ्या. शेती पदवीधरांना वरिष्ठ जागी नोकरी मिळेल. चालू नोकरीत बढती प्रमोशनचा योग येईल. नोकरीत तुमच्यावर जो अन्याय झाला होता, त्याचा फेरविचार होईल. मालक किंवा वरिष्ठ यांच्या मनात आपुलकी निर्माण करण्यात तुम्हाला यश मिळेल. कलावताना दि. १७ नतर टेलिव्हिजन व चित्रपटात प्रसिद्धी मिळेल. आर्थिक कामे होतील. दुय्यम अगर मुख्य व्यवसायातील थांबलेला पैसा पुन्हा मिळू लागेल. कामाबद्दल अनेक प्रकारे दिलेली आश्वासने पुरी करता येतील. लेखनाच्या नव्या कल्पना प्रत्यक्षात येतील. लेखनाला धार चढेल. स्वतत्र उद्योगाच्या दृष्टीने महिन्याचा उत्तरार्ध जास्त महत्त्वाचा आहे. दि. १६ ला तुळेत रवि येईल. त्यानतर औषधी कारखाने चालवणारे मालक, औषधी दुकाने चालवणारे व्यापारी सुखी होतील. ते अमाप पैसा मिळवतील. राजकारणी लोकांना हा काळ एकदरीत प्रतिष्ठेचा, त्यांच्या कार्याचा गौरव करणारा व सेवेचे चीज करणारा आहे. महिलांस: या महिन्यात माहेरपणाची सधी मिळणार आहे. घरगुती उद्योगात चार पैसे जास्त मिळतील. पतिराजाबरोबर मान सन्मान मिळेल. ◻

## मकर : मनस्थितीला जपणे

तुमच्या राशीत चद्राबरोबर गुरू आहे. पण अजूनतरी त्याचा प्रत्यय तुमच्या वाट्याला फारसा आलेला दिसत नाही. भावनेचे नियत्रण करण्याचे त्याचे सामर्थ्य रवि व मंगळाने कमी करून टाकले आहे. सुखस्थानी मगळ निराशा वाढवीत आहे, सुखाचे सारे मनोरथ व किल्ले ढासळून टाकीत आहेत तर आता १५ नंतर रवि दशमस्थानी येऊन तब्येतीला सुरूंग लावण्याचा प्रयत्न करणार आहे. तो त्या ठिकाणी फारसा प्रभावी नाही. तरीपण नोकरी व्यवसायावर प्रतिकूल परिणाम घडवण्याचा चंग त्याने बांधला आहे. त्यातल्यात्यात समाधानाची गोष्ट म्हणजे शनीचे वरदान. सहावा शनी मन:स्थिती बिघडवतो. अंगीकृत कामात अपयश आले तर मन निराश होते. महत्त्वाकांक्षा असफल झाल्या तर वाईट विचार मनात येतात. तसे ते तुमच्या मनात येत असतीलच. पण आयत्यावेळी विचार सुचून तुमच्या हातून काही वाईट घडणार नाही. दि. ६ नंतर परिस्थितीत बरीच सुधारणा होईल. राशीत चद्र-गुरू युती होणार आहे. ती युती अनुकूल आहे. प्रतिष्ठा वाढेल. घसरगुंडीला लागलेला दर्जा व किंमत पुन्हा प्रस्थापित होईल. राजकारणात तुमच्या बाबतीत काही महत्त्वपूर्ण घटना घडतील. शिष्टमंडळात समावेश होऊन परदेशी जाण्याचा योग येणार आहे. दि. १७ रोजी हर्शलाचे तुळेत भ्रमण सुरू होईल. त्यानंतरचा काळ नोद करून ठेवा. नोकरीत असाल तर राहात्या जागेपासून दूर महत्त्वाच्या बढतीवर बदली होईल. पगारात भरपूर वाढ होईल. शेती महामडळे, बँका, इंजिनियरिंग उद्योग, कापड गिरण्या यात बेकारांना नोकऱ्या मिळतील. चद्र-मगळाची युती सुखस्थानी दि. १३ ला होणार आहे. त्यावेळी मनावर विशेष ताबा ठेवा. दि २६ च्या रवि-चद्र युतीनंतर मनातील एखादी इच्छा पुरी होईल. वाहन खरेदी, जागा, करमणुकीची वस्तु अशापैकी ही इच्छा असेल. शत्रुस्थानी शनीही आपल्या दृष्टीने एक महत्त्वाची घटना आहे. विरोधक कितीही काव काव करू द्या. तुमच्याविरुद्ध कटकारस्थान करू द्या, त्याचे सारे बेत नि:ष्फळ होतील. कोर्टकचेरीतील वादात तडजोड होऊन तुमचा फायदा होईल. जमिनीचा तंटा तुमच्या बाजूने होईल असे नाही. पण अनुकूल परिस्थिती निर्माण होईल. शेवटच्या आठवड्यात तुम्ही प्रवासाचा बेत आखू नका. नवीन उद्योगाचे धाडस करू नका. आर्थिकदृष्ट्या पैसा कमी पडणार नाही. परंतु हाती पैसा टिकणे कठीण आहे. अचानक खर्चाची प्रकरणे उभी राहतील. महिन्याच्या शेवटी आगतिकता निर्माण होईल. महिलांस: उपासना करा. कुलदेवतेला भजा. मनोरथ थोडे-फार पुरे होतील. मनाला शाती मिळेल.

## कुंभ : लौकीक वाढेल

तुम्ही शनिप्रधान धर्माचे लोक आहात. मुत्सद्दी, धोरणी, विचारी व निग्रही अशी तुमची प्रतिमा आहे. पण बाराव्या गुरूने तुमचा 'वैचारिक पराभव' घडवून आणायचा चंग बांधला आहे. त्याला यश येत आहे.

पाचवा शनी व तिसरा मंगळ तुम्हाला इतके प्रबल व सामर्थ्यवान बनवीत आहेत की मी म्हणेन ती पूर्व असा तुमचा स्वभाव बनत आहे. हे तुमचे सामर्थ्य आहे हे खरे असले तरी हा विचारांचा पराभव आहे. गुरु बारावा असल्याने हे घडत आहे. तात्पर्य विवेक आणि सयम सोडू नका. त्यांच्या कडेने वाटचाल केलीत तर हा महिना तुम्हाला प्रगतीच्या नव्या नव्या दिशा दाखवणार असून तुमचा लौकिक वाढवणारा आहे. ही दिवाळी तुमच्या प्रतिष्ठेत, आनंदात आणि कीर्तीत भर घालणार आहे. फक्त दूरदृष्टीने वागा. दि. १३ ला चंद्र-मंगळाची मेष राशीत म्हणजे तुमच्या पराक्रमात युती घडून येत आहे. त्यावेळी तुम्ही तुमचे मित्र तपासून घेणे आवश्यक ठरेल. तुमचे सल्लागार तुम्हाला बदसल्ला देण्याची शक्यता असून त्यामुळे व्यवसायात नुकसान पोचण्याचा संभव आहे. कोणताही नवा उद्योग भागीदारीत न काढता स्वतःच्या पूर्ण विचाराने तो काढा. यश तुमचे आहे. या मुदतीत मित्र व नातेवाईक तुमचा फायदा उठवण्यासाठी तुमच्याभोवती जमा होतील. दि. १७ ला हर्षलाचे तुमच्या भाग्यस्थानी आगमन झाले की तुमच्या मोठेपणाला उठाव मिळणार आहे. यावेळी रवीदेखील भाग्यस्थानी येणार आहे. शासनात उच्चस्थानी तुमचा दबदबा निर्माण होणार आहे. तुम्हाला कीर्ती मिळणार आहे. हातून असे एखादे कार्य घडेल की लोकस्तुतीचे मोठे वलय तुमच्याभोवती निर्माण होईल. सर्वसाधारण सांगावयाचे तर नोकरीत तुमच्या कामाला वरिष्ठाचे पाठबळ मिळेल. खास बढती मिळेल. आर्थिक स्थिती छानपैकी सुधारेल. एकदम हाती पैसा येईल. बेकारांना स्थिर अशी भरपूर पगाराची नोकरी मिळेल. इंजिनियरिंग उद्योग सुशिक्षित बेकारांना सुरू करायला सहाय्य मिळेल. वणवण व निराशा, अपेक्षाभग आता संपला आहे हे दाखवून देणारा हा महिना आहे. **महिलांस :** नोकरीत प्रमोशन मिळेल. पदवीधर मुलींना प्रगतीची संधी मिळेल. यशाचा महिना आहे. ¤

**मीन : परिश्रम वाढणार**

अकरावा गुरु हीच तेवढी तुमची अनुकुलता. कारण गुरु तुमचा मित्र आहे. तो तुमच्या भल्यासाठी आतूरही आहे. त्याच्याकडून होईल तेवढे तो अवश्य करणार आहे. प्रामुख्याने धार्मिक तसेच वाङ्मयीन कार्य तुमच्या हातून घडवून आणणार आहे. त्यापासून तुम्हाला पैसा व प्रसिद्धी मिळणार आहे. दि- १६ ला चंद्र गुरु युती लाभस्थानी घडत आहे. त्यावेळेपासून तुमच्या कल्पकतेला व लेखनाला बहर येणार आहे. तुमच्याकडे साहित्याची एवढी मागणी येईल की ती पुरी करता करता तुम्हाला नाकीनऊ येतील. प्रामुख्याने कथा, कादंबरी व तत्त्वज्ञान या साहित्याची अधिक मागणी येईल या महिन्यात आपले आर्थिक मान दि. १३ नंतर सुधारू लागेल. अफाट खर्चाने तुम्ही बेजार झाला आहात त्यातून बाहेर पडाल. खर्चाची तोंडे मिटतील. पैसा मिळवण्यासाठी जे प्रयत्न कराल ते सफल होतील. दि. १६ रोजी रवि तूळ राशीत प्रवेश करील. हा आठवा रवि तब्येतीला लहान लहान प्रमाणात धक्के देणार आहे. अपचन, पित्त, ताप या सारख्या आजाराला तोंड लागणार आहे. घरात दवाखानाच निर्माण होईल. अशक्त व वृद्ध माणसांनी जरा जास्त थंडी वाऱ्यापासून जपावे. मात्र मोठा कोणताच आजार होणार नाही. मात्र हा रवि व लगेच त्याच्याबरोबर येणारा हर्षल तुमचे आर्थिक मान उंचावील. लॉटरीत पैसा मिळण्याचा योग आहे. रेसमध्येदेखील नशीब उघडेल. वारसाने संपत्ती मिळण्याची शक्यता आहे. वाटपात तुम्हाला संपत्ती मिळेल. दि. १७ ते २५ व प्रामुख्याने दि. २५ च्या चंद्र-हर्षल युतीनंतर नोकरीची परिस्थिती अनुकूल राहील. बदली झाली असल्यास ती रद्द होईल. फिरती करावी लागत असल्यास त्यातून मुक्तता होईल. वरिष्ठांच्या मनात सशय असल्यास तो दूर होईल. बेकारांनी महसूल खात्यात, बांधकाम खात्यात, पोलीस खात्यात व शिक्षण खात्यात नोकरीचा प्रयत्न करावा. त्यांना नोकरी मिळेल. स्वतंत्र उद्योगाचे प्रयत्न चालू असले तर व्यापार कागदाचा व औषधाचा तसेच खताचा करावा. शेतीची अवजारेदेखील लाभ करून देतील.. या महिन्यात हातून दानधर्म व धार्मिक कार्य घडणार आहे. वंदनीय अशा साधू पुरुषाचा सहवास व आशीर्वाद मिळणार आहे. **महिलांस :** अडचणी आता संपू लागणार आहेत. आर्थिक मदत मिळून ओढाताण कमी होईल.

---


# माणूस चित्र वार्ता पुस्तक

# यापुढील अंक दिवाळी अंक

प्रसिद्धी
२५ ऑक्टोबर
किंमत
फक्त
सव्वा
रुपया

भरपूर छायाचित्रे
आकर्षक मुखपृष्ठ
पृष्ठसंख्या
नेहमीचीच

**गोवा** ऊन आणि सावल्याची
सागर आणि वाळूची
हिरव्यागार भूमीची
रसरशीत माणसाची
एक भावकविता.

**गोवा** पूर्व आणि पश्चिम
दोन्हीचा वारसा सांगणारी
संस्कृती.

**गोवा** आरोग्य आणि जोम
विश्रांती आणि सुख
परत मिळवून देण्याचे
आश्वासन.

**गोवा** एक आमंत्रण
निनादणारे
सर्वत्र–दूरवर
आपण हे कसे नाकारू शकाल ?

गोव्यातील कुठल्याही प्रकारच्या पर्यटनविषयक माहितीसाठी संपर्क साधा—

**टुरिस्ट ब्युरो**

ज्युडिसियल कमिशनरच्या कोर्टासमोर
पणजी–गोवा
दूरध्वनी क्रमांक – १. २२२८
२. २६७३

माहिती आणि पर्यटनखाते,
गोवा, दमण व दीव
सरकार तर्फे प्रकाशित

# अमदानी

पृष्ठ १३ वरून

कापशी पाठीचा गरम पोटाचा चेतवणारा स्पर्श.

कळून चुकलं की या मोसमात हीच ऐन भरात आहे.

मोठ्या आसोशीनं तिला लगटण्यासाठी तो उचावला.

नि तेवढ्यात एक दांडकूट फणफणत त्याच्या पायावर असं काही दणकलं की तो कोलमडलाच. क्षिणक्षिण्या निघाल्या. मागोमाग दगडगोट्यांचा भडिमार. जिव्हारी लागल.

तिचा मालक तिथंच आसपास होता, हे त्याच्या लक्षातच आलं नव्हतं.

शक्य तितक्या वेगानं लंगडत न् धाय मोकलीत त्यानं पळ काढला होता.

वेदना सोशीत दोन-तीन दिवस तो फाटकातच पडून होता. पण ती आठवण बुजत नव्हती. नजरेसमोरून ते देखणेपण हलत नव्हतं. तो वास संपत नव्हता.

अन् आज अभावित ती दिसली होती.

आपणहून येताना.

बेगुमानपणे.

पण पाय.

मामला जरा कठीणच होता.

सखल पट्टी ओलांडून ती वर आलेली न् धीटपणे उभी राहिलेली. गवताशी घासत. सरळ सरळ त्याच्या नजरेला नजर भिडवून.

मागावरले दोघे धटिंगण तिच्याभोवती घोटाळत असलेले.

तो क्षणभर स्वस्थ उभा. विचारमग्नसा.

तोवर मागलं टोळकंही भुंकत येऊन पोचलेलं.

आता गप्प राहून भागणार नव्हतं.

झुंज अटळ होती.

नि त्याला ती टाळायचीही नव्हती. आजवर कधी असा भेकडपणा झाला नव्हता.

पाय आस्ते दाबीत, पेटल्या नजरेनं तो पुढे सरला.

फिस्कारण : काहीसं वेदना सोसण्यासाठी; काहीसं जरब बसविण्यासाठी, अन् आश्चर्य म्हणजे दुर्लक्षित करताच ती कळही तितकीशी तीव्रपणे जाणवेनाशी झालेली...

त्याचा सावध पण आक्रमक पवित्रा; त्याच्या जलाल डोळ्यांतून उडणाऱ्या ठिणग्या; किंवा बहुधा नेहमीचा त्याचा आवधाक.

कशामुळेही असो; ते सगळे आपापल्या जागी थबकले.

त्यानं चमकून एकदा तिच्याकडे पाहिलं.

गवताच्या एका घसघशीत पुंजक्यात घुसून, कान उंचावून ती भिरीभिरी बघत होती. बलिष्ठपण जोखत होती.

तो इरेला पेटला.

वानगीदाखल योजल्यासारखं, एका हुडकुळ्याकडे तो वळला.

पायातला पेटका सोशीत पण वरवर प्रखर फिस्कारत तो त्या हुडकुळ्यावर तुटून पडला. वेदनेचा रागही एकप्रकारे काढता आला. चावे काढणं सुरू झालं.

हुडकुळा बेजार झाला नि अखेर शेपूट घालून, कोकलत दूर गेला.

ते बघून बाकीच्या दोघातिघांनीही मुकाट पळ काढला.

या एवढ्या पराक्रमानं त्याला मोठा चेव आला.

आता उरले तिघेचौघे, त्यातल्या त्यात बलिष्ठ.

गवती पुंजक्यात खुसखुसणारी ती.

काय व्हायचं ते होवो, असा निर्धार केल्यासारखा तो आव्हानक भुंकला.

तेही कमी नव्हते.

क्रुद्ध नजरा.

गुरगुरणं— फिस्कारणं— ठणाणणं दुमदुमल. तसतसं अधिकाधिक स्फुरण चढत गेलं. हल्ले— प्रतिहल्ले सुरू झाले.

कधी अल्लाद उडी.

कधी जायबंदी पायावरच बेधडक नेट.

तर कधी एकेकाला उताणा घोळसणं— डसणं.

हर प्रकारन त्यानं त्या सगळ्यांना नामोहरम करून सोडलं, शेपटं घालायला भाग पाडलं.

आता त्याच्या लेखी ते कःपदार्थ होते !

भेंडाळत-भेकत ते दूर गेल्यावर, विजेत्याच्या सार्थ गर्वानं, काळारोम खडक दणकटपणे पुढे सरावा, तसा त्यानं तिच्याकडं मोर्चा वळविला.

तीही उत्सुकशी सरसावली— स्वागतार्थ आल्यासारखी ! त्याचं रासवटपण डोळ्यांत साठवून घेत. थोडी बुजरी; थोडी अधीरशी. थोडी बिचकत, थोडी प्रसन्नशी.

नाकी नाक भिडलं.

हुगाहुंग झाली.

वास मनसोक्त भिनला.

तो मागं गेला : ती ताठ उभी.

लव ताठरली.

आसोशी असह्य झाली.

हवेपण हुंकारलं.

त्यानं पुढले पाय उंचावले;

तत्क्षणी मागच्या पायातून कळ निघालीच ! वैर साधल्यासारखी. मनस्वी जीवघेणी.

इतका वेळच्या झटापटीत दडपलेलं, अट्टाहासानं विसरलेलं ते दुःख.

त्या दुष्कर झटापटीनंच अखेर दगा दिला.

कळ निघतच राहिली, सर्वांगी पसरली : अत्यंत अदम्यशी.

पाय आखडता घ्यावाच लागला, बहुधा कायमचाच !

अन त्या आधाराशिवाय तिचा कब्जा घेणं महामुष्किल होतं, केवळ अशक्य होतं.

तो हबकला अन त्याची सगळी उभारी अगदी अवेळी ढासळली. घसघसती लाट पुढारता पुढारता ओसरली !

आजवरचा संकेत असा अवचित मोडला. स्वामित्व मिळालं, पण मानबिंदूच हरवला !

आता मात्र दूरवर घोटाळणारे ते बलिष्ठ सावध झाले. मोठ्या अटीतटीनं त्यानं जे लपवल होतं. ते त्यांच्या लक्षात आल्यावाचून राहिलं नाही. दौडत, भुंकत ते पुढं येऊ लागले.

तेवढ्यात तीही उधळली, त्याच्या दिशेनं.

पण अशा खचल्या अवस्थेत त्याच पारिपत्य करण्याइतकी उमेद त्याला उरली नव्हती.

तो भलताच खट्टू झाला अन दुखऱ्या पायाचे त्यानं कडकडून चावे घेतले.

तिला तशीच त्यांच्या स्वाधीन सोडून, कण्हत कण्हत तो मग मागं फिरला : पाय आखडून अन चक्क शेपूट घालून !

# अवांतर

## प्रतिनिधी

अब मैं बच्चा नही हूँ ! – एका महत्त्वपूर्ण प्रसंगामध्ये आपल्या शिक्षिकेला ' महत्त्वपूर्ण बदल ' सूचीत करणारा मेरा नाम जोकरच्या पहिल्या भागातील विलक्षण गोड चेहऱ्याचा तो छोकरा ऋषी कपूर आर. के. च्या बॉबीचा नायक म्हणून हजर झाला आहे. आर. के. च्या नवीन चित्राभोवती असलेला प्रसिद्धीचा, उत्सुकतेचा सर्व झगमगाट नुकत्याच प्रदर्शित झालेल्या या चित्राभोवती आहे. या चित्राचे स्वागत कसे होते, ते आठ-पधरा दिवसातच स्पष्ट होईल. पण चित्राची हवा तर मोठी छान आहे आणि चित्रपटाचा नायक ऋषी कपूर चित्रपट वितरीत होण्यापूर्वीच एक चमकता सितारा म्हणून मान्यता घेऊन बसला आहे.

कलाकाराची स्वत:ची अशी एक शान असते. अभिनय ही त्या पुढली गोष्ट. अशी जबरदस्त शान राजभोवती होती, आहे. पण रणधीर काय किंवा ऋषी काय या दोघांनाही ही ' शान ' लाभलेली नाही. तसे दिसायला दोघेही सुदर आहेत. जवानीमध्ये प्रवेश करीत असलेल्या ऋषीचा चेहरा लोभस आहे. जोकरमध्ये काहीशी खटकणारी जाडी त्याने प्रयत्नपूर्वक आता कमी केली आहे. संवाद बोलण्याच्या – विशेषत: फिल्मी संवाद बोलण्याच्या तंत्रामध्ये – नैसर्गिकता, नाट्य, आणि वेळेचे अवधान, तीन गोष्टीची गरज असते. रणधीर काय, ऋषी काय दोघेही याबाबतीत अगदीच प्राथमिक अवस्थेमध्ये आहेत. पृथ्वीराज कपूरसारख्या त्या वेळच्या आघाडीच्या कलाकाराच्या पोटी जन्म घेऊनही राजकपूरची ओळख पृथ्वीराजचा मुलगा अशी करून देण्याची वेळ आली नाही. कलाकार, निर्माता, दिग्दर्शक म्हणून वाटचाल करताना त्याने स्वत:ही पित्याच्या पुण्याईचे पाठबळ घेतले नाही. रणधीरच्या नावे आता डझनभर चित्रे असली तरी अजून त्याला स्वतंत्र अस्तित्व आलेले नाही. ' राजचा छोकरा ' – हीच त्याची अिमेज आहे दिग्दर्शक म्हणून उभा रहाण्याचा प्रयत्न तो करतो आहे तो ही आर. के. फिल्म्सच्या छायेमध्येच.

ऋषी कपूर या बाबतीत मात्र रणधीरपासून वेगळा पडतो. ' जोकर ' या पहिल्याच चित्रामध्ये एक विशिष्ट दर्जाचा कलाकार म्हणून त्याने स्थान मिळवले आहे. त्याचा बॉबी सेट वर असतानाच, त्याच्याकडे निर्माते धावू लागले. ' प्रॉमीसिंग आर्टिस्ट ' असल्याचे हे एक व्यावसाईक लक्षण होते. निर्माते एच. एस. रावेल यांच्या नवीन चित्राचा नायक ऋषी कपूर आहे. ' एक चादर मैलीसी ' या गाजलेल्या कथेवरून आर. एस. बेदी एक चित्र करीत आहेत. त्यातील भूमिकेसंबंधी ते शर्मिलाशी बोलणी करायला गेले होते. या चित्रपटामध्ये तिचा नायक तिच्यापेक्षा पंधरा वर्षांनी लहान आहे. शर्मिलाने पहिल्या प्रथम चटकन नाव सुचवले ते कपूरचे ! हा नायक ग्रामीण आहे. बेदीच्या हिशेबी ऋषी फारच ' नागरी ' (सोफिस्टिकेटेड) दिसतो. त्यामुळे त्याचे नाव सध्या बाजूला पडले आहे. अर्थात चागला पर्याय मिळाला नाही तर शेवटी त्याना ऋषीचीच निवड करावी लागेल. ही अपरिहार्यता कलाकाराला सुखवणारी असते.


बॉबी हे राजच्या कारकिर्दीतील महत्त्वपूर्ण चित्र. त्याने काळजीपूर्वक जोपासलेल्या आर. के. च्या रौप्य महोत्सवी वर्षातील भेट. राज स्वत: म्हणतो त्याने जीव ओतून ज्या चित्रांवर मेहनत घेतली अशा चित्रपटांमध्ये बॉबी या नवीन चित्राचा समावेश होते. आग हे आर. के. चे पहिले चित्र राजकपूरने १९४८ साली दिले. राज म्हणतो त्यावेळी मी स्वत: तरुण होतो. माझ्या पिढीतील तरुणांच्या इच्छा आकांक्षा, महत्त्वाकांक्षा याचे चित्रण करण्याचा प्रयत्न मी केला. गेल्या पंचवीस वर्षामध्ये खूप बदल झाल्याचे सांगून राज म्हणतो – मी आता जुन्या पिढीमध्ये फेकला गेलो आहे. आणि माझी मुले तारुण्याच्या उंबरठ्यावर उभी आहेत. या तरुण पिढीचे निरीक्षण केल्यावर माझ्या डोळ्यासमोर चित्र उभे राहते, त्याचे चित्रण मी बॉबीमध्ये केले आहे माझ्या पिढीतील कुमार अवस्थेतील मुलगा आणि आजच्या पिढीतील कुमार अवस्थेतील मुलगा या मध्ये जमीन अस्मानाचा फरक आहे. कुमार अवस्थेतील मुलाभोवती केंद्रीत झालेली कथा बॉबीमध्ये मी सादर करीत आहे. या चित्रामध्ये या विशिष्ट अवस्थेमध्ये असलेल्या तरुणाला येणारे अनुभव, त्याच्या आशा, त्याची स्वप्ने, त्याना येणारे निराशाजनक अनुभव, या गोष्टी सवेदनाशील पद्धतीने साकारण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. राज म्हणतो त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे प्रेम आणि जीवन या दोन महत्त्वपूर्ण गोष्टीकडे तरुण कोणत्या दृष्टीने बघतात ते तुम्हाला या चित्रपटामध्ये पहावयास मिळेल.

### जुनी पिढीही हजर

आता सघर्ष दाखवायचा म्हणजे ज्या पिढीबरोबर संघर्ष होणार ती जुनी पिढीही निदान प्रातिनिधीक स्वरूपामध्ये तरी आली पाहिजे. बॉबीमध्ये जुन्या पिढीचे प्रतिनिधित्व प्रेमनाथ व प्राण यांनी केले आहे. राज म्हणतो, माझी पिढी आणि आज कुमार अवस्थेतील मुले यामधील संघर्ष हा बॉबीचा विषय आहे. आणि विषयाला साजेशी कथा मुद्दाम लिहून घेण्यात आली आहे. युवकाचे जे दर्शन मला होत आहे त्याचे प्रामाणिक चित्रण करण्याचा प्रयत्न मी केला आहे. राजकपूर सारखा निर्माता-दिग्दर्शक आपल्या चित्राबद्दल एवढे बोलतो, तेव्हा चित्र खरोखरच तोलामोलाचे अर्थात– (व्यावसायिक पातळीवर) असावे अशी अपेक्षा ठेवण्यास हरकत नाही.

### बॉबी–राजा....राजा...बॉबी

अत्यंत सपन्न कुटुबामध्ये जन्मलेला राजा रम्य परिसरातील उत्कृष्ट निवासी शाळेमध्ये




शिक्षण घेत असतो. घरी आल्यावर त्याच्या लक्षात येते, पप्पा-मम्मी कोणालाच आपल्यामध्ये रस नाही. आपल्या आवडी-निवडी व या मंडळींच्या आवडी-निवडी अगदी भिन्न आहेत. पैशापाठी धावणे, खूप पैसा गोळा करणे आणि स्वतःचा असा एक स्वतंत्र वर्ग निर्माण करून स्वतःला कोंडून घेणे, अशा वृत्तीच्या घरच्या मंडळींशी त्याचे जमू शकत नाही. आणि त्यांच्या सुरामध्ये सूर मिसळून राहणे राजाला परवडण्यासारखे नसते. कोंडमारा झालेल्या परिस्थितीत राहणाऱ्या राजाच्या लक्षात येते आपल्या आई-वडिलांशी आपला सुखसंवाद होऊच शकणार नाही. मग करायचे काय ? बोलायचे कोणाशी ? घरामध्ये बरोबरीचे तर कोणीच नाही. अशा काहीशा विकलांग अवस्थेमध्ये असतानाच जीवनाला सामोरे जाण्यासाठी तारुण्याच्या उंबरठ्यावर उभ्या राहिलेल्या राजाच्या आयुष्यात, मुलगी येते. त्याच्याच वयाची, गव्हाळी रंगाची. राजाचे या मुलीबरोबर छान जमते. बघता बघता दोघेही एकमेकांसाठी वेडावून जातात. पप्पा-मम्मींना अर्थातच पोराचे हे वागणे बिल्कुल पसंत नसते. त्यात ही बॉबी म्हणजे दुसरी-तिसरी कोणी नसून पप्पांच्या आयाची नात असते. छे ! पप्पा अस्वस्थ होतात. नाजूक भावना उराशी बाळगून, सोनेरी स्वप्ने साकार होण्याची वाट पहात बसलेल्या राजा-बॉबीला कोणताही विरोध साफ मंजूर असतो. आपले जमणे कठीण, हे लक्षात आल्यावर ही पोरे काय करतात ? चक्क जीव द्यायला निघतात. अर्थात जीव जात नाही. उलट आणखी एक तोला-मोलाची व्यक्तीरेखा कथा प्रवाहामध्ये हळूच येऊन




## ऋषी–डिम्पल

दोघांचे भावविश्व
आकारत असतानाच....




उभी राहते. गडगंज पैशामध्ये उभा राहिलेला एक दिलदार कोळी. साध्या कथेतून प्रतिकात्मक संघर्ष उभा राहतो. पप्पा, मम्मी एका बाजूला, दुसऱ्या बाजूला नवीन उमेदीची ही मुले, आणि नवीन पिढीकडे सहानुभूतीने बघणारे, संपन्न कोळी महाराज. आता हा संघर्ष पुढे कसा आकार घेतो, ते आत्ताच सांगण्यात काय मौज ? एक मात्र खरे प्रेक्षकाला गुंतवण्याइतके सामर्थ्य कथाबिजामध्ये आणि कॅमेऱ्यामागे उभ्या असलेल्या राजकपूरमध्ये खचित आहे.
राजाचे पप्पा म्हणून प्राण, मम्मी म्हणून सोनिया सहानी, यांचे दर्शन होणार असून अरुणा इराणी, प्रेमनाथ, फरिदा जलाल यांना महत्वपूर्ण भूमिका आहेत. संगीताची बाजू लक्ष्मी प्यारे संभाळत आहेत. बाकी क्षेत्रामध्ये आर. के. ची नेहमीची मंडळी, अर्थातच नेहमीच्या सफाईने वावरणार आहेत.
राज विचाराने प्रागतीक असला, तरी तसा देवधर्म मानणारा. त्याच्या चित्राचा मुहूर्त, प्रदर्शन, हे अगदी तिथवार पाहून शास्त्रशुद्ध पद्धतीने केले जाते. आता बॉबीला यश मिळावे म्हणून चित्र वितरीत होईपर्यंत राजने त्याला प्रिय असणारी शराब आणि मांसाहार यांचा खुशीने त्याग केला आहे. जोकर फसला, तरी बॉबीवर प्रेक्षकांनी उदंड प्रेम करावे अशी त्याची आपेक्षा आहे.
या चित्राच्या निमित्ताने ऋषी कपूर आणि डिम्पल कापडिया यांचा निकट सहवास आला. दोघेही उत्साही, दोघेही आकर्षक व्यक्तिमत्व लाभलेले.
चित्रपटासारख्या माध्यमातून येणाऱ्या शारिरीक सलगीतून जात असताना त्या दोघांचे स्वतःचे भावविश्व उभे राहण्याचा




**......डिम्पल**

मिसेस राजेश खन्ना
बनली.
बॉबीच्या प्रसिद्धी
यंत्रणेला
आणखी एक झगमगीत
पदर मिळाला.



**प्राण**

जुन्या पिढीचा प्रतिनिधी म्हणून....




दाट संभव होता. जाणकार मंडळी असे सांगतात डिम्पल ऋषीचा सहवास मिळावा म्हणून अक्षरशः वेडावली होती. पण चिंतू मात्र एका कलाकाराने आपल्या सहकलाकाराबरोबर जेवढ्या मोकळेपणे वागावे, त्या बाहेर जाण्यास तयार नव्हता. डिम्पलसंबंधी त्याच्या भावना काही आकार घेऊ लागल्या होत्या. तिने मागणी केली म्हणून त्याने मोठ्या प्रेमाने एक सुंदर अंगठी तिच्या नाजूक बोटामध्ये सरकवली. डिम्पल सुखावली. आधिक मोकळेपणे ती चिंतू (ऋषी कपूर-आर. के. परिसरामध्ये चिंतू म्हणूनच ओळखला जातो) बरोबर हिंडू–फिरू लागली. त्याचा सहवास मिळावा म्हणून धडपडू लागली. अर्थात स्टुडिओ परिसरामध्ये वावरणाऱ्या तिखट मंडळींच्या तीक्ष्ण नजरेतून डिम्पल सुटली नाही. ती चिंतूशी जवळीक वाढवण्याचा प्रयत्न करू लागली व मंडळी त्याची या-ना त्या प्रकारे दखल घेऊ लागली. पण असल्या किरकोळ गोष्टीकडे लक्ष द्यायला तिला वेळ नव्हता. तिच्या धाडसी वागण्याने चिंतू पण काहीसा चक्रावून गेला होता. प्रकरण कसे आणि कोठे जाणार याचा तो अंदाज घेऊ लागला. आणि अचानक प्रचंड उलथापालथ करणारी घटना घडली. कोणालाच कल्पना नसताना त्या धाडसी राजेशने या पोरसवदा पोरीला चक्क मागणी घातली. स्वत: डिम्पलही क्षणभर गांगरून गेली. वास्तविक असा महत्वाचा निर्णय घेण्याचे तिचे हे वय नव्हते. पण राजेशची पत्नी या कल्पनेनेच विलक्षण सुखावलेल्या डिम्पलने राजेशला होकार भरला. झट मंगनी पट शादी होऊन काल बालिका म्हणून वावरणारी ही मुलगी बघता बघता मिसेस राजेश खन्ना झाली. बॉबीच्या प्रसिद्धी यंत्रणेला आणखी एक झगझगीत पदर मिळाला. राजेश–डिम्पलच्या विवाहामध्ये राजकपूरपासून आर. के. चा सर्व परिवार घरचे कार्य असल्याच्या थाटामध्ये वावरला. कार्य पार पडले आणि चौथ्याच दिवशी डिम्पल बॉबीच्या शूटिंगसाठी पुण्याला हजर झाली. पण या विवाहाने डिम्पलच्या वर्तणुकीमध्ये एकदम फरक पडला. आता ती कोवळ्या वयाची, स्वप्नांच्या जगात वावरणारी सिधी साधी डिम्पल राहिली नव्हती तर राजेश खन्नाची

आणि नव्या पिढीकडे एका वेगळयाच दृष्टीकोनातून बघणारे हे संपन्न कोळी महाराज

पत्नी झाली होती. पुण्याच्या चित्रीकरणाचे वेळी सर्व मंडळी राजकपूरच्या लोणी-काळभोर येथील शेतावर उतरली होती. मिसेस खन्ना मात्र पंचतारांकीत हॉटेलच्या पाहूणचाराचा आस्वाद घेत होत्या. अर्थात ' मिस ' असताना बॉबीच्या छाया चित्रणाचे निमित्तानेच डिम्पलने पुण्याच्या ' राजबाग 'मधील पाहुणचाराचा आस्वाद घेतला होता. पण आता ते परवडण्यासारखे नव्हते.

राजकपूरचा प्रत्येक शब्द झेलणाऱ्या डिम्पलने विवाहानंतर राजचीही दिक्कत बाळगली नाही. काश्मीरमध्ये बॉबीचे चित्रीकरण चालू होते. सर्व युनिट पुढे गेले होते. बरोबर चित्रीकरणाच्या दिवशी मिसेस खन्ना हजर झाल्या. खराब हवेमुळे राज एक दिवस चित्रीकरण करू शकला नाही. वाया गेलेला दिवस कारणी लावावा म्हणून त्याने डिम्पलला एक दिवस जास्त राहण्याची विनंती केली. पण...गोड गोड बोलून तिने





या संपन्न
कोळीमहाराजांच्या
भूमिकेत उभे
आहेत
**प्रेमनाथ**

साफ नकार दिला. याचा अर्थ तिने चित्रीकरणामध्ये सहकार्य दिले नाही असा नव्हे. ठरलेल्या सर्व तारखांना ती बिनचूकपणे हजर राहिली. आणि एखादा वक्तशीर मनुष्य जसे नेकीने काम करतो. तसे नेकीने काम करून तिने हे चित्र पूर्ण केले. 'बॉबी'च्या चित्रीकरणामध्ये प्रारंभी ती ज्या उत्साहाने भाग घेई तो उत्साह मात्र साफ मावळला होता. कर्तव्यबुद्धीने तिने हे चित्र पूर्ण केले. प्रचंड रकमा देऊन अनेक निर्मात्यांनी तिला करारबद्ध केले होते. त्या सर्व करारातून स्वतःला तिने मुक्त करून घेऊन मिसेस राजेश खन्ना ही एकच बिरुदावली ती सध्या मिरवत आहे. बॉबी हे तिचे पहिलेच आणि बहुधा अखेरचे चित्र. त्यामुळेच डिम्पल कापडिया नव्हे मिसेस राजेश खन्ना हे 'चिंटू'च्या बरोबरीने, बॉबीचे आकर्षण ठरणार आहे. निर्मिती पासून ते आता पडद्यावर येईपर्यंत असे अनेक पदर असलेले हे एक वेगळे वैशिष्ट्यपूर्ण चित्र आता रसिकांसमोर रुजू झाले आहे. बॉबीचे भवितव्य कसेही आकारले, तरी या चित्राने गेल्या कित्येक वर्षामध्ये कोणत्याही चित्रपटासंबंधी नव्हती अशी जबरदस्त हवा निर्माण झाली आहे ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. ■ ■



अमर भूपाळी श्रीमंतांच्या दरबारात.

नाट्यसंपदा ही एक रसिकमान्य नाटकमंडळी आहे. नाट्यसंपदेने गेल्या काही वर्षात दर्जेदार नव्या नाटकांची निर्मिती करून चांगले नाव केले. (तिने पैसेही बऱ्यापैकी केले असतील; पण तो विषय एक प्रभू अथवा प्रभाकर जाणे) आता नाट्यसंपदेने एका जुन्या नाटकाचे दिमाखदार पुनरुज्जीवन केले आहे.

# होनाजी बाळा ॥ रंगभूमी ॥

संगीत दिग्दर्शक
वसंत देसाई

निर्माते प्रभाकर पणशीकर
लेखक चिं. य. मराठे







वाजवि तव बासरी असे कृष्णाला विनवणारी राधा
प्रकाश घांग्रेकर । फैय्याज


हौसेने नाटके पाहणाऱ्या आजच्या प्रेक्षकाला 'होनाजी बाळा' हे नाटक आणि त्याचे लेखक मराठे दोन्ही ठाऊक नसणार. कारण 'होनाजी बाळा' आणि 'लोकांचा राजा' ही मराठ्यांची दोन नाटके १५।१६ वर्षापूर्वी मुंबई मराठी साहित्य संघाने केलेली त्यांची प्रभावी निर्मिती इतिहासजमा झाली होती. त्या इतिहासाला जाग आणण्याचा प्रयत्न कोणी केला नाही. आता नाट्यसंपदने तो योग आणला; म्हणून 'संपदे'चे आभार मानले पाहिजेत.

बऱ्याच वर्षापूर्वीचे साहित्य संघाचे 'होनाजी बाळा' नाटक गाजले. त्यातल्या अस्सल नाट्यासाठी, निर्मिती मूल्यांसाठी, संगीतासाठी आणि भालचंद्र पेंढारकरांच्या बाळाच्या अविस्मरणीय भूमिकेसाठी. (हीच बाळाची भूमिका भालचंद्र पेंढारकरांनी व्ही. शांतारामच्या अमर 'भूपाळी'मध्ये मोठी ढंगदारपण वठवली होती.) जुन्या 'होनाजी बाळा' नाटकाशी इतका जवळचा संबंध असल्यामुळेच नव्या 'होनाजी बाळा'च्या दिग्दर्शनाची जबाबदारी 'संपदे'ने चाणाक्षपणाने भालचंद्र पेंढारकरांवर सोपवली असणार.

आणि पेढारकरांनी ती व्यवस्थित पार पाडली आहे. हे नवे 'होनाजी बाळा' नाटककाराकडून थोडे ठाकठीक करून घेतले आहे. नव्या स्वरूपात त्यावर 'अमर भूपाळी' या चित्रपटाची गडद छाया पडली आहे असे दिसते. त्यामुळे खरे म्हणजे त्याच, म्हणजे 'अमर भूपाळी' याच, नावाने हे नवे नाटक सादर केले गेले असते तर बरे झाले असते. (आमच्यासारख्या जुनाट प्रेक्षकांना जुने 'होनाजी बाळा' आठवत राहिले नसते)

नांवाचे सोडा; या नव्या नाटकासाठी नाट्यसंपदेनें पुष्कळ कलाबूत उधळली आहे. प्रेक्षकांना ती नवलाईचा नयनोत्सव घडवोल. वर त्याचा कान पकडायला फैयाझ, प्रकाश घांग्रेकर यांचे गाणे आणि 'अमर भूपाळी' फेम वसंत देसाईंचे संगीतदिग्दर्शन आहेच.

पूर्वीचा बाळ
आता दिग्दर्शकाच्या भूमिकेत
भालचंद्र पेंढारकर



# चार्ल्स द गॉल

विसाव्या शतकातील
एक मनस्वी व्यक्तिमत्व

फ्रान्सला पूर्ववैभव प्राप्त करून
देणे हे आपले नियत कार्य आहे
अशी श्रद्धा बाळगणारा हा
राष्ट्रप्रमुख, आपल्या कणखर
धोरणापायी जसा अनेकांच्या
भक्तीचा विषय झाला तसा
माथेफिरू विरोधकांच्या जन्मालाहि
कारणीभूत ठरला.

अन् त्यातून एक गुप्त संघटना उभी ठाकली.
तिचे नाव – 'ओ. ए. एस.' या संघटनेने
एका षड्यंत्राची आखीव उभारणी केली. इंग्लंडमधल्या
'जॅकल'ला खास निमंत्रण धाडण्यात आले. ठरल्या
वेळी तो पॅरिसमध्ये येऊन दाखल झाला. अन्–

**वास्तव आणि कल्पित यांच्या सीमारेषेवर वावरणाऱ्या**
**या खळबळजनक राजकीय नाट्यावर आधारलेली कादंबरी**

# दि डे ऑफ दि जॅकल

आज साऱ्या जगभर मोठ्या चवीने वाचल्या जात असलेल्या
या अद्भुतरम्य कादंबरीचा तितकाच चित्तथरारक परिचय....

**माणूस चित्र वार्ता पुस्तक : दिवाळी अंक**

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे पाक्षिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण
१०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. स. श्री. ग. माजगावकर